म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ना. वा
दा.क्र. १५९८९

IRBK-0115989
IRBK-0115989

१००३२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

नक परत करावे,
५ (८) नुसार
णी लागेल.

# सेजदा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. ..१५८८९ नों दि ३०/३/८५
वि. ........

संजय
प्रकाशन पुणे ४

IRBK-0115989
IRBK-0115989

सौ. ज्योत्स्ना देवधर

© सौ. ज्योत्स्ना देवधर
१२०५/१–९ शिवाजी नगर, पुणे ४

मुद्रक :
श्री. न. शं. कुलकर्णी
टीचर्स प्रिंटिंग प्रेस
७२०/२० नवी पेठ पुणे ३०

संजय प्रकाशन – ३२
प्रकाशिका :
सौ. ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन
९१७/२२ फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४

पहिली आवृत्ति ५ डिसेंबर १९७२


मूल्य : सहा रुपये

मुखपृष्ठ : जोशी आर्टस् पुणे

माझा नातू

चि. अमोल

यास



श्रीअरविंद यांचे प्रतीक

ऊन चांगलंच तापलं होतं. बस खचून भरली होती. उकाडा पण बराच होता. बसमध्ये तामिळ, तेलगु, कन्नड सगळ्याच भाषांचा मेळावा भरला होता जणू. अगदी पुढच्याच सीटवर बसलेले मद्रासी गृहस्थ जोरजोरात शेजारच्या बाईशी बोलत होते. ती बाई हातवारे करून उत्तर देत होती.

नारळी, पोफळीच्या सोबतीनं बस चालली होती. भाताच्या शेतातून मंद गोड गंध येत होता. पण कुणाचं तिकडे लक्ष नव्हतं. प्रत्येकजण मुक्कामाला पोहचण्यासाठी उत्सुक होता. खरं तर मद्रास ते पाँडेचरी चार तासांची वाट, पण वाटेत गाडीचं चाक पंक्चर झालं आणि तास दोन तास उगाच पडून रहावं लागलं. उतारू वैतागून गेले होते. चार तासांची वाट म्हणून बरोबर खाण्यापिण्याची पण सोय केली नव्हती. आता कधी बस एकदाची जाऊन पाँडीला धडकते असं प्रत्येकाला झालं होतं.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५९८९ नों दि २०।१।८४
वि. ...

१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ...९००३३... दि ...१९:११...
क्रमांक ...३९१०... नोंद दि ...२२।३।८३

पण या सगळ्या गोंधळात अनिलदा शान्त बसले होते. ते अस्वस्थ झाले नव्हते किंवा त्यांना राग पण आला नव्हता. त्यांच्या शेजारी बसलेला अतुल पण गप्प होता. गेले दोन दिवस तो जवळ जवळ बोलला नव्हताच. या सगळ्या आरडाओरड्यात त्याच्या मनातला राग मात्र चांगलाच भडकला होता. आपण इच्छा नसताना चाललो आहोत. नको त्या ठिकाणी आलो आहोत हा संताप त्याच्या मनात मावत नव्हता. आपण लहान आहोत म्हणून काय झालं ? आपल्याला कुणी काही विचारलंच नाही, आपल्या बडबडीकडे, धुसफुसीकडे कुणी लक्षच दिलं नाही. एखादं पार्सल पोस्टात टाकावं असं आपल्याला या म्हाताऱ्या माणसाबरोबर धाडून दिलं. कुठे कलकत्ता, कुठे मद्रास आणि आता ही पाँडेचरी. बंगालचं आखात पुरं ओलांडलं आपण. अतुलनं आपल्या मोठाल्या डोळ्यांनी अनिलदांकडे पाहिलं. त्याच्या रागाच्या कटाक्षाला त्यांनी शान्तपणे हसून उत्तर दिलं. हे अस्सं चाललंय गेले दोन चार दिवस. या म्हाताऱ्यावर रागवता, चिडताही येत नाही.

"अतुल, पाहिलीस किती उंच झाडं आहेत. नारळ बघ किती लागलेत." अनिलादा म्हणाले.

"हं."

"भाताची शेतं पण कशी हिरवीगार आहेत. यंदा पीक चांगलं येणार."

"हं."

"अरे, पहिल्यांदा पाँडीला आलो तेव्हा मी तुझ्याएवढाच होतो. तेव्हा तर आत्तापेक्षा दाट झाडी होती, रस्ते नव्हते. ही बस नव्हती. रात्रभर रेल्वेचा प्रवास करायचा तेव्हा कुठे मद्रासपासून इथवर यायचं."

" असेल. इथल्यापेक्षा बंगाल छान आहे. कलकत्ता सुंदर आहे," अतुल चिडून म्हणाला.

" खरंच आहे. आपला उभा भारतच खरं तर सुंदर आहे. फार मोठ्या, देवमाणसाचा देश आहे. हे शहर पण अशाच एका ऋषितुल्य माणसामुळें मोठं झालंय. तीर्थक्षेत्र झालंय."

" मी काही म्हातारा झालो नाही देवधर्म करायला, तीर्थयात्रा करायला," अतुल रागानं म्हणाला.

" छे रे, यात्राबित्रा करायची मी, माझ्यासारख्या म्हाताऱ्यांनी, तू तर उषानगरीचा नवा नागरिक आहेस."

" उषानगरी ? " अतुलनं नकळत उत्सुकतेनं विचारलं.

" सेजदानं आणि माँने पन्नास एक वर्षांपूर्वी एक स्वप्न पाहिलं होतं, एक स्वप्न रचलं होतं ते खरं होतंय. ते प्रत्यक्ष घडतंय. एक विश्वनगरी, एक विराट नगरी उभारली जातेय. त्या नगरीचा तू नागरिक हो."

अतुल बोलला नाही. अनिलदा आपल्या स्वप्नात दंग झाले. अतुल त्यांचा तो भारावलेला आवाज, भक्तिपूर्ण चेहरा बघून कंटाळून गेला होता. त्याला या कशातच गोडी वाटत नव्हती. त्याच्या डोळ्यांसमोर आपलं घर नाचत होतं. आपली छानशी आई, रागीट बाबा, सुरेखशी दीदी आणि आपला थोरला भाऊ समीरदा. आपल्या भावाची आठवण येताच अतुलचे डोळे नकळत भरून आले. किती छान होता आपला भाऊ. नेहेमी बरोबर असायचा. निरनिराळे खेळ शिकवायचा. इथे तिथे घेऊन हिंडायचा. समीरदामुळे आपण लहान वयातच किती गोष्टी शिकलो. किती कळू लागलं आपल्याला. तो नेहमी काहीतरी करत असायचा. तावातावानं बोलत असायचा.

त्याची केवढी मोठी गँग होती. लोक कशी घाबरत त्याला. मजा यायची. पोलिससुद्धा त्याला घाबरायचे. अतुल एकदम खुद्‌कन हसला.

"का रे हसलास ?" अनिलदांनी विचारलं.

"उगाच."

"तरीपण."

"काही नाही. तुम्हाला सांगून काय उपयोग ? आईला तरी कधी कुठे काय पटलंय ? किती छान होता समीरदा. शेवटी घर सोडलं त्यानं."

"खरंच चांगला होता समीर. गुणी मुलगा. पण वाया गेला. भलत्यांच्या नादी लागला. देवाची कृपा तू वाचलास."

"वाचलो असं तुम्हा लोकांना वाटतं. मला नाही वाटत."

"वाटेल ... जरूर वाटेल. आज नाही उद्या."

"नाही कधीच नाही. मी सांगून ठेवतोय. तुम्ही सर्वांनी मला इथं जबरदस्तीनं आणलंय पण मी रहाणार नाही," अतुल हट्टीपणानं म्हणाला.

"तुला इथं रहायला आवडलं नाही तर मी स्वतः तुला कलकत्त्याला पोहचवून येईन. पण तसं होणारच नाही. अरे, अरविंद बाबू कलकत्त्याहून इथे आले ते शेवटपर्यंत इथेच होते. तीस-बत्तीस वर्षांत त्यांनी पाँडेचरीच्या बाहेर पाऊल ठेवलं नाही."

"असेल. पण माझे मन इथे रमणार नाही सांगून ठेवतो."

"तुझी आई म्हणालीच होती, जरा हट्टी आहे; पण तू तर खूपच हट्टी आहेस. हरकत नाही, मी पण तुझ्यासारखाच आग्रही आहे. तुला इथे ठेवून घेण्यासाठी तर पहिल्यांदा पाँडी सोडली."

" पण तुम्ही कबूल केलंय मला रहायला आवडलं नाही तर कलकत्त्याला पोचवाल म्हणून. "

" हो, पण तशी वेळ येणारच नाही. पण तू मात्र मला न सांगता निघून जायचं नाही हं. वचन दे. "

" देतो. "

" शाबास बोलशील तसा वागशील, याची खात्री आहे माझी. नाहीतर या म्हाताऱ्याला शोधाशोध करणं जमणार नाही रे राजा, धावपळ पण होणार नाही आता. "

अनिलदांचा ओला आवाज ऐकताच अतुल एकदम गप्प झाला. त्याला अनिलदा जवळचे वाटू लागले, आवडू लागले. अनिलदांच्या हातावर त्यानं आपला हात ठेवला. तो कोवळा, लुसलुशीत हात हातात घेऊन अनिलदा मुकाट बसून राहिले.

बस पाँडेचरीला पोहचेपर्यन्त कुणीच काही बोललं नाही. गाडीतला गोंधळ पण कमी झाला होता. दोघं सामान घेऊन खाली उतरले. रिक्शावाल्यांनी त्यांच्या भोवती गराडा घातला.कित्येकजण म्हाताऱ्या दांच्या पायाला हात लावून नमस्कार करत होते. त्यांची विचारपूस करत होते. दोघं सायकल रिक्शात बसले. किती लहान होती ती रिक्शा ! ओढणारा माणूस काटकुळा, काळाकाळा, कमरेभोवती नुसता पंचा गुंडाळलेला, अंगात गंजीफ्रॉकसुद्धा नाही. पायांच्या नसा टरारून फुगल्या होत्या. अतुलला वाटलं आपण कलकत्त्यातच आहोत. तशीच उपाशी, खंगलेली, हडकुळी आहेत ही माणसं.

" किती दूर जायचंय आपल्याला ? " अतुलनं विचारलं.

" फार लांब नाही. आश्रम जवळच आहे. " दा म्हणाले.

" आश्रमात रहायचं आपण ? "

" नाही, पण आश्रम हाच आपला पत्ता, तीच आपली खूण, " दा स्वत:शीच बोलल्यासारखं म्हणाले.

अतुल त्या अनोळखी शहराकडे पहात राहिला. रस्त्याला फारशी गर्दी नाही. कलकत्त्यासारखी गडबड, गोंधळ, गजबजाट नाही, वाहनांची रीघ नाही. ट्रॅम, बसेसची गर्दी नाही. मोठाली हॉटेलं, दुकानं नाहीत, थिएटर तर एकही दिसत नाही. कशाची धमाल नाहीच मुळी. रस्ते डांवरी, स्वच्छ पण बाजूनं वाहणारी उघडी गटारं. मोठाल्या इमारती नाही. फार तर दोन मजली, तीन मजली. घरांचे दरवाजे मात्र केवढाले आहेत.

त्या शान्त वातावरणानं अतुलचं कोवळं मन उदास झालं. फार एकटं एकटं वाटलं त्याला. आपले मित्र, आपली शाळा, आपलं घर सगळ्यांची त्याला खूप आठवण झाली. राग त्याच्या मनात मावेनासा झाला.

अतुलला आठवलं, त्या दिवशी घरचा म्हातारा गडी बिरजू शाळेत आला होता. आजोबांची तब्येत जास्त झाली होती. बिरजू रडत होता. त्याच्या थकल्या हाताला धरून आपण घरी आलो. घरी येताच आजोबांनी हात पसरून आपल्याला मिठीत घेतलं.आजोबांच्या त्या भल्या मोठ्या छातीवर मान टाकून आपण कितीतरी वेळ रडत राहिलो. या अनिलदांनीच त्यांची आणि आपली मिठी सोडवली. आई आजोबांच्या पायांशी बसून रडत होती. बाबा सुन्नपणे उभे होते. दीदी आईच्या पाठीला बिलगली होती. दाराआडून सुखियाचं रडणं ऐकू येत होतं. आपण रागानं अनिलदांना बाजूला केलं, आजोबांना मिठी मारायला गेलो पण आजोबा मरून गेले होते.

त्यांची जागा घेणारा हा पाहुणा अनोळखी होता. मानेवर रुळणारे

पांढरे शुभ्र केस, अंगात शर्ट, बंडी, धोतर, रंग काळा सावळा, तोंडावर सुरकुत्या पण चेहरा कसा निश्चयी.

" कसला विचार करतो आहेस अतुल. " दांनी विचारलं. अतुल बोलला नाही. त्यांनी खांद्याभोवती टाकलेला हात खांदा चोरून नकोसा केला.

" आवडलं तुला पाँडेचरी ? "

" अं हं. आहे काय आवडण्यासारखं ! "

" बरोबर. अजून तू तसं काही पाहिलंच नाहीस. अरे, मी सेजदांच्याबरोबर इथे पहिल्यांदा आलोना तेव्हां तर पाँडेचरीत गुंडांचा नुसता सुळसुळाट होता. चोर, दरोडेखोर, खुनी, दारुडे, यांचं राज्य होतं. जिथं तिथं दारुची दुकानं होती. हे खुलं बंदर होतं ना तेव्हा. जहाजं भरून परदेशातून दारू यायची. सतत खून, मारामारी, दंगल चालू असायची. कायदा आणि सुव्यवस्था नव्हतीच मुळी. कोण देणार लक्ष ? इंग्रजांचं राज्य इथं नव्हतं. फ्रेंचांची वसाहत होती. त्यांनी विशेष लक्षच घातलं नाही. अंधार पडल्यावर घराबाहेर पडणं शक्यच नव्हतं. बायकापोरं दारं लावून बसून रहात. "

अतुल बोलला नाही. त्याला दांच्या बोलण्यात काहीच रस वाटत नव्हता. या इथून सुटका करून परत कलकत्त्याला कसं जाता येईल याचा तो विचार करत होता.

इथे आकर्षण वाटावं असं काहीच नव्हतं.

रिक्शा थांबली. अनिलदांचं सामान जवळजवळ नव्हतंच. त्यांना काहीच लागत नव्हतं जसं. खाण्यापिण्याचा सोस नाही की कपड्यांचा नाही, सोई-गैरसोईचा विचार नाही. अतुलनं अनिलदांकडे पाहिलं. ते शान्त होते.

" या दा ... ये रे अतुल."

एक गोड, प्रेमळ आवाज कानावर आल्यावर अतुलनं वर मान करून पाहिलं. घराच्या दाराशी त्याच्या दीदीएवढी एक मुलगी उभी होती. पांढरी साडी, काळी सावळी, पाठीवर केस मोकळे सोडलेले, कपाळावर मोठं कुंकू.

तिनं सामान आत घेतलं. दांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. अतुलच्या खांद्याभोवती हात घालून त्याला जवळ घेतलं. अतुलनं अंग चोरून घेतलं.

" बरी आहेस ना बेटी ?"

" हो."

" हा अतुल आता तुझ्या ताब्यात हं सुनी. अतुलबेटा, ही तुझी सुनीतादीदी. मी आश्रमात जाऊन येतो." असं म्हणत दांनी हातपाय धुतले, चपला घातल्या. बाहेर पडू लागले.

" दा इतक्या लांबचा प्रवास करून आला आहात. दूध घ्या, अंमळ विश्रांती घ्या, मग जा," सुनी म्हणाली.

" नाही बेटा, समाधीचं दर्शन घेतल्याशिवाय थकवा जाणार नाही. आणि तोंडात पाणी पण पडणार नाही हे तुला माहीत नाही का ? "

दा घराबाहेर पडले. अतुलनं खोलीत नजर फिरवली. एक टेबल, खुर्ची, चटई, एका फ्लॉवरपॉटमध्ये ठेवलेली चार हसरी फुलं, भिंतीवर दोन फोटो, त्यावर घातलेले ताजे हार आणि काही पुस्तकं, एवढंच होतं त्या खोलीत. त्याचं मन परत उदास झालं. इथे रहायचं आपण ? आपल्या घरी केवढं फर्निचर आहे. मुख्य म्हणजे लोळायला गाद्यागिरद्या आहेत. रेडिओ आहे, फिल्मी मॅगेझिन आहेत. इथे कसं करमायचं आपल्याला ?

" अतुल, अंघोळ करून घेतोस ना ? "

या मुलीला आपलं नांव कसं कळलं ? ही इतक्या आपलेपणानं, खूप ओळख असल्यासारखी कशी वागते आहे याचा विचार करीत अतुल मोरीत शिरला. त्याचं तोंड कडू झालं. इथे शॉवर नाही, बसायला चौरंग नाही, शॅम्पू नाही, गरम पाण्यासाठी गिझरदेखील नाही. एक बादली, एक तांब्या, साबण, एकुलता एक उंचावर उभा नळ, एवढंच होतं त्या मोरीत.

" गरम पाणी कुठंय ? " अतुल रागानं ओरडला.

" या हवेला गरम पाणी लागत नाही. नळाच्या पाण्यानं अंघोळ कर, ऊब येईल तुझ्या अंगात. " एवढं बोलून सुनीता निघूनसुद्धा गेली.

अतुलनं धाड्कन मोरीचं दार लावलं. सुनीता हळूच हसली.

अतुल अंघोळ करून बाहेर आला. मोरीत डोकावून पहात सुनीता म्हणाली,

" अतुल राजा, आपले कपडे नाही धुतलेस ? "

" कपडे ? मी ? "

" हो, इथं प्रत्येकानं आपलं काम आपण करायचं असतं. "

" पण मी नाही करणार. मला नाही सवय, " अतुल हट्टीपणानं म्हणाला.

" असं होय ! बरं आज तू दमून आला आहेस म्हणून मी धुवून टाकीन तुझे कपडे, पण उद्यापासून तुझं तू करायला हवं हे सगळं. ये दूध तापवलंय. "

सुनीतानं अतुलच्या समोर दुधाचा कप, दोन केळी आणि काळ्या पावाचे दोन तुकडे ठेवले. जाम दिला. ते सगळे उचलून बाहेर फेकून द्यावं, तो कप फोडून टाकावा असं अतुलला वाटलं. पाय आपटत तो दाराशी येऊन उभा राहिला. सुनीतानं हसतच सगळं उचलून ठेवलं.

"तू अशी हसतेस का ? " अतुलनं रागानं विचारलं.

"दीदी म्हणून हाक मार म्हणजे तुला कळेल मी का हसते ते."

"छट् माझी दीदी कधीच असं वागत नाही."

"मी पण तशीच छान वागेन. मला तू खूप आवडलास."

"पण मला नाही तू आवडलीस."

"ओ माँ ! खरंच ?" हसतच ती म्हणाली. अतुलनं तिच्याकडं चिडून पाहिलं. तोच अनिलदा घरात आले, सरळ मोरीत गेले. अंघोळ करून आपले कपडे धुवून बाहेर आले. सत्तरी ओलांडलेल्या अनिलदांकडे अतुल पहात राहिला. त्यांनी अतुलचे पण कपडे धुतले होते. संकोचून अतुल पुढे झाला. त्यानं त्यांच्या हातातून कपडे घेतले. दीदीकडे पाहिलं.

"ये अतुल, आपण कपडे वाळत घालू या," ती म्हणाली. घराबाहेर अंगणात दोरीवर कपडे घातले तेव्हा अतुल न कळत आपले कपडे झटकून तिच्या हातात देत होता.

"सुनीता,तुम्ही दोघांनी काही खाल्लं की नाही?" दांनी विचारलं.

"नाही."

"अग, नाही काय ? पोर उपाशी असेल. मद्रासला जेवलो त्यावर काही नाही त्याच्या पोटात."

"मी तर आज जेवले सुद्धा नाही. किती उशीर झाला तुमच्या गाडीला !"

"हो, वाटेत गाडी बिघडली. बरं आण आता खायचं."

"अतुलला दिलं होतं. नको म्हणाला." तिनं सांगितलं.

"का रे ? ये बेटा, ये. तू नाही खाल्लंस तर तुझी ही दीदी उपाशी राहील. मग मला पण काही खाता येणार नाही."

अतुलला वाटलं गंमतच आहे या माणसांची. मला असलं घाणेरडं खाणं आवडत नाही; त्यासाठी यांनी कशाला उपाशी रहायचं! खरंतर यावेळी पकोडे, गुलावजाम, रसगुल्ले मिळाले तर काय मजा येईल.

अतुलनं दुधाचा कप तोंडाला लावला. एक केळ खाल्लं पण त्या काळ्या पावाला हात म्हणून लावला नाही. त्याला सणकून भूक लागली होती. कधी जेवायला मिळतं असं झालं होतं.

" जेवायचं नाही ? " शेवटी त्यानं विचारलं.

" जेवणाची वेळ टळून गेली बेटा, किचन केव्हाच बंद झालं असेल. " दा म्हणाले.

" म्हणजे ? "

" म्हणजे इथे सगळ्या गोष्टींच्या वेळा ठरवून दिलेल्या आहेत." सुनीता म्हणाली.

अतुलचं डोकंच फिरलं, जेवायची वेळ माणसं जेवतील ती. आपली आई नाही असं कधी म्हणाली. बाबा कित्ती रात्री येतात जेवायला. बसून रहाते बिचारी वाट पहात. भुकेनं आपला जीव चाललाय आणि दोघंही थंडपणे नियम सांगताहेत.

" मी इथं राहणार नाही. उद्या जाणार परत." अतुल म्हणाला.

" इश्श ! भूक लागली म्हणून परत, कशाला जायला हवं रे ? ये, हे बघ तुझ्या आईनं किती किती नि कायकाय दिलंय खायला. लवकर ये हो नाहीतर सगळे रसगुल्ले मी खाऊन टाकीन. डाळमोट पण मस्त आहे. असला पेठा तर मी जन्मात खाल्ला नाही. " तोंडात बोकाणा भरत सुनीता म्हणाली.

" अग सुनीता, सावकाश ..." दा म्हणाले.

" या दा, तुम्ही पण घ्या नं. "

" नको. तुम्ही दोघं खा. "

अतुल तसाच उभा होता रागावून. अनिलदांनी त्याला जवळ घेतलं, थोपटल्यासारखं केलं आणि म्हणाले,

" चल बेटा, घे खाऊन. असं रागावू नये सारखं. माँला आवडणार नाही."

" माँ ? "

" हो. ती पहा. तुझी, माझी साऱ्या जगाची आई."

अतुलनं त्या फोटोकडे पाहिलं. दोन तेजस्वी डोळे त्याच्याकडे पहात होते. ओठावर खूप माया असणारं हसू होतं.

त्या फोटोकडे पाहता पाहता अतुलनं रसगुल्ला तोंडात ठेवला.

# २

" चलतोस ना रे जेवायला ? "

अनिलदा अतुलला म्हणत होते. संध्याकाळी दा आणि दीदी दोघं ग्राऊंडवर गेले होते. अतुलपण बरोबर गेला होता. सत्तरी ओलांडलेल्या दांना व्यायाम करताना पाहून अतुल चकित झाला होता. दीदी तर पांढरा शर्ट, लांडी चड्डी घालून निरनिराळे खेळ खेळत होती. लहान मोठे स्त्री पुरुष, मुलं मुली किती मोकळेपणानं आपल्याला साजेसा व्यायाम घेत होते. सगळीकडे शान्त होतं, भलतीच शिस्त होती. अतुलला आपल्या शाळेच्या ग्राऊंडची आठवण झाली. फार कमी मुलं व्यायाम घेत. व्यायाम करायचा त्यालापण खूप कंटाळा यायचा. मैदानी खेळात पण त्याला विशेष रस नव्हता. त्यापेक्षा आरामात बसून पुस्तक वाचणं हा त्याचा आवडता उद्योग होता. पण इथे तर व्यायाम सुद्धा किती सुंदर वाटतोय पहायला. मुख्य म्हणजे कुणाच्या चेहऱ्यावर कंटाळा, त्रास दिसत नाही.

जबरदस्तीनं कुणी त्यांना इथे पाठवलंय असंही वाटत नाही. ग्राऊंडवर अंधार पडू लागला, शिट्टी वाजली आणि व्यायाम संपला. सगळे मजेनं घराकडे परतू लागले. दीदी आपला व्यायामाचा पोषाख उतरवून आली. ती पांढरी साडी नेसली होती. दा मात्र तसेच होते. पांढरी हाफ पॅन्ट आणि हाफ शर्ट. हात पाय धुवून ताजे-तवाने होऊन दा म्हणत होते,

"चलतोस ना रे जेवायला ?"

ग्राऊंडवरच्या घड्याळात सात वाजले होते.

"कुठे हॉटेलात जायचं ?" अतुलनं विचारलं. हॉटेलात मस्तपैकी जेवायला मिळेल, सकाळपासून उपाशीच आहोत आपण. हवं ते मागून घ्यायचं, तळलेला मासा खायचा, या विचारानं तो आनंदात होता.

"नाही. ऑरोविल किचनमध्ये जायचं आपण. रोज आम्ही तिथेच जेवतो." दा म्हणाले.

"का ? घरी नाही करत स्वयंपाक ?"

"नाही. दैनंदिन गरजांसाठी माँच्या साधकाला वेळ आणि श्रम वाया घालवावे लागत नाहीत. ती सगळ्यांचं कुशल क्षेम वाहते."

दांचा परत तोच भावपूर्ण, भक्तिपूर्ण आवाज ऐकून अतुलचा सगळा मूडच गेला. ते काय म्हणाले ते त्याला कांही कळलं नव्हतं. हॉटेलात न जाता कुठेतरी किचनबिचनमध्ये जाणं त्याला मान्य नव्हतं पण करतो काय ? दा आणि दीदीच्या पाठोपाठ तो पाय ओढत निघाला. त्यानं दीदींकडे पाहिलं, ती मिस्किलपणे हसत होती. अस्सा राग आला तिच्या हसण्याचा पण करतो काय विचारा ?

"हे म्युनिसिपल पार्क बरं का अतुल. इथून डाव्या हाताला वळलं की किचन. वाट लक्षात ठेव. एकटं यावं लागलं तर सापडायला पाहिजे रस्ता."

" सुनी, पहिल्याच दिवशी त्याची उगाच चेष्टा करू नकोस. अतुल, ही तुझी दीदी नुसती वयानं वाढली आहे. स्वभाव मात्र आहे लहान मुलासारखा. "

" छे ! मी नाही लक्ष देत अशा बोलण्याकडे ! " अतुल मुद्दामच म्हणाला.

" बघून घेईन हं छोटे भैय्या " सुनीता म्हणाली आणि किचनच्या दरवाज्यातून पट्कन आत सटकली.

अतुल आपल्या मोठाल्या उत्सुक डोळ्यांनी भोवताली पहात होता. त्या आवारात कितीतरी स्त्रिया, पुरुष, पोरंबाळं वावरत होती. ग्राउंडवरचीच शिस्त, स्वच्छता, शांतता इथेही होती. जेवणखोलीत ते आले.

चांगली लांबरुंद खोली होती ती. चटया अंथरल्या होत्या. पुढ्यात लहान लहान वितीच्या उंचीची स्टुलं मांडली होती. लांबलचक काऊंटरवर थाळे होते, वाट्या, चमचे होते, चारपाच मोठाली झाकलेली पातेली होती. दह्याच्या वाट्या, साखर, लोणचं ... केळी ...

दांनी स्वतःसाठी एक थाळा उचलला, वाटी चमचा घेतला, अतुलच्या पण हातात दिला. दोघं काऊंटरपाशी आले. दोनचार मुली पदार्थ वाढून देत होत्या.

" दा, नवीन पाहुणा दिसतो, " एकीनं विचारलं.

" हो माझा नातू आहे. कलकत्त्याहून आलाय. " दा म्हणाले.

" दा, धन्य आहे तुमची. सुनीताला आपली मुलगी म्हणून लहानाची मोठी केली, आता हा नातू. स्वतःचा संसार नाही पण ही माया मोठी." दांच्या पाठोपाठ आलेल्या एका पोक्त बाईनं म्हटलं,

" वा मी दांचीच मुलगी आहे हं. सांगून ठेवते बा तुम्हाला..." सुनीता आपली थाळी पुढे करत म्हणाली. त्यावर सगळेच हसले.

अतुल दांच्या मागोमाग एका चटईवर बसला. समोरच्या स्टुलावर आपली थाळी ठेवून पहात राहिला. त्याची भूकच मरून गेली. त्याच्या नकळत त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. भात, वाटीभर डाळ, पालेभाजी, मोड आलेल्या धान्याची कोशिंबीर, पापड आणि बस. परोटे नाही, गोड नाही, मासा नाही, साखर घालून आईनं खास तयार केलेली लस्सी नाही. छे! आपण आता इथे मुळीच रहायचं नाही. हे काय जेवण आहे? तो काळा पाव...शी– !

" दा..."

दा खाली मान घालून जेवत होते. भोवताली बसलेली सगळीच माणसं ते अन्न चवीनं खात होती.

" दा ..."

" काय रे ? " त्यांनी विचारलं.

" पोळी हवीय. " तो चिडून म्हणाला.

" आज पोळीचा वार नाही बेटा. भात खाऊन तर पहा. डाळ छान झालीय. तुला साखर हवीय का ? आणखी काही लागलं तर उठून घेऊन ये. पोटभर जेव. सकाळी जेवलोच नाही आपण. " दां च्या शांत बोलण्यानं अतुलचं डोकं आणखीनच भडकलं. ते ताट उडवून लावावं असं त्याला मनापासून वाटलं. आपली आई नाना प्रकारचे पदार्थ करायची, पण आपलं सगळं लक्ष खेळात. 'हे खाऊन तरी बघ, राजा. तुझ्यासाठी गरम गरम केलंय मुद्दाम.' आई हरतऱ्हेनं समजावयाची, पण आपण तिचं कधी ऐकलंच नाही. आईच्या आठवणीनं अतुलच्या घशात हुंदका दाटला.

" हा भात खाऊन तर पहा भैय्या, आवडेल तुला. या तांदुळाला छान चव आहे. ही कोशिंबीर पण खूप पौष्टिक आहे. "

सुनीतेच्या प्रेमळ आवाजानं अतुलचा राग कमी झाला. ती त्याच्या जवळ बसली. त्याला आग्रहानं जेवू घातलं.

जेवणं झाली. प्रत्येकानं आपली ताटवाटी उचलली. अतुल पण उठला. दीदीनं त्याच्या हातात त्याचं ताट दिलं. जेवण-खोली बाहेर आल्यावर अंगणात डाव्या हाताला भांडी स्वच्छ करण्याची जागा होती. एक डबा होता त्यात उरलेलं अन्न टाकलं. ओळीनं बेसीन बसवले होते. साबणाचा फेस होता, भांडी घासायला स्पंज होता. इतरांचं बघून अतुलनं आपलं ताट, वाटी, भांडं, चमचा साबणानं घासला, पाण्यानं धुतला. मध्यभागी मोठ्या पातेल्यात पाणी उकळत होतं. एका माणसाच्या हातात मोठी सांडशी होती, तिच्या टोकाला फडकं गुंडाळलं होतं. त्या माणसानं अतुलच्या हातातून भांडी घेतली, उकळत्या पाण्यात घालून बाहेर काढली. खुंट्यांवर टॉवेल होते. इतरांप्रमाणे एका टॉवेलनं अतुलनं भांडी पुसली. निरनिराळ्या कप्प्यात ठेवून दिली.

ही सगळी कामं करत असताना आश्चर्य म्हणजे अतुलला राग आला नव्हता सगळ्यांबरोबर काम करण्याचा आनंद त्याला मिळाला होता. त्या शिस्तीचा त्याच्यावर नकळत परिणाम झाला होता. म्हाताऱ्या अनिलदांनी पण सगळं काम केलं होतं. आपले बाबा तर स्वत: कधी पाणी सुद्धा घेऊन पीत नाहीत. आई नाचत असते बिचारी. सारखी उठ-बस करत असते.

तोच डोक्यावर टोपलंभर केस वाढलेला, अंगावर जेमतेम कपडे असलेला, पाय अनवाणी असा एक हिप्पी आपली थाळी घेऊन आला. अतुलच्या मनात आलं, आता हा तरुण आपली थाळी तशीच टाकून चालता होईल. मग ही मुकाट बाहुल्यांसारखी वावरणारी माणसं

भांडतील, त्याला रागावतील, तो मारामारी करील, मजा येईल. इथे आल्यापासून काही मजाच झाली नाही.

पण तसं काही झालं नाही. त्या हिप्पीनं मुकाट्यानं ताट-वाटी धुतली, पुसली, जागच्या जागी ठेवून दिली.

दा, अतुल आणि दीदी घराकडे निघाले. किचनच्या बाहेर पडता पडता अतुलनं वळून पाहिलं, माँ चा फोटो त्याच्याकडे पाहून हसत होता.

स्वच्छ चांदणं पडलं होतं. त्या इमारतीला वळण घालून तिघंजण रस्त्यावर आली. समुद्राच्या लाटांचा आवाज कानावर पडताच अतुलचं मन एकदम प्रसन्न झालं. समुद्राचं विलक्षण वेड होतं त्याला.

"दा, समुद्र इतका जवळ आहे? किचनच्या मागच्याच बाजूला?" त्यानं विचारलं.

"हो, आश्रमाच्या जवळ जवळ सगळ्याच इमारतींना समुद्र जवळ आहे. आश्रमाचा प्रेस तर समुद्राच्या कडेला आहे. शिवाय लायब्ररी, टेनिसचं ग्राऊंड, प्लेग्राऊंड पण जवळच आहे, एक फर्लांगाच्या अंतरावर."

"आणखी खूप गोष्टी आहेत. दाखवीन मी तुला," सुनीता म्हणाली. जरावेळ कुणी काही बोललं नाही. समुद्राच्या काठानं चालत राहिले.

"दा, मी तुमच्यावर रागावले आहे." सुनीता म्हणाली.

"का बेटा, का रागावलीस आपल्या म्हाताऱ्या बापावर?"

"कलकत्त्याहून जाडजूड पाकीट आलं काय आणि तुम्ही लगेच गेला काय! बरं गेल्यावर काही पत्रं बित्रं! मी आपली करतेय काळजी! पत्र आलं ते यायच्या दिवशी." सुनीता रुसून म्हणाली.

"रागावलीस की थोडं बोलता येतच नाही का ग तुला?" दां नी हसत विचारलं.

"उगाच विषय बदलू नका हं दा. सांगा बघू काय झालं ते ?"

"सांगीन कधीतरी."

"का माझ्यासमोर सांगायचं नाही ?" अतुलनं विचारलं, त्याचा स्वर दुखावला होता.

"छे रे राजा बेटा, तुझ्यापासून लपविण्यासारखं काही नाही."

"मग सांगा तर."

"अस्सं. गोष्ट ऐकायची लहर आली वाटतं."

"गोष्ट आहे ती ?"

"हो खूप मोठी, खूप जुनी..."

समुद्राच्या घनगंभीर आवाजात आपला स्वप्नाळू आवाज मिसळून दा सांगू लागले.

"अतुलचे आजोबा आणि मी लहानपणापासून एकत्र वाढलो. जुळे भाऊच जसे. ते आजारी होते. मरताना मला भेटायची इच्छा होती. त्यांच्या सुनेनं म्हणजे अतुलच्या आईनं पत्र पाठवलं, मी गेलो. मित्र भेटला पण जगला नाही."

"पण मला इथं का आणलं ?" अतुलनं विचारलं.

"कां रे अजून चोवीस ताससुद्धा झाले नाहीत आणि कंटाळलास?"

"हो इथं रहायला चांगली जागा नाही की जेवण धड नाही. मला नाही आवडलं."

"हळूहळू इथली राहणी तुझ्या अंगवळणी पडेल, मग तुला सगळं आवडू लागेल. तुझ्या आजोबांची इच्छा म्हणून इथंच रहा. खूप शीक शहाणा हो. त्यांना जे करावं वाटत होतं ते तू कर..." दा म्हणाले.

"म्हणजे ?"

"सांगीन. सगळं हळूहळू कळेल तुला."

"ह्यॅं ही काय गोष्ट झाली ?" अतुल म्हणाला.

दा हसले. मोकळेपणानं म्हणाले, "अगदी आपल्या आजोबा-सारखा आहेस."

अतुलच्या मनात प्रश्नांची गर्दी झाली होती. पण दा खाली मान घालून हात पाठीशी बांधून तरातरा पुढे झाले. दीदीनं अतुलच्या खांद्याभोवती आपला हात टाकला. दोघं मुकाटचानं दांच्या मागून चालत राहिले.

घर आलं. झोपण्यापूर्वी दा वाचत बसले. दीदीनं माँच्या फोटोला फुलं वाहिली. उदबत्ती लावली आणि मांडी घालून, डोळे मिटून त्या फोटोपुढे बसून राहिली.

त्या दोघांकडे पाहता पाहता अतुलचा डोळा कधी लागला त्याचं त्यालाही कळलं नाही. त्याच्या अंगाखाली कॉट नव्हती. जाडजूड गादी नव्हती. चटईवरच त्यानं अंग टाकलं, डोळे मिटले. प्रार्थना झाल्यावर दीदीनं त्याच्या अंगावर शाल टाकली. त्याच्या मानेखाली उशी दिली. त्याच्या शेजारी चटई घालून आडवी झाली.

अनिलदा बराच वेळ वाचत होते. मग त्यांनी कागद पुढे ओढले, लिहीत राहिले.

# ३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ६००३३.. वि...
क्रमांक...३८९७...नोंद दि...२२।३।७३

"का रे अतुल, असा गप्प कां आहेस ? बोल की माझ्याशी काहीतरी." खोलीतला केर काढता काढता सुनीता म्हणाली. तरीही अतुल बोलला नाही.

"बरं नको बोलूस बाबा. कट्टी तर कट्टी. या बादलीत थोडं फिनेल घाल आणि फरशी पुसून टाक बरं." ती म्हणाली.

"कोण मी ? छे, मी नाही असली कामं कधी केली."

"कोणतेही काम करायची तयारी हवी हो इथं. मी सांगते फरशी कशी पुसायची ते."

"नाही."

"असं नाही करायचं हं छोटे भैय्या. आज सकाळी नाही का मी तुझं अंथरुण आवरलं, तुझ्या कपड्यांच्या घड्या घातल्या."

"असेल. मला आईची आठवण येतेय. दा कुठेत ? त्यांना सांगून जातो परत कलकत्त्याला." तो म्हणाला.

"दा आश्रमांत गेलेत्."

"सारखे काय जातात तिथे ? आहे काय त्या आश्रमात."

"आपण अंघोळ, नाश्ता करू, मग मी घेऊन जाईन तुला."

"मला नाही काही पहायचं," अतुल हट्टीपणानं म्हणाला.

"बरं नको पाहूस. तुला एक गोष्ट सांगते."

"मी आता लहान नाही गोष्टी ऐकायला."

"खरंच की. बरं मग तुला एक गोष्टीचं पुस्तक देते, ते वाचत बस. कामात मदत करत नाही तर नको करूस, रोज मी एकटी करतेच की."

दीदीनं त्याच्या हातात एक सुंदर पुस्तक दिलं. कव्हरवर एका सुरेख मुलाचं चित्रं होतं. त्याच्या अंगावर खूप खिसे असलेला सूट होता. डोक्यावर भरदार केस आणि चेहरा गोड, मुख्य म्हणजे डोळे खूपच चमकत होते. चेहऱ्यावर बुद्धीचं तेज होतं.

अतुलनं पुस्तक उघडलं, वाचू लागला.

* * *

मुंबईच्या किनाऱ्यावर एक भली मोठी बोट उभी होती. समुद्राच्या पाण्यावर ती खालीवर डुलत होती. खलाशांची धावपळ चालू होती. उतारूंची ये जा होत होती. अशा वेळी किनाऱ्यावर घोष कुटुंब उभं होतं. स्वत: डॉक्टर कृष्णधन घोष, त्यांची अत्यंत सुंदर अशी वायको स्वर्णलता, तीन मुलं आणि एक लहानशी मुलगी. चारी मुलं मोठ्या उत्सुकतेने त्या भल्यामोठ्या बोटीकडे पहात होती. या बोटीनं ते आपल्या आईवडिलांबरोबर इंग्लंडला जाणार होते. समुद्रात खूप दिवस प्रवास करायला मिळणार होता. मजा होती.

सात वर्षांचा अरविंद आपल्या धाकट्या बहिणीचा, सरोजिनीचा हात धरून त्या निळ्या ढगांकडे, निळ्या पाण्याकडे आणि दूर क्षितिजाकडे पहात होता. त्याच्या डोक्यात नक्कीच काहीतरी विचार

चालू होते, कारण त्याची नजर एके ठिकाणी लागून राहिली होती. अरविंदचा थोरला भाऊ विनयभूषण, आणि त्याच्या पाठीला पाठ लावून आलेला मनमोहन एकमेकांशी बोलत इकडची तिकडची मजा पहात होते. सगळयांच्या अंगावर पाश्चात्य पोषाख होता. या मुलांचे वडील डॉ. कृष्णधन आपल्या रंगामुळेच भारतीय वाटत, नाही तर त्यांचं वागणं, बोलणं, भाषा सगळंच इंग्रज साहेबासारखं होतं. ते परदेशात राहून डॉक्टर होऊन आले होते. त्यांना इंग्रजांचं वागणं, त्यांची शिस्त, त्यांची कष्ट करण्याची तयारी, स्वच्छता, चांगल्या सवयी खूपच आवडल्या होत्य ा.आपल्या तिन्ही लाडक्या मुलांनी पण तसंच व्हावं म्हणून ते आपल्या मुलांसह इंग्लंडला निघाले होते. अरविंद आणि त्याच्या दोन्ही थोरल्या भावांना तिथे शिकायला ठेवून ते आपल्या बायको मुलीसह भारतात परतणार होते.

अरविंद त्यांचा सगळ्यात लाडका आणि आवडता मुलगा होता. सात वर्षांचा तर होता तो, पण त्याच्याबद्दल डॉक्टरांना खूपच आशा वाटत होती. अरविंद हुषार होता. ते त्याला मोठा ऑफिसर करणार होते. त्याला खूप खूप शिकवणार होते. आय. सी. एस्. झाल्यावर तो बडा ऑफिसर म्हणून भारतात येणार होता.

वडिलांनी त्याच्याजवळ वारंवार बोलून दाखविलेली इच्छा, त्याच्याबद्दलच्या आशाआकांक्षा याचाच तर विचार अरविंद करत नव्हता ना !

इतक्या लहान वयात आईपासून दूर, परदेशात अरविंद जाणार होता, पण त्यामुळें तो घाबरला, बावरला नव्हता. आईला सोडून जायचं म्हणून रडला पण नव्हता. अगदी लहान असताना आईपासून, घरापासून दूर दार्जिलिंगला आपल्या दोन्ही भावंडांबरोबर अरविंद शिकायला राहिला होताच की.

लंडन येथे सेंटपॉल स्कूलमध्ये सात वर्षांच्या अरविंदला प्रवेश मिळाला. अरविंद, विनयभूषण, मनमोहन तिघंजण ड्रुएट नावाच्या एका पाद्री गृहस्थाकडे रहात असत. हे गृहस्थ लॅटिन भाषेचे विद्वान होते. त्यांनी अरविंदला लॅटिन भाषा शिकवली. अरविंद लहान असल्यामुळे घरी असायचा. थोरले दोघं ग्रामरस्कूलमध्ये भरती झाले. ड्रुएट यांची बायको अरविंदला इतिहास, भूगोल आणि फ्रेंच भाषा शिकवायची. अरविंदला कोणतीही भाषा चटकन येत असे. लहान वयातच वाचनाची गोडी त्याला लागली होती. वेळ मिळाला की, अरविंद नाना लेखकांची पुस्तकं वाचीत असे. ख्रिश्चन लोकांचा बायबल हा धर्मग्रंथ त्यानं वाचला. शेक्स्पिअर या लेखकाची नाटकं वाचली. शेलीचं काव्य वाचलं, कीटस् या लेखकाची पण पुस्तकं वाचली.

सेंट पॉल या शाळेत भरती करण्याच्यावेळी डॉ. वॉकर नावाच्या हेडमास्तरांनी अरविंदची परीक्षा घेतली. लॅटिन भाषेवरचं त्याचं प्रभुत्व पाहून ते थक्क झाले. मोठ्या हौसेनं त्यांनी अरविंदाला ग्रीक भाषा शिकवण्याचं ठरवलं. डॉ. वॉकर यांचा हा भारतीय विद्यार्थी मोठा हुशार निघाला. पाच वर्षं अरविंद या शाळेत शिकला. त्यानं साहित्यातलं बटरवर्थ आणि इतिहासाचं बेडफोर्ड ही बक्षीसं मिळवली. या काळात अरविंद वादविवादात भाग घेत असे. निरनिराळ्या विषयांवर भाषणं देत असे.

तेव्हा बारा तेरा वर्षांचा तर होता अरविंद !

एक हुषार विद्यार्थी म्हणून अरविंदनं लंडनमध्यें नाव मिळवलं. गुरुजनांनी त्याची पाठ थोपटली, त्याचं कौतुक केलं पण याच वेळी ही तिघं भावंडं मोठ्या अडचणीत सापडली, त्यांच्या वडिलांनी, डॉ. कृष्णधन घोषांनी पैसे पाठवायचं बंद केलं. परदेशात, थंड हवेच्या ठिकाणी पोटभर अन्न नाही की अंगभर कपडा नाही असे दिवस

काढावे लागले. विनयभूषण नोकरी करू लागला पण या नोकरीत त्याला महिन्याला जेमतेम चौदा पंधरा रुपये मिळत. यावर तिघांचा खर्च भागणं कठिणच होतं. जवळ जवळ वर्षभर तिघं भाऊ सँडविच, चहा, लोणी सकाळी खात; तर संध्याकाळी एक पेनी खर्च करून कवाब घेत. बस एवढंच खाणं त्यांना परवडत होतं. त्यातल्या त्यात अरविंदचे शिक्षणाचे हाल होत नव्हते, कारण त्याला स्कॉलरशिप मिळत होती. आय. सी. एस. च्या परीक्षेच्या तयारीसाठी ऐंशी पौंड मिळत होते. पण एवढ्या रकमेत तिघा भावंडांचा खर्च भागत नव्हता. अरविंद या सगळ्या अडचणींमुळे निराश झाला नाही किंवा त्यानं आपल्या वडिलांना दोष दिला नाही. उलट आपल्या वडिलांबद्दल मोठ्या प्रेमानं, आदरानं बोलायचा. त्यांची अडचण खरी असेल म्हणूनच ते आपल्याला पैसे पाठवत नाहीत, हा त्याचा विश्वास होता. अरविंदनं अभ्यासाकडे पण दुर्लक्ष केलं नाही. इंग्रजी व फ्रेंच भाषेतील साहित्य, इतिहास वाचून तो ज्ञान मिळवत राहिला.

सेंट पॉल या शाळेच्या शेवटच्या दोन वर्षातच अरविंदची आय. सी. एस्. साठी निवड झाली होती. आय. सी. एस.ची तयारी त्याला स्वतःच करायची होती, कारण कुणी शिक्षक ठेवणं परवडत नव्हतं. त्याच वेळी किंग्स कॉलेजमध्ये ट्रायपॉसच्या परीक्षेची पण तयारी करायची होती. सोपी गोष्ट नव्हती पण अरविंद हुषार होता, कष्टाळू होता. त्याला विद्येची खरी गोडी होती, निरनिराळ्या भाषा शिकण्याचा नाद होता. ट्रायपॉसच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेत अरविंदनं पहिला वर्ग पटकावला. इतकंच नव्हे, याच वेळी अरविंद कविता लिहीत असे.

किशोर वयातच अरविंदच्या मनात देशप्रेमाचा झरा वाहू लागला होता. मातृभूमीवर होणाऱ्या अन्यायानं त्याचं मन बेचैन झालं होतं. देशबांधवांवर होणारे अत्याचार वाचून त्याचं मन उदास होत होतं.

अरविंदचे आजोबा म्हणजे आईचे वडील राजनारायण बोस फार मोठे धार्मिक, देशभक्त आणि विद्वान गृहस्थ म्हणून प्रसिद्ध होते. अरविंद त्यांना दादू म्हणत असे. दादूंनी अरविंदला लहान वयातच मोठमोठ्यांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. ईश्वरचंद्र विद्यासागर या थोर समाजसुधारकाची माहिती लहान वयातच मिळाली होती. बंकिमचंद्रांच्या राष्ट्रीय भावनेची ओळख झाली होती. रामकृष्ण परमहंस, विवेकानंद यांच्या आगळ्या जीवन कथेची ओळख लहान वयातच झाली होती. त्याच्या कोवळ्या मनावर संस्कार झाले होते ते असे, भारतीय, तेजपूर्ण आणि स्वाभिमान जागवणारे.

अरविंदचे वडील डॉ. कृष्णधन पाश्चात्य आचार विचारांचे भक्त होते. त्यांना परदेशचे वातावरण खूप आवडत असे. आपल्या मुलांचा भारतातील संस्कारांशी मुळीच संपर्क येऊ नये असं त्यांना वाटे. आपली मुलं पूर्णपणे इंग्रजांच्या पद्धतीनं वाढलेली त्यांना पहायची होती. तशीच स्वच्छतेची आवड, सतत उद्योगात राहण्याची सवय, कष्ट करण्याची तयारी मुलांत असावी असं त्यांना वाटायचं. त्यांच्या दृष्टीनं भारतीय मनुष्य अत्यंत आळशी, अडाणी आणि अस्वच्छ होता. डॉक्टरांची अशी मतं असली तरी ते गरीबांना मदत करत, फुकट औषधपाणी करत. इतकंच नव्हे तर खुलना येथे एक कालवा बांधण्यासाठी त्यांनी कष्ट केले, खूप प्रयत्न केले. गरीबांचा, शेतकऱ्यांचा त्यामुळे खूप फायदा झाला. त्या कॅनॉलला डॉ. कृष्णधन कॅनॉल असे नाव देण्यात आले. शाळा, दवाखाने, म्युनिसिपालिटी, जिथे जिथे म्हणून मदत लागत असे, तिथे तिथे डॉक्टर साहेब धावून जात.

भारतीयांच्या अज्ञानाचा, अडाणीपणाचा डॉक्टरांना राग असला तरी त्यांच्यावर झालेला अन्याय त्यांना सहन होत नसे. अशावेळी ते इंग्रजी सत्तेविरुद्ध खवळून उठत. अरविंदच्या पत्रात ते ' बंगाली '

या इंग्रजी वर्तमानपत्रातली कात्रणं पाठवत. भारतवासीयांवर ब्रिटिश सत्तेनं केलेला अन्याय, अत्त्याचार, शोषण, बळजबरी, हाल, अपेष्टा याबाबतची ती कात्रणं असत, त्याचा परिणाम अरविंदाच्या कोवळ्या मनावर खूपच झाला.

अरविंदनं आय. सी. एस्. ची परीक्षा दिली. त्यात तो उत्तीर्ण पण झाला. पण घोड्यावर बसण्याच्या परीक्षेत अरविंदला अपयश आलं. साहजिकच अरविंदला आय. सी. एस्. ऑफिसर म्हणून नोकरीवर घेता आलं नाही. अरविंदच्या वडिलांची खूप निराशा होणार होती, कारण आपले हे तीन वाघाचे बच्चे फार मोठे अधिकारी व्हावे असं त्यांना वाटत होतं, तीच त्यांची एकमेव इच्छा होती. पण अरविंद मात्र खुशीत होता. परकीय सत्तेच्या राज्यात बडा अधिकारी म्हणून मिरवायची त्याला मुळीच हौस नव्हती. त्याला घोड्यावर बसण्याच्या परीक्षेसाठी परत बोलवण्यात आलं, कारण एक हुषार तरुण म्हणून अरविंदचा सगळीकडे बोलबाला झाला होता. तिथल्या परीक्षकांना आणि अधिकाऱ्यांना अरविंदविषयी खूप जिव्हाळा वाटत होता. प्रत्येकानं आपआपल्यापरी खटपट केली पण अरविंदला आय. सी. एस्. चा मान नकोच होता, बडी नोकरी नको होती, पैसा, मान-मरातब क्षुल्लक वाटत होता. या परीक्षेच्यावेळी अरविंद लंडनच्या रस्त्यातून मनोमन कविता रचत हिंडत होता.

सात वर्षांचा असताना अरविंद आपल्या आई-वडिलांना सोडून परदेशात गेला होता. चौदा वर्षे होऊन गेली होती. आता आई-वडिलांना भेटावं वाटत होतं. अरविंद भारताकडे यायला निघाला. परत यायला आणखीही एक कारण घडलं होतं. बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांची लंडन येथे गाठ पडली होती. अरविंदला पाहताच महाराज फार प्रभावित झाले. हा तरुण इतरांपेक्षा नक्की

निराळा आहे, याच्या डोळ्यांत निराळंच तेज आहे हे त्यांना पहाताच कळलं. सयाजीराव गुणी लोकांचे चाहते होते.त्यांनी अरविंदाला बडोद्याला येण्याविषयी आग्रह केला. आपल्या संस्थानाला अशा तेजस्वी तरुणाचा नक्कीच उपयोग होईल हे महाराजांनी ओळखलं होतं.

आपला लाडका अरविंद मायदेशी येतोय्, चौदा वर्षांनी आपण त्याला भेटणार आहोत या आनंदातच डॉ. कृष्णधन घोष कलकत्त्याहून मुंबईला आले. आता आपला ऑरो मोठा झाला असेल. एकवीस वर्षांचा हा तरुण खूप छान दिसत असेल. आपण आपल्या या लाडक्या मुलाला आता आपल्यापासून दूर जाऊ देणार नाही असा विचार करीत डॉक्टर घोष मुंबई बंदरावर अरविंदच्या जहाजाची वाट पहात होते. पण दिवस जात राहिले अरविंद आला नाही. शेवटी सुट्टी संपली म्हणून डॉ. कृष्णधन कलकत्त्याला परतले. पण दुर्दैवाचा आघात झाला. कार्थेज नावाच्या स्टीमरनं अरविंद येणार होता. ती स्टीमर लिस्बन जवळ मोठं वादळ झाल्यानं बुडाली, त्यातले सगळे प्रवासी दगावले अशी बातमी त्यांना मिळाली.

आपला लाडका अरविंद मेला, आता तो कधीच दिसणार नाही, हा आघात मोठा होता. डॉ. कृष्णधन घोष यांना दुःखानं वेड लागायची पाळी आली. अरविंद...माझा अरविंद...ऑरो...ऑरो...लाडक्या राजा...असा जप करतच डॉ. कृष्णधन घोष यांनी प्राण सोडला.

पण अरविंद कार्थेज जहाजातून आलाच नव्हता. त्यानं दुसऱ्या स्टीमरमधून प्रवास केला होता.

मुंबईबंदरावर अरविंदनं पाऊल टाकलं तेव्हा मायभूमीच्या स्पर्शानं त्याच्या सर्वांगावर सुखाचा काटा उमलला. एका नव्या सुवर्ण तेजानं, दैवी शक्तीनं त्याचं स्वागत केलं. अरविंदचे डोळे भिरभिरत होते. आपल्या आई-वडिलांना शोधत होते. चौदा वर्षांनंतर धाकटी बहीण

सरोजिनीला पहावं वाटत होतं. धाकटा भाऊ बारीन्द्र हा आता कसा दिसत असेल म्हणून त्याला पहायला मन उत्सुक होतं. पण तिथे कुणीच नव्हतं.

वडिलांना चुकीची बातमी मिळाल्यामुळे तळमळत ते मरण पावले होते. आईला वेडाचे झटके येत होते. अरविंदनं अत्यंत धीरानं एवढा मोठा आघात सोसला.

* * *

अतुलनं पुस्तक मिटलं. आपले ओले डोळे शर्टच्या बाहीनं पुसले. त्याला खूप रडू येत होतं.

"का रे असा उदास का दिसतो आहेस ?" अनिलदांनी घरात पाऊल टाकताच विचारलं.

"काही नाही." अतुल हळुच म्हणाला.

"काय सुनी, झालं की नाही अजून तुझं काम ?" दांनी विचारलं.

"कुठलं ! एकटी मी किती काम करणार ? हा तुमचा लाडका नातू बसलाय् वाचत."

"मला सांग मी करतो काय काम करायचं ते" दा म्हणाले.

"काही नको मी आलेच अंघोळ करून," सुनीता निघून गेली.

"काय वाचत होतास रे ?" दांनी विचारलं.

अतुलनं मुकाट्यानं हातातलं पुस्तक दांच्या हातात ठेवलं.

"वा. आवडलं ?"

"हो. खूप."

"मग उदास का झालास ?"

"दा तम्ही ज्यांना सेजदा म्हणता ते कोण ?"

"हेच ते अरविंद, श्री अरविंद."

"तुम्ही त्यांना सेजदा का म्हणता ?"

" त्यांची धाकटी बहीण सरोजिनी त्यांना सेजदा म्हणायची. तुझे आजोबा, मी आणि आमचे कितीतरी मित्र सरोजिनीदी बरोबर अरविंदांच्या खटल्यासाठी पैसे गोळा करत कलकत्त्याच्या गल्ली-बोळातून हिंडत होतो. त्यावेळी सगळेच अरविंदांना सेजदा म्हणायचे. सेजदांच्या बरोबर मी इथे पाँडेचरीत आलो. तुझ्याएवढा तर काय थोडा लहानच होतो म्हण की. जेमतेम दहा अकरा वर्षांचा.

" हो ? "

" हो."

" तुम्हाला आई-वडिलांची आठवण नाही आली ? मला तर खूप आठवण येते आईची," अतुल म्हणाला.

" नाही. कारण सेजदा हेच माझे आई-वडील होते. नंतर माँ आली आणि तिनं आईसारखी माया केली. आत्ता तू वाचलंस ना, अरविंद परदेशात गेले तेव्हा फक्त सात वर्षांचे होते."

" हो वाचलं आणि शेवटी वडिलांची भेट झालीच नाही."

" बघ ना, मोठ्या लोकांची चरित्रं वाचून आपण शहाणं व्हायचं असतं, थोरामोठ्यांच्या अडचणी, संकटं आणि त्यातून बाहेर येण्याची त्यांची कणखर मनोवृत्ती, जिद्द हे सगळं वाचून आपण खंबीर व्हायला शिकलं पाहिजे."

" कुठलं जमतंय त्याला दादा. आईनं लाडावून ठेवलंय आधीच, आता तुम्ही डोक्यावर बसवा," आपले लांबलचक केस पुसत सुनीता म्हणाली.

" तू पण त्याचे लाड कर म्हणजे झालं," दा हसतच म्हणाले.

अतुलला मनापासून हसू आलं. तो हसताना पाहून सगळेच हसले. अतुलची अंघोळ झाली, त्यानं स्वत:चे कपडे धुवून वाळत घातले. नाश्ता झाला.

"चल भैय्या, आश्रमात जाऊ या..." दी म्हणाली.

"चल." अतुल उत्साहानं तिच्यापुढं निघाला. "दा, तुम्ही नाही येत ?" दा येत नाहीत पाहून अतुलनं विचारलं.

"दा ? अरे त्यांचं तिथे गाठोडं पुरलंय. सकाळी डोळे उघडले की आधी आश्रमात जाऊन येतात." दी म्हणाली.

"बेटी, आता म्हाताऱ्याची पण चेष्टा करतेस हो ?"

"हो, हा माझा छोटा भैय्या पण तुमच्यासारखा व्हायला नको म्हणून आधीच सावध करून ठेवतेय त्याला."

"होऊ दे ग सुनी. त्या छत्राखाली सगळ्या जगाला आश्रय मिळेल. या पोरांची काय कथा."

"पण मला एकच भाऊ मिळालाय, दा. मी नाही त्याला कुठे सोडणार." सुनीता म्हणाली.

सुनीतानं अतुलला जवळ घेतलं. अतुलनं दीदीच्या कमरेला मिठी मारली. त्याच्या भरदार केसांतून हात फिरवीत सुनीतानं डोळ्याला पदर लावला. तिच्या टपोऱ्या डोळ्यांतून दोन थेंब ओघळले होते.

दांनी डोळे मिटले. हात जोडून अज्ञात दिशेला नमस्कार केला. दार लोटून घेतलं.

# ४

अशोकाच्या झाडांनी अतुलचं स्वागत केलं. अतुलनं गोंधळून दीदीकडे पाहिलं.

"चल की रे आत." ती म्हणाली.

"हा आश्रम आहे ?"

"हो. कां ?"

"मला वाटलं होतं दाट जंगल असेल, झोपड्या असतील, मधूनच नदी वहात असेल, अंगावर वल्कलं असलेले साधू, संन्यासी असतील, होम-हवन असेल, हरणं इकडून तिकडे बागडत असतील ..."

"अरे वा, आश्रमाची तुला खूपच माहिती आहे. कुणी सांगितली?" दीदीनं हसनच विचारलं.

"आईनं रामाची गोष्ट सांगितली, शकुंतलेची गोष्ट सांगितली, तेव्हा असेच आश्रम होते. मी चित्रं पाहिली आहेत ना. सिनेमात सुद्धा आश्रम पाहिलाय." अतुल म्हणाला.

" आश्रम म्हटलं की सगळ्यांना असंच वाटतं. पण अरविंद आणि माँ यांनी या आश्रमात जुन्या आणि नव्याचा फार सुंदर संगम साधलाय. जुन्या आश्रमाप्रमाणे इथे स्वच्छता, पावित्र्य, शुचिता आहे. स्वावलंबनाचे शिक्षण मिळालेले साधक आहेत. इथे पूजा पाठ, भजन कीर्तन, होम-हवन, उपास-तापास काहीच नाही, पण गुरुजनांबद्दल आदर आहे. विद्येची प्रतिष्ठा आहे. जे जे म्हणून चांगलं आहे त्याबद्दल पूजाभाव आहे. मुख्य म्हणजे अरविंदांबद्दल आणि माँबद्दल जो भक्तिभाव आहे त्यालाच खरं महत्त्व आहे. तीच पूजा, तीच अर्चा, तेच भजन, कीर्तन. चल."

" हे कसलं चिह्न आहे दीदी ?" प्रवेश दारावर कमळाचं प्रतीक पाहून अतुलनं विचारलं. अतुलच्या या प्रश्नानं सुनीता चकित झाली. कित्येक लोक येतात जातात पण हा प्रश्न क्वचितच कुणी विचारला असेल.

" सांगते, पण तुला याचा अर्थ कळणं कठीणच आहे. हे अरविंदांचं प्रतीक आहे. त्यांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचं साररूप आहे, असं म्हटलं तरी चूक ठरणार नाही. हे बघ, हा खाली निमूळता होत गेलेला त्रिकोण आहे ना, तो सत्-चित्-आनंदाचा निदर्शक आहे. तसंच वर निमूळता होत गेलेला त्रिकोण आहे ना तो जीवन, तेज आणि प्रेमाचं प्रतीक आहे. सोप्या भाषेत सांगायचं तर मानवानं देवाला दिलेली साद आहे. मध्यभागी कमळ आहे. कमलपुष्प हे चैतन्याच्या अवताराचं प्रतीक आहे. हे बघ, या चौकोनाच्या मध्यभागी पाणी असल्याची कल्पना आहे. हे पाणी, विविधता म्हणजेच सृष्टीचे, निर्मितीचे दर्शक आहे ... कळलं काही ? "

" नाही. काहीच कळलं नाही." अतुल म्हणाला.

" त्याची मला कल्पना होती पण तुला कांहीच नसतं सांगितलं तर तुझं समाधान झालं नसतं. अरविंदांच्या आयुष्याचा, त्यांच्या विचारांचा जसजसा अभ्यास करत जाशील तसतसा तुला याचा अर्थ स्पष्ट होत जाईल. श्री. अरविंदांचं तत्त्वज्ञान शिकावं लागत नाही. इथे राहिल्यानं ते आपोआप अंगी मुरत जातं. ये आत, " ती म्हणाली.

आश्रमाच्या आवारात पाऊल टाकताच अतुलचं मन एकदम प्रसन्न झालं. उजव्या हातालाच रंगीबेरंगी फुलांचा ताटवा होता. विलक्षण शांतता, स्वच्छता होती. आवारात कितीतरी लहान थोर स्त्री पुरुष वावरत होते; पण गडबड, गोंधळ अजिबात नव्हता. कुणी कुणाशी बोलत सुद्धा नव्हतं. टाचणी पडली तरी आवाज आला असता इतकी शांतता तिथे होती. अतुलनं बाजूला चपला काढल्या. त्याला एकदम कलकत्त्यातल्या मंदिराची आठवण झाली. राम राम, किती गर्दी, गोंधळ, बडबड, खेचाखेच, घाण, शिवाय आई देवळात गेली की आपण आपले चपला सांभाळत उभे.

दीदीच्या पाठोपाठ तो समाधीपाशी गेला. केवढं मोठं झाड होतं आणि किती सुंदर समाधी होती. संगमरवरी, खूप लांब रुंद. त्यावर पसरलेला फुलांचा गालिचा, उदबत्त्यांचा घमघमाट, भोंवताली समाधीवर माथा टेकून हात पसरून बसलेली माणसं. दीदी पण तशीच बसली. तिनं डोळे मिटून आपलं डोकं समाधीवर टेकलं. अतुलनं पण गुडघे टेकून पांढऱ्या संगमरवरी समाधीवर हात पसरला. मनात काहीही मागायचं नसताना माथा टेकला. अतुलला कल्पनाही नव्हती असं काहीतरी त्याला गवसलं. पाठीवर आईचा प्रेमळ हात फिरला जणू, कुणीतरी खूप मायेनं, आपलेपणानं जवळ घेतलं होतं. मनात भीतीचा लवलेश नव्हता. मनातली रुखरुख पार संपून गेली होती. आईला

सोडल्यापासून पोरकेपणा वाटत होता, तो आता शिल्लक उरला नव्हता.

अतुल उठून जवळच्या खांबाला टेकून उभा राहिला. अंगणात ठिकठिकाणी माणसं बसली होती. डोळे मिटून, मांडी घालून ध्यान-मग्न होती. कुणाला तेथून उठावं, हलावं वाटत नव्हतं. दोन्ही पाय गेलेली एक मुलगी आपल्या खुर्चीची चाकं हातानं फिरवत आली. समाधीकडे पाहत राहिली. एकटक. मोठ्या भक्तिभावानं झाडांच्या फांद्याआड असलेल्या वरच्या मजल्यावरच्या खोलीकडे तोंड करून काही बायका नमस्कार करत होत्या.

"चल अतुल."

"कुठे ?"

"इथं आणखी काय आहे पहायला ? हे झाड कसलं आहे ? आणि या बायका त्या खिडकीला का नमस्कार करताहेत ?" अतुलनं विचारलं.

"अरे अरे, किती प्रश्न विचारतोस एकदम ? समाधीवर सावली धरणारं हे मोठं झाड आहे ना त्याला माँ न सर्व्हिस ट्री असं नाव दिलंय. या झाडाला वर्षातून एकदां पिवळी फुलं येतात. हे अंगण आहे ना, इथून वळून आपण डाव्या हाताला गेलो की मेडिटेशन हाऊस म्हणजे 'ध्यानभवन' आहे. ये तुला दाखवते."

किती छान, प्रसन्न होती ती खोली. श्री अरविंद आणि माताजींचा मोठा फोटो तिथे होता. फुलं वाहिलेली होती. उदबत्तीचा सुगंध दरवळला होता. काहीजण एकचित्त होऊन बसले होते. प्रकाश मंद होता, वातावरण प्रसन्न होतं.

"ये, ही बघ इथे श्री अरविंदांनी आणि मदरनं लिहिलेली पुस्तकं मिळतात. श्री अरविंद आणि माँ चे फोटो विकत मिळतात. शिवाय

श्री अरविंदांची पुस्तकं अनेक लोकांनी भाषांतरित केली आहेत. ती पण इथे विकत मिळतात. या इमारतीत लायब्ररी आहे. माताजी इथंच राहतात. त्या तिथे माडीवर."

"काही बायका हात जोडून त्याच दिशेला नमस्कार करत होत्या." अतुल म्हणाला.

"हो, माताजी म्हणजे लोकांचं भक्तिस्थान आहे. आता त्या खूप म्हाताऱ्या झाल्या आहेत. त्यांचा आशीर्वाद मिळावा असं वाटतंच. श्री अरविंदांच्या नंतर काय पण ते असतानाच मदरनं आश्रमाचा सगळा भार उचलला. साधकांवर तर आपल्या पोटच्या मुलांप्रमाणे त्या प्रेम करतात. लहान मुलं माताजींना फार आवडतात. पूर्वी त्या नेहमी मुलांच्या शाळेत जात, भाषण देत, त्यांना आशीर्वाद देत. आता वय झालं. जास्त हालचाल होत नाही. पण लोकांना अजून दर्शन हवं."

"किती वय आहे त्यांचं?" अतुलनं विचारलं.

"चौऱ्याण्णव वर्षाच्या तर त्या आहेतच."

"अरे बापरे खूपच म्हाताऱ्या आहेत."

"हो ना भारतात आल्या, पाँडीत रहायचं ठरलं त्यानंतर त्या इथून दुसरीकडे कुठे गेल्याच नाहीत. अरे, श्री अरविंद आणि मदर यांनी पाँडेचरीच्या बाहेर कधीच पाऊल टाकलं नाही."

"कुठून आल्या त्या?"

"त्या फ्रान्सहून आल्या. त्या फ्रेंच आहेत, पण आता त्या सगळ्यांच्या माँ आहेत. जात पात, धर्म, भाषा, प्रांत कसलाच अडथळा त्यांच्यात आणि साधकात येत नाही. पाँडेचरी आश्रमाचं नाव जगभर झालंय. जगातल्या प्रत्येक भागातून लोक दर्शनासाठी येतात. श्री अरविंद इथे आले, माँ आल्या तेव्हा काहीच नव्हतं. वर्षनुवर्ष त्यांनी केलेल्या

कष्टांचं, तपस्येचं हे फळ आहे. खूप पसारा वाढलाय, आश्रमाचा. दोनशेहून जास्त इमारती आश्रमाच्या आहेत. इथला सगळा कारभार स्वावलंबनावर चालतो. पाव करण्याच्या भट्टीपासून मोटर वर्कशॉप पर्यन्त सगळे कारखाने आहेत. सुंदर असा हातकागद इथे तयार होतो. बूट, चपला तर होतातच, मातीची सुंदर भांडी पण तयार होतात. दुग्धशाला आहे, गोशाला आहे, लॉन्ड्री आहे. शिवाय शेती आहे. फळबागा, फुलबागा आहेत. पुस्तकालय, मुद्रणालय आहे. इथून जवळ जवळ डझनभर मासिकं प्रकाशित होतात. शिवाय शिक्षण केंद्र, कुक्कुट पालन केंद्र, पोहण्याची सोय, मोठाली मैदानं, कितीतरी विश्रामगृहं, सामुहिक जेवण घरं आहेत. साधकांच्या जेवणाखाण्याचा राहण्याचा सगळा भार माँनं आपल्या खांद्यावर घेतला आहे. काम मात्र प्रत्येकानं करायला हवं बरं का. एक स्वतंत्र शहरच आहे हे. इथलं गोलकुंड हे हॉटेल तर आशियामध्ये एक सुंदर इमारत, कलेचा एक चमत्कार म्हणून प्रसिद्ध आहे. आपण जाऊ एकदा गोलकुंड पहायला. शिवाय टेनिसकोर्ट, कुस्तीचा आखाडा, व्हॉलीबॉल कोर्ट, मोठ्या बायकांचं व्यायामस्थळ हे पण पाहण्यासारखं आहे. टेनिस कोर्टच्या समोर ज्यूडो शिकविण्याची जागा आहे. तू एकदा तिथे जरूर जा. ज्यूडोचे डावपेच पाहून तुला आश्चर्यच वाटेल.

श्री. अरविंद बुक डिपार्टमेंट आहे. त्याला 'शब्द' हे सुंदर नाव देण्यात आलंय. हेब्लिक या दुकानात हातमागाचे फार सुंदर कापड मिळते. एक जर्मन बाई हे दुकान चालवते. हरपगाँ हे वर्कशॉप उदार पिंटो पाहतात."

"हरपगाँ ! असं काय विचित्र नाव आहे ?" अतुलनं विचारलं.

"अरे ती एक गंमतच आहे. समर्पक नांव ठेवण्यात माँ चा कटाक्ष असतो. जसं ज्या विभागातून आश्रमवासीयांना गरजेच्या वस्तू

...रवल्या जातात त्याला माँ नं प्रॉस्पेरिटी हे नांव दिलंय. म्हणजे समृद्धि,
...ी की नाही ! तसंच हरपगाँ नांवपण अर्थपूर्ण आहे. फ्रेंच नाटकातलं
...ः एक कंजूष पात्र. या वर्कशॉपची जागा विकत घेताना त्या मालकानं
अत्यंत कंजूषी वृत्ति आणि लोभीपणा दाखवला म्हणून या कंजूष
पात्राचं नांव या वर्कशॉपला देण्यात आलं. उदार हे गृहस्थ स्वभावा-
प्रमाणे उदार. त्यांच्यावर त्या वर्कशॉपची जबाबदारी सोपवण्यात
आली. इथे ग्रेनरी पण पाहण्यासारखी आहे. तिथे आश्रमाला लागणारं
धान्य चाळणं, पाखडणं, निवडणं वगैरे काम केलं जातं."

"दीदी, इथे थिएटर, सिनेमा वगैरे नाहीतच का ?" अतुलनं
विचारलं.

"दर शनिवारी प्ले ग्राऊंडवर सर्वांसाठी सिनेमा असतो. वेग-
वेगळ्या भाषातले चांगले चित्रपट दाखवतात. देशी, विदेशी डॉक्यू-
मेंटरी तर मुद्दाम दाखवतात. या प्लेग्राऊंडवर हिंदुस्थानचा पूर्ण
नकाशा आहे. त्यांत ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा यांचा पण समावेश
आहे. दर्शनदिनी मार्च-पास्ट या ग्राऊंडवरच होतो."

अतुल ती सगळी माहिती ऐकण्यात दंग होऊन गेला होता.
आश्रमापासून घरापर्यंत दोघं आपआपल्या नादात मुकाटपणे
चालले होते.

बस स्टँडपासून येतानाची दिसलेली घाण, उघडी गटारं इथं
दिसत नव्हती. पाँडेचरीतला हा भाग निराळाच होता. सगळीकडे
टापटीप, शिस्त आणि सुव्यवस्था होती.

"ही बघ ही समोरच शाळा आहे. श्री अरविंद आंतरराष्ट्रीय
विद्या केंद्र. तुला इथंच जायचंय शिकायला. शिवाय शेजारीच
फ्लॉवर-रूम आहे, पोस्ट ऑफिस आहे, ऑरोविलचं पण ऑफिस
आहे."

" हे पोस्टऑफिस आश्रमाचं दिसतंय." अतुलनं विचारलं.

" हो आश्रमाचं आहे."

" फ्लॉवर रूम कशासाठी आहे ? "

" समाधीचं दर्शन घेण्यासाठी किंवा माँ चं दर्शन घ्यायला लोक येतात, ते आपल्या श्रद्धेचं प्रतीक म्हणून इथून फुलं नेतात. आपल्या घराभोवती छोटीशी बाग पाहिलीस ना तशी थोडीफार बाग प्रत्येक साधक करतो. इथं फुलांचं वेड सर्वांनाच आहे."

"समाधीवर तर किती छान फुलं लावली होती." अतुल म्हणाला.

" काही साधक आणि साधिका यांचं ते कामच आहे. निरनिराळी फुलं नानाप्रकारे लावण्यात ते तासन्तास घालवतात. झालंच तर अतुल, इथे आरोग्याची खूप काळजी घेतली जाते. लहान मुलांना तर रोज औषधी पाण्यानं घसा साफ करावा लागतो."

" म्हणजे घसा दुखत असताना आपण गार्गल करतो तसं ? "

" हो तसंच. शिवाय इथं मुलांची वरचेवर तपासणी होते. उत्तम वैद्यकीय उपचार होतात. अरे, कलकत्त्याहून फार मोठे तज्ज्ञ असे डॉक्टर आपलं सर्वस्व सोडून इथे आले आहेत. नि:स्वार्थपणे सेवा करत आहेत. शिवाय उत्तम अशी अत्तरं इथे तयार होतात. हस्त-कौशल्य, शिवणकाम, भरतकाम, मातकाम अरे पाहशील तितकं थोडं आहे."

" हे सगळं आश्रमाचं आहे ? "

"हो आश्रमाचं आहे."

" आश्रम कुणाचा आहे ? माँ चा आहे ? "

" वेडा. माँ नंच खरं तर सगळं उभं केलंय, पण तिचं काहीच नाही. सगळं आहे ते तुझं, माझं, सर्वांचं, साऱ्या जगाचं. आता नवी नगरी

उभारली जात आहे. ऑरोविल किंवा उषानगरी. तुझ्यासारख्या उद्याच्या तरुणाचं स्वागत करायला ती नगरी तयार होत आहे."

" हे ऑफिस त्याचंच आहे म्हणालीस ना ? "

" हो.या ऑरोविल ऑफिसमधून एक बस रोज दोनदा त्या नगरीकडे जाते. इथे आपल्या देशातले तसेच परदेशातूनही खूप लोक सतत येत असतात. त्यांना ऑरोविल दाखविण्याची सोय या बसमधून केली जाते."

" खूप दूर आहे ऑरोविल ? " अतुलनं विचारलं.

" तसं फार नाही फक्त सहासात मैल दूर आहे."

" आपण कधी जायचं ? "

" जाऊ या. आत्ता तर आला आहेस तू. खरंच अतुल, आईला पत्र टाकलंस पोहचल्याचं ?"

"अरेच्या नाही. आता ग, आई खूप काळजी करत असेल." अतुल कावराबावरा झाला.

" मी टाकल पत्र. दुष्ट मेला. "

" का ग दुष्ट म्हणालीस ? "

" तो माझा लाडका शब्द आहे. छोटे भैय्या, मला तुझ्याबद्दल खूप माया वाटली ना म्हणून म्हणाले दुष्ट ... रागावलास ? "

" नाही. आईला पण मी खूप आवडलो ना की ती जवळ घेऊन मला नेहमी म्हणते, वैरी मेला ... खूप आवडतं तिचं ते तसं म्हणणं."

बोलता बोलता अतुलचे डोळे भरून आले.

" हा तुझा आश्रम चांगला आहे पण मला करमत नाही इथे. तू दांना सांग की मला कलकत्त्याला परत पाठवून द्यायला."

" छट् मुळीच नाही, मला तू खूप आवडला आहेस. तुझ्या घरी आणखी कोण कोण आहेत रे अतुल ? "

" मी आहे ... "

" तो तर दिसतो आहेसच. " दी हंसत सुटली.

" हंसू नकोस ग अशी. तुझ्यासारखीच माझी हेमादीदी आहे, आई, बाबा आणि माझा मोठा भाऊ. "

" अगबाई ! दा कधी तुझ्या भावाबद्दल बोलले नाहीत. केवढा आहे तो ? "

" तुझ्याहून मोठा आहे. तुझ्याहून उंच पण आहे. तुझ्यासारखा नाजुक नाहीय. छान तगडा आहे. "

" अगबाई ! खूप आवडतो वाटतं तो. "

" मग ! छानच आहे माझा समीरदा. त्याला पोलिससुद्धा घाबरतात. त्याची एक मोठी गँग आहे. "

" गँग ... म्हणजे ? " सुनीता घाबरली होती.

" अँ हँ घाबरायला काय झालं ? गँग म्हणजे त्याचं टोळकं. ते वाईट माणसांना मारतात. दुष्ट लोकांना छळतात ... गरिबांना मदत करतात ... "

" अतुल, मला नको सांगूस काही. फार वाईट आहे हे. असलं वागणं चांगलं नाही. बरं झालं बाबा तू माँच्या सावलीखाली आलास ते. "

" नाही ग, माझा भैय्या खरंच खूप चांगला आहे. माझ्यावर तर त्याचं खूप प्रेम आहे. किती छान छान गोष्टी सांगायचा. त्याचं ते धाडस पाहून माझ्या अंगावर तर काटा यायचा. अग, नक्षलवादी आहे तो. "

" बाई ग ... अतुल. तुझ्या आईला केवढं दुःख असेल ! "

" हो ना ती सारखी रडते. समीरदाला पोलिसांनी पकडलंय. "

सुनीता बोलली नाही. भराभरा चालू लागली.

" दी, सांग ना मी कधी जाऊ परत ? "

" आईची फार आठवण येते ? "

" हो. "

" इथेच रहा अतुल. मी आईसारखी माया करीन तुझ्यावर. तुला मदरकडे घेऊन जाईन. त्यांचा आशीर्वाद मिळाला की तू असा होणार नाहीस. "

" म्हणजे कसा ? "

" नक्षलवादी. "

" वाईट असतात ते ? "

" फार वाईट. हे बघ अतुल, तू मोठा हो, मग आपण जाऊन तुझ्या समीरदाला इथे घेऊन येऊ. "

" खरंच ? तू येशील कलकत्त्याला ? "

" हो येईन. "

" आणि आई, दीदी, बाबा ? "

" या सुट्टीत सगळ्यांना इथेच बोलावून घेऊ, मग तर झालं ? "

" हो. "

" मघाशी तू वाचलंस ना श्री अरविंद परदेशी गेले तेव्हा फक्त सात वर्षांचे होते, मग आता उगाच घरची आठवण काढून सारखं उदास नाही रहायचं. "

" दी, या तुझ्या माताजी माझ्या भैय्याला तुरुंगातून सोडवतील ? तो फार चांगला आहे ग. उगाचच त्याला पोलिसांनी पकडलंय. "

" अतुल राजा, तुझ्या भैय्याची चूक असेल तर त्यानं त्याचं प्रायश्चित्त घेतलंच पाहिजे. तुझा भैय्या वाईट लोकांच्या संगतीत सापडलाय. हे नक्षलवादी काय करतात, माहीत आहे ? "

" काही करत नाहीत ग. खरं तर दुष्ट लोकांना शिक्षा देतात फक्त."

" असं कुणी सांगितलं तुला ? "

" समीरदानं. "

" आणि तुझी आई काय म्हणते ? "

" काही नाही. दाचं नांव निघालं की डोळे पुसते. बाबा खूप आरडाओरडा करतात. हेमादीदी गप्प होऊन जाते. मला कुणीच काही सांगत नाही. मला आपलं इकडं पाठवून दिलं ! बस. "

" खून, जाळपोळ, मारहाण, आगी लावणं, देशाच्या धनदौलतीचं नुकसान करणं हे चांगलं का मला सांग. "

" नाही. "

" कायदा, सुव्यवस्था मोडून टाकायची, पोलिसांचे जीव घ्यायचे, घबराट, भीती, दरारा पसरवायचा, बंदूक, हात-बाँब, मशाल वापरायची...चांगलं का हे ? "

" नाही. पण समीरदा असं नाही करायचा काही. मला आठवतंय मी अगदी लहान होतो तेव्हा, दा ला बागेचा खूप नाद होता. त्यानं एक कुत्रं पाळलं होतं, कितीतरी पक्षी होते त्याच्याजवळ. कसा शिताफीनं पक्षी पकडायचा. अभ्यासात पण हुषार होता, मॅट्रिकला तर पहिल्या वर्गात पास झाला तो. "

" खरंच, तुझ्या आईला किती दुःख होत असेल ! इतका चांगला, इतका हुषार मुलगा गुंडांच्या तावडीत सापडला. काय करणार बिचारी ? अरे, अशाच कोवळ्या मुलांना, हुषार मुलांना गोड बोलून आपल्या कळपात ओढायचं आणि त्यांना गुंडगिरी करायचं शिक्षण द्यायचं, माणूसकी म्हणून शिल्लक ठेवायची नाही हे तर त्यांचं तंत्र असतं. "

" दी ... "

" काय रे ? "

" तू म्हणतेस ते खरं असेल. कलकत्त्याला ठिकठिकाणी म्हणजे रेल्वे स्टेशनं, सरकारी इमारती, शाळा यावर घोषणा लिहिलेल्या आहेत. 'हे घर कुणाचे आहे, राहाणाऱ्याचे नाही. तुमचे आमचे आहे. तुम्हाला खायला अन्न नाही, मग खुशाल आत शिरा. घर ताब्यात घ्या. पोलीस पकडायला आले तर हातबॉम्ब फेका. त्यांना मारा, मशालीनं घरांना आगी लावा.' पण दी, माझा दा असं नाही करणार. अग, मला एकदा बाबांनी खूप मारलं तर माझ्यापेक्षा तोच जास्त रडला."

" अशाच कोवळ्या मुलांना राक्षस करून टाकण्याचं नक्षलवाद्यांचं ध्येय असतं. अरे, एखाद्याचा खून करण्यापर्यन्त त्यांची मनं तयार केली जातात. त्याबाबत पद्धतशीर शिक्षण दिलं जातं. नव्या नक्षलवाद्याला खुनाचे ट्रेनिंग मिळावे, माणूस मारतेवेळी त्याची नजर मरावी म्हणून त्याला दोन तीन खून प्रत्यक्ष पहायला लावतात. प्रेतावर घाव घालण्यास सांगतात."

" अरे बापरे खरंच ?" अतुल म्हणाला. त्याचा हात हातात घेऊन सुनीता चालत राहिली. बराच वेळ दोघंही बोलली नाहीत.

" दी, समीरदाला काय करतील पोलीस ? "

" कोण जाणे. पण आता तुरुगातून सुटल्यावर आपण तुझ्या दा ला इथेच घेऊन येऊ."

" इथे काय होणार ? त्याला तर त्या नक्षलवाद्यांनी पार बिघडवून टाकला असेल. पण तू म्हणतेस ते खरंय का ग ? "

" खरंय छोटे भैया, खोटं मी कशाला सांगू. तू वर्तमानपत्र वाचत नाहीस ? त्यात नक्षलवाद्यांचे अत्याचार छापून येतात की."

" हूं. इथे येईल समीर दा ? "

" येईल. पण त्यासाठी तू मात्र इथे रहायला हवं. तुझ्या ओढीनं तो येईल. राहशील ना ? कंटाळायचा नाहीस ना ? "

" पण मला इथं खरंच करमत नाही ग. इथलं जेवण आवडत नाही. आईची आठवण येते. "

" खूप तेल, खूप मसाले, खूप गोड चांगलं नाही. सात्त्विक, सकस अन्न प्रकृतीला मानवतं. ज्याला पवित्र उदात्त आयुष्य घालवायचं आहे त्यानं सात्त्विक अन्न घ्यावं असं माँ नेहमी म्हणते. "

" समीरदाला माताजी सांगतील? समजावतील? तो सुधारेल ?"

" अरे, आजवर कित्येक लोक इथे आले आणि त्यांचं आयुष्य बदलूनच गेलं. त्यांनी माँपाशी आपले अपराध कबूल केले. माँनं त्यांना क्षमा केली. नवी दिशा दाखवली. नुसते स्वभावच बदललेत असं नाही तर माँ च्या आशीर्वादानं कित्येकांची दुखणी बरी झाली आहेत. हजारोंची आयुष्य सावरली गेली आहेत. "

" कोण आहेत या माताजी... सांगतेस...? "

" सांगते. पण इथेच रहायचं कबूल केलं आहेस हे लक्षात ठेव."

" पण समीरदा इथे नाही आला तर ? "

" येईल. तू त्याला खूप आवडतोस ना ? "

" हो. खूप आवडतो मी त्याला. दी तू पण त्याला खूप आवडशील."

" चल... "

सुनीता गप्प होऊन गेली. अतुलचा समीरदा कसा असेल याचा विचार करत राहिली.

" सांगतेस ना ... "

" परत कधी तरी सांगीन. तुझा समीरदा नक्षलवाद्यांच्या तावडीत सापडलाय हे ऐकल्यापासून मला फार अस्वस्थ वाटतंय. "

" दी, तुला नाही का ग कुणी ? "

" आहेत की माँ आहे, अनिलदा आहेत तू आहेस... "

" असं नाही. खरं खरं कोण आहे ? "

" कोण जाणे मलाच माहीत नाही, राजा भैय्या."

" म्हणजे ? "

" म्हणजे मी एवढीशी होते वर्षभराची. तेव्हा मला माझ्या आईनं माँ च्या पायावर ठेवलं आणि मरून गेली."

" आणि वडील ? भाऊ ? बहीण ... ? "

" माहित नाही... "

दीदीचा आवाज एकदम भरून आला. तिनं आपले डोळे पुसले.

" चल पटपट मला कार्यालयात जायचंय."

" कार्यालय ? अतुलनं विचारलं. "

" हो, काम केल्याशिवाय इथं कुणालाच राहता येत नाही. प्रत्येकानं आपल्या आवडीप्रमाणे, कुवतीप्रमाणे, काम करायचं असतं."

" तू काय काम करतेस ? "

" मी ना ? ऑरोविलच्या कार्यालयात टायपिंगचं काम करते. चल."

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 00033 वि ...
नोंद दि... 22



अरविंद

ग्रं. ठाणे,
क्र. 94988 नों 23013164



मीरा

# ५

संध्याकाळ दाटून आली होती. अनिलदांच्या खोलीत दिवा लागलेला होता. त्या खोलीचं एकुलतं एक दार लोटलेलं होतं. खिडकीचा पडदा डुलत होता. अनिलदा व्यायाम करून परतले होते. खोलीत दिवा पाहताच त्यांच्या कपाळा-वर अठी पडली. म्हणजे अतुल आजही ग्राऊंडवर गेलेला दिसत नाही. त्यानं रोज व्यायाम घेतलाच पाहिजे. त्यांनी दार ढकललं. अंगभर पांघरूण घेऊन अतुल झोपला होता. दा घाबरले, या श्रीमंताच्या पोराला आपण इथे घेऊन आलो खरे; पण त्याला हे शिस्तीचं जगणं पेलत नाही असं दिसतं.

सहा एक वर्षं झाली असतील. अतुलचे आजोबा इथे आले होते. बालपणीचा मित्र, उपकारकर्ता कितीतरी वर्षांनंतर भेटत होता. आपण एकदम बाबूमोशायला मिठीच मारली, इथे राहिला. माँ ला भेटला. अरविंदांच्या समाधीपाशी तासनतास बसून राहिला. किती

जुन्या आठवणी निघाल्या. किती गोष्टी झाल्या. पण त्याला कलकत्त्याला परत जाणं भाग होतं. केवढा मोठा कापडाचा धंदा ! त्याचा चांगला जम बसलेला, पण एकुलता एक मुलगा त्यात लक्ष घालत नाही. त्याला धंदा करणं कमीपणाचं वाटतं. प्रोफेसर झालाय. त्याची बायको चांगली आहे, कामसू आहे, स्वभावानं गरीब आहे. या म्हाताऱ्या सासऱ्याला बापाच्या ठिकाणी मानते पण सुनबाईच्या नशिबी सुख नाही. नवरा स्वभावानं तापट आहे, माथेफिरू आहे. थोरला नातू समीर...त्याची लक्षणं काही चांगली दिसत नाहीत. बंगालमधली कित्येक कोवळी पोरं वाया गेलीत. बाबूमोशाय आपली कहाणी सांगत होता. " नात आहे हेमा, तिचं लग्न झालं की एक जबाबदारी कमी होईल. पण हे बघ अनिलभैय्या, एक वचन दे मला. माझा धाकटा नातू तुझ्या पदरात टाकायला आलोय. नाही म्हणू नकोस. त्याला मी मेल्यावर इथे आण. इथेच सांभाळ कर त्याचा. तो आता सात एक वर्षाचा आहे पण आई-बापाचा बेबनाव, थोरला भाऊ भलत्यांच्या नादी लागलेला. त्याच्यावर कशाचा परिणाम व्हायला नकोय. इथली शिक्षणपद्धती मला फार आवडली. त्याला इथे माँ च्या सावलीला आणून ठेव. मलाच सेजदांच्या बरोबर यायचं होतं पण त्यांनी येऊ दिलं नाही. बायकोनं तर केव्हांच राम म्हटलं. मी मात्र संसारात अडकलो तो अडकलोच. मला इकडे येता आलं नाही, माझ्या नातवाला इथे घेऊन ये. आपल्या वेळचा बंगाल आता राहिला नाही बाबा. आतां तिथं स्वातंत्र्यप्रेमाचं वारं नव्हे, तर गुंडगिरीची हवा खेळतेय. "

आपण वचन दिलं, बाबूमोशाय जड अंतःकरणानं परतला. त्या दिवशी सुनबाईचं पत्र आलं. 'याचं आणि पोराला पदरात घ्यावं... मामंजींची शेवटची भेट घ्यावी,' दोनच ओळी पण केवढा विनय

होता, आग्रह होता त्या शब्दांत. माँची परवानगी घेतली, कलकत्त्याला गेलो. जवळजवळ साठ वर्षानंतर आपण पाँडेचरीच्या बाहेर पाऊल टाकत होतो. या पोराला आणलंय खरं पण आजारी तर पडला नाही हा !

अनिलदांनी पांघरूण बाजूला केलं. अतुलच्या कपाळावर हात ठेवला.

" अतुल बेटा, बरं नाही का ? निजलास भलत्या वेळी ? "

" बरं आहे दा. उगाच पडून राहिलो. "

" अरे, संध्याकाळच्यावेळी असं निजून राहाणं चांगलं नाही. ग्राउंडवर कां गेला नाहीस ? "

" व्यायामाचा मला फार कंटाळा येतो दा. "

" असं चालणार नाही, इथें प्रत्येकानं व्यायाम करायलाच हवा. उठ. "

अतुल तसाच पडून राहिला. त्याचा चेहरा उदास, ओढलेला दिसत होता.

" अतुल बेटा, इथे मन लागत नाही ? परत जायचंय ? "

" हो जावं वाटतंय पण जाणार नाही. "

" कां रे ? "

" दीदीला वचन दिलंय. "

" कशाबद्दल ? " दांनी उत्सुकतेनं विचारलं.

" दी सांगेल तुम्हाला. "

" बरं " दा गप्प बसले.

"आजोबा का आले नाहीत तुमच्याबरोबर ? ते सारखं पाँडेचरी बद्दल बोलायचे. बाबांना आवडायचं नाही, म्हणायचे माझ्या मुलाला साधूसंत करायचं नाही."

"हो तुझी आई सांगत होती."

"पण आईनं ऐकलं नाही. मला पाठवलंच इकडे. कलकत्त्याला शाळा आहेत की."

"पण इथे शाळेत नुसता अभ्यास नाही करवून घेत तर इतरही खूप गोष्टी शिकवतात. नाना प्रकारच्या कला आहेत, भाषा आहेत. पोहायला छानसा तलाव आहे, तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळायची सोय आहे, दृष्ट लागेल असं मैदान आहे."

"दा, मला गाण्याची खूप आवड आहे. हेमादी खूप छान सतार वाजवते, तिला शिकवायला मास्तर येतात. मला पण सतार शिकायची होती पण घरात कुणी ऐकलंच नाही."

"इथे शीक. अरे माँ तर नेहेमी म्हणते की संगीत आणि पेंटिंग हे आत्म्याचे कान आणि डोळे आहेत. माँ स्वत: छानपैकी पेंटिंग करत असे, उत्तमपैकी पियानो वाजवत असे. कितीतरी नवीन स्वर-रचना तिनं केलीय. हुता नावाची एक गुजराथी मुलगी तर माँच्या मार्गदर्शनामुळे एक उत्तमपैकी चित्रकर्ती, कलावंत म्हणून ओळखली जाते. सावित्रीवर तिनं रंगवलेली चित्रं प्रसिद्धच आहेत. तू ज्या शाळेत जाणार आहेस तिथल्या एका अठरा वर्षाच्या मुलानं पेंटिंग-मध्ये इतकं प्राविण्य दाखवलं की मदरनं त्याचा जन्मजात कलावंत म्हणून गौरव केला. या शाळेतल्या एका मुलानं फोटोग्राफीमध्ये परदेशी फोटोग्राफरचं सर्टिफिकिट मिळवलंय. तुला हवं ते, आवडेल ते शीक. इथे तुझ्या आवडीला बंधन राहणार नाही. तुला ज्यात गोडी आहे त्याचंच शिक्षण तुला मिळेल."

" कधी जायचं शाळेत ? " अतुलनं विचारलं.

" लवकरच. तुला एकदा माँ कडे घेऊन जातो. तिचा आशीर्वाद मिळव मग नव्या आयुष्याला सुरुवात कर."

" दा, तुम्हाला सेजदांबरोबर यायला मिळालं मग आजोबांना कां नाही येता आलं ? " अतुलनं विचारलं.

" बेटा मी होतो एकांडा शिलेदार. अनाथ, पोरका. मागे रहायला कोण होतं माझं ! एक जिवाभावाचा मित्र होता. त्याच्याच घरी रहात होतो. त्याची आई माझी आई होती. "

" कोण होता तो मित्र ? "

" तुझे आजोबा. पण तो येऊ शकला नाही, त्याच्या आईनं येऊ दिलं नाही. सेजदानं पण त्यांची समजूत घातली. अरे, आम्ही केवढीशी मुलं होतो त्यावेळी. उभा देश राष्ट्रप्रेमानं झपाटला होता. तुम्ही स्वातंत्र्यात जन्म घेतलेली मुलं. तुम्हांला त्यावेळच्या वातावरणाची कल्पना येणार नाही. आपल्या लोकांवर कसे कसे अत्याचार होत होते हे सांगून खरं वाटणार नाही. त्यावेळी उभा देश स्वातंत्र्य मिळवायला धडपडत होता. सर्वस्वावर पाणी सोडून ब्रिटिश सत्तेशी सामना करायला प्रत्येकजण सिद्ध होता. केवढा त्याग, छळ सोसण्याची केवढी ताकत, कोण निष्ठा. अतुल, त्यावेळी आभाळाएवढ्या नेत्यांकडे पाहून आम्ही कोवळी पोरं भारावून जात होतो. रस्त्यानं 'वंदेमातरम्' म्हणत ओरडत होतो. उन्हा-तान्हात आपल्या नेत्यांच्या पाठोपाठ तासन्तास हिंडत होतो. अरे, त्यावेळी तुझ्याएवढ्या एका मुलानं भर रस्त्यात वंदे-मातरम् म्हटलं म्हणून त्याला कोर्टाच्या आवारात मरे तो फटके मारण्यात आले."

" दा ... खरंच ? " अतुल अंतर्बाह्य हादरला होता.

" हो. कित्येक तरुणांना फासावर लटकविण्यात आलं. कित्येकांची घरं लुटली गेली, जाळली गेली, हजारोंवर गोळीबार करण्यात आला. सेजदांना वर्षाची सजा झाली होती. ते अलीपुरच्या तुरुंगांत कैद होते. त्यावेळी मी आणि तुझा आजोबा इतर मुलांबरोबर त्यांच्या सुटकेची घोषणा करत रस्त्यारस्त्यातून ओरडत होतो. "

" अरविंद तुरुंगात होते ? ते पण सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळकांसारखे मोठे पुढारी होते ? "

" हो. पण राजकारणात पाचएक वर्षापेक्षा जास्त काळ त्यांनी घालवला नाही. बोसबाबू आणि टिळक हे तर आयुष्यभर देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडत राहिले. इंग्लंडहून आल्यावर अरविंदांनी बडोदा संस्थानात नोकरी केली. तिथं ते कॉलेजात इंग्रजी, फ्रेंच शिकवत. प्रत्यक्ष राजकारणात ते फार काळ नसले तरी त्यापूर्वी कित्येक वर्ष ते आपल्या प्रखर लेखणीनं तरुणांची मनं स्वातंत्र्यासाठी तयार करत होते. त्यांच्या मनात शौर्याची, त्यागाची, अन्यायाबाबत चिडीची भावना निर्माण करत होते. लोकांना खायला नव्हतं, अंगावर घालायला धड कपडा नव्हता, रहायला छप्पर नव्हतं तरी देशकार्यासाठी कोणताही त्याग करायची तयारी होती. "

मला एक प्रसंग अजूनही आठवतो. कितीतरी वर्ष होऊन गेली त्या गोष्टीला. १९०८ साली अरविंदांना अटक झाली, त्यांचा खटला चालवण्यासाठी पैसा नव्हता. सरोजिनी ही त्यांची धाकटी बहीण. तिनं आपल्या भावासाठी जनतेला अपील केलं. मदत मागितली. सरोजिनीदी उन्हातान्हात घरोघर हिंडत होती. मी आणि तुझा आजोबा, आम्ही दोघं तिच्याबरोबर सतत असायचो. आम्ही एका घरात पाऊल टाकलं. खूप गरीब होतं ते कुटुंब. कुणीसं

आजारी होतं. अंथरुणावर पडून कण्हत होतं. सरोजिनीदीदी दिसल्याबरोबर त्या घरच्या बाईनं घरात असलेले शेवटचे आठ आणे दीच्या हातावर ठेवले, म्हणाली, "ही एवढीच मदत करू शकते बेटी, आणि देवाजवळ बाबूंच्या सुटकेची प्रार्थना करते." सरोजिनी दीनं त्या पैशात स्वतःच्या पैशांची भर घातली आणि म्हणाली,

"माँ, हे पैसे सेजदानं पाठवलेत. घे औषधपाणी कर." त्या बाईच्या डोळ्यांत जे काय दिसलं ते सांगता येणार नाही. सर्व-सामान्य लोकांचं सेजदांवर इतकं प्रेम होतं की अगदी गरीब, हमाल, टांगेवाला अशा लोकांनीसुद्धा त्यांच्या सुटकेसाठी पै पैसा दिला. सरोजिनी दीच्या बरोबर काम केल्यानं मी लहान वयातच मोठा झालो. अनुभव घेतला. शहाणा झालो. सेजदा इकडे यायला निघाले तेव्हा मुकाट्यानं त्यांच्या पाठोपाठ इथवर आलो."

"दा, हल्ली तुमचं माझ्याकडे लक्ष नाही हं. अतुल आल्यापासून तुम्ही मला विसरूनच गेलात. मघापासून पहातेय दोघं गप्पात अगदी रंगून गेला आहात. मी आल्याचं कळलंसुद्धा नाही," सुनीता म्हणाली.

"नाही नाही बेटी, तुला विसरून कसं चालेल ? माझ्या म्हाताऱ्याची तर तू काठी आहेस."

"तुम्ही असे गोडबोले आहात की बस. बरं का रे अतुल, अरविंद कलकत्त्याहून इथे आले तेव्हा या स्वभावाच्या बळावरच दा. अरविंदांना चिकटून राहिले. तुझे आजोबा बिचारे राहिले तिथेच."

"नाही बेटा, तसं नाही. तुझ्या आजोबांना घर, दार, आई-वडील सगळे होते. मी काय सडाफटिंग, एकटा आणि शिवाय अनाथ. सेजदानं अशा कित्येक लोकांचा सांभाळ केला. सेजदाचे वगील डॉ.

कृष्णधन तर एक दिलदार माणूस म्हणून ओळखला जायचा. ते गेल्यावरसुद्धा त्यांची आठवण काढणारे, त्यांचे उपकार मानणारे कितीतरी लोक होते."

"मी एक गंमत आणलीय तुझ्यासाठी." सुनीता म्हणाली.

"माझ्यासाठी? काय आहे?" अतुल तिच्याजवळ जात म्हणाला.

"अशी सांगते होय? आधी सांग मला काय देणार? दी" म्हणाली.

"अग, त्यानं तुला वचन दिलं आहेच की आणखी काय देणार तो?" दा म्हणाले.

"अय्या दा, तुम्हाला पण सांगितलं यानं?"

"नाही ग. दीदी सांगेल म्हणाला. कोणतं वचन दिलंय ते कळलंच नाही."

"हं. मग ठीक झालं. ते आमचं दोघांचं गुपित आहे दा. तुम्हाला सुद्धा सांगणार नाही मी."

"बरं बरं नको सांगूस." म्हणतच दा उठले. कामाला लागले.

"दी सांग ना काय गंमत आहे?" अतुलनं अधीरतेनं विचारलं.

"ही बघ..."

"पत्र? कुणाचं?"

"तुझ्या आईचं.... घे."

"पण पोस्टमन तर मघाच गेला दारावरून. मी त्याला विचारलं पण पत्र नाहीय म्हणाला."

"अरे, आपली पत्र आश्रमाच्या पोस्ट-ऑफिसात येतात! तुझं नांव अतुल चटोपाध्याय, तुझं पत्र 'सी' च्या कप्प्यात असणार. आता यापुढे तू जाऊन स्वत: आणत जा आपली पत्रं." दी म्हणाली.

अतुलनं पत्र उघडलं, वाचू लागला. आईचं पत्र होतं. तिला अतुलची खूप आठवण येत होती. शहाण्यासारखं वाग म्हणून लिहिलं होतं. कुणीसं कलकत्त्याहून येणार होतं त्याच्याबरोबर खाऊ पाठवला होता. हेमादीदीनं लिहिलं होतं, तुला सुनीता दी मिळाली पण मला मात्र इथे धाकटा भाऊ मिळाला नाही.

वाचता वाचता अतुलचे डोळे भरून आले. त्यानं ते पत्र सुनीताच्या हातात ठेवलं.

" तुझ्या समीरदा बद्दल काहीच लिहिलं नाही." पत्र वाचून झाल्यावर सुनीता म्हणाली.

" पहा न. तो कुणालाच आवडत नाही. बाबा तर त्याचं नांव घेऊ देत नाहीत. समीरदानं एकदा म्हणे त्यांच्या खिशातून दहा रुपये चोरले होते."

" हं " दी विचार करत राहिली, तिनं भरतकाम हातात घेतलं.

" दी तू ही साडी आधी बाजूला ठेव. जेव्हा पहावं तेव्हा तुझ्या हातात सुई, दोरा आणि ही साडी ? "

" तुला आवडलं नाही यावरचं डिझाईन ? पांढऱ्या साडीवर किती छान दिसताहेत हे हलके रंग. "

" छान आहे. पण तू माझ्याशी बोल आधी. आईच्या हातात पण बघावं तेव्हां सुया आणि लोकर. तिनं माझ्यासाठी छान छान स्वेटर विणलेत. एक पुल ओव्हर तर असा मस्त आहे. "

" पण छोटे भैय्या, इथें तुला इतके गरम कपडे लागणार नाहीत. समुद्राच्या किनारी हवा फार थंड नसते हो, इथे नोव्हेंबर, डिसेंबर-मध्ये खूप जोराचा पाऊस पडतो त्यावेळी गारवा येतो."

" बरं बरं पण ती साडी आधी बाजूला ठेव."

" वा हे बरंय तुझं. तू शाळेत जाऊ लागलास की मग दी ची आठवण सुद्धा यायची नाही. दिवसभर शाळा, मित्र, प्लेग्राऊंड यावर जाईल तुझा दिवस. ही साडी मला लवकर संपवायला हवी राजा. माँ साठीं भरतेय. त्यांच्या वाढदिवसापर्यंत पुरी झाली पाहिजे. "

" केव्हां असतो माँ चा वाढदिवस ? "

" एकवीस फेब्रुवारीला. त्या दिवशी माँ दर्शन देतात. "

" आणि अरविंदांचा जन्म केव्हां झाला ? "

" पंधरा ऑगस्ट अठराशे बहात्तर. "

" म्हणजे शंभर वर्षांपूर्वी ? "

" हो. आणि तोच आपला स्वातंत्र्यदिन पण आहे. तोच दिवस रामकृष्ण परमहंसांचा निर्वाण-दिन आहे. "

" तू माताजींबद्दल सांगणार होतीस ना. सांग की. "

" वा स्वारी बरीच रमलेली दिसतेय इथे. "

" नाही. खरं तर मला इथे मुळीच करमत नाही पण समीरदा साठी राहिलोय. माँच्या आशीर्वादानं तो चांगला वागायला लागेल असं तू म्हणाली होतीस. सांगतेस ना ... "

" सांगते बावा सांगते. महाहट्टी आहेस तू. ऐक .... "

" ऐकतो सांग. "

" माँचा जन्म फ्रान्समध्ये एकवीस फेब्रुवारी अठराशे अठ्ठ्याहत्तर साली झाला. माँचं खरं नांव मीरा. त्यांचे आई-वडील खूप श्रीमंत होते. त्यांचे पती पॉल रिशर हे पण बडे गृहस्थ होते. खूप समंजस, शहाणे आणि सुस्वभावी होते. माँ प्रथम पाँडीत आपल्या पतीं-बरोबरच आल्या. त्यांना लोक माँ, मदर किंवा माताजी म्हणतात.

मीरा हे त्यांच नांव केव्हाच मागे पडलं. लहानपणापासून मदरला परमेश्वरी साक्षात्कार होत असे."

"परमेश्वरी साक्षात्कार म्हणजे ?" अतुलनं विचारलं.

"माताजींना लहान वयातच स्वप्नं पडत. माणसाच्या चांगल्या कृतीत परमेश्वराचं दर्शन होऊ शकतं, हे त्यांना लहानपणीच कळलं होतं. त्यांना वाटायचं, या पृथ्वीवर एक दिव्य-जीवन मनुष्य जगू शकला तर माणसांतच देव भेटू शकेल."

"म्हणजे मनुष्य चांगला वागला तर देवासारखा होऊ शकतो. हो ना ?"

"हो, छोटे भैय्या, तुझ्या भाषेत तू बरोबर सांगितलस. माँ साधारण तेराएक वर्षांच्या असताना जवळजवळ वर्षभर रोज रात्री त्यांना एक स्वप्न पडत असे."

"असं ? काय होतं ते स्वप्न ?"

"त्यांनी आपल्या 'प्रार्थना व ध्यान' या पुस्तकात या स्वप्नाचं फार छान वर्णन केलंय. त्या म्हणतात, 'मला असं वाटायचं की मी आकाशात उंच उंच जात आहे माझ्या अंगावर सोन्याच्या धाग्याचा विणलेला खूप मोठा झगा आहे. मी जसजशी वर जाई तसतसा त्या झग्याचा घेर वाढत जाई आणि जणू साऱ्या शहरावर एक छत्र धरलं जाई. त्या छत्राखाली चारी बाजूंनी पुरुष, स्त्रिया, मुलं, बाळं, रोगी, दुःखी, कष्टी माणसं एकत्र येत. याचना करत. दुःख दूर व्हावं म्हणून प्रार्थना करत. माझ्या झग्याचा स्पर्श करताच सगळ्यांचं दुःख दूर होई. आणि सगळीकडे आनंदी आनंद होऊन जाई.' माँ म्हणतात हा अनुभव सतत येत राहिल्यानं माझं काम अशा लोकांची सेवा करणं हेच आहे असं लहान वयातच माझ्या मनानं घेतलं."

"तसं काम केलं त्यांनी ?" अतुलनं विचारलं.

" हो तर. आश्रमाचा केवढा पसारा वाढलाय पहातोस ना ? माँ नं किती तरी कष्ट केले सर्वांसाठी. आज दोन एक हजार लोक तरी आश्रमवासी आहेत. माँ सगळ्यांना आईच्या मायेनं सांभाळते. आश्रमाचा सगळा भार माँनं आपल्या खांद्यावर घेतला म्हणून अरविंदांना एकांतवासात जाता आलं, योगसाधना करता आली. लहान वयातच मदर एकाग्रचित्त होऊन तासनतास आपल्या लहानशा खुर्चीत बसून रहात असे. आईला वाटायचं आपल्या मुलीनं इतर मुलांप्रमाणे खेळावे, बागडावे, हट्ट करावा, खोड्या कराव्या पण ही मुलगी एकटक कुठेतरी बघत बसून रहायची. त्या वयातच त्यांना जाणवलं होतं की कुणीतरी आपला पाठीराखा आहे. कोणती तरी दिव्य शक्ती आपलं संरक्षण करते आहे. तसा त्यांना अनुभव पण आला. एकदा त्या टेकडीवर चढत होत्या. तोच त्यांचा पाय घसरला, काटे कुटे दगड धोंडे होतेच, पण माँ घसरून पडल्यातरी त्यांना कांहीच झालं नव्हतं. कुणीतरी अलगद आपल्याला हातावर झेलत होतं असं त्या म्हणतात. "

" पण असं कसं ग होईल दी ? माणूस पडलं की त्याला लागणारच की. " अतुल म्हणाला.

" तुझं म्हणणं खरंय भय्या. पण तू माँ ला भेटलास, त्यांना तू. पाहिलंस की तुला लगेच कळेल की माँ तुझ्या माझ्या सारख्या सामान्य नाहीत, त्यांच्याजवळ दैवी शक्ती आहे. "

" हं. मग काय झालं ? "

" मी काही गोष्ट सांगत नाही राजा तुला. पण ऐक. वयाच्या सोळाव्या वर्षी माँ ला चित्रकलेच्या शाळेत घालण्यात आलं. इतर मुलींप्रमाणे माँ चं वागणं नसायचं, त्यामुळें त्यांच्या मैत्रिणी त्यांची एक पौराणिक देवी म्हणून चेष्टा करत. कुठेही अन्याय दिसला की

माँ त्याविरुद्ध बंड करत, भांडत, न्याय मिळवून देत. नंतर त्या गूढविद्या पण शिकल्या."

"म्हणजे ? ही कोणती विद्या असते दी ?"

"म्हणजे मंत्र, तंत्र, जादू-टोणा, करणी वगैरे असतं ना त्या बद्दलचं ज्ञान. अज्ञात, गूढ, अद्‌भुत यांचा अभ्यास."

"पण हे सगळं वाईट असतं ना ? आई नेहमी म्हणते कुणीतरी समीरदावर जादूटोणा केलाय, करणी केलीय म्हणून तो तसा वागतो. कुणीतरी त्याला मंतरलं म्हणून तो घर सोडून त्या दुष्टांच्या मागे मागे गेला."

"हे बघ, कोणत्याही ज्ञानाचा चांगला वाईट उपयोग करणं हे ज्याच्या त्याच्यावर अवलंबून असतं. तू शाळेत जसजसा वरच्या वर्गात जाशील तसंतसं तुझं ज्ञान वाढेल. उदाहरण द्यायचं तर माणसाच्या शरीराची रचना जाणून घेण्यासाठी तुम्हाला उंदीर बेडूक, ससा कापून ते शास्त्र शिकवतील, उद्या तू काहीही कारण नसताना ससा, उंदीर मारू लागलास, जीवाची, हत्त्या करू लागलास तर त्या ज्ञानाचा उपयोग वाईट केलास असंच होणार. अणुबॉम्ब-मुळे साऱ्या जगाचा नाशही होऊ शकतो आणि अणूच्या संशोधनाचा उपयोग मानव जातीच्या कल्याणासाठीही करता येतो. विस्तवावर स्वयंपाकही करता येतो आणि त्यानं आग पण लावता येते. माँनं या ज्ञानाचा उपयोग आपली योगिक-शक्ती, आपलं सामर्थ्य वाढवून घेण्यासाठी केला. पटलं ?"

"पटलं."

"समीरदाच्या कोवळ्या मनाचा कब्जा दुष्ट माणसांनी घेतला. त्याला वाईट मार्गाला लावलं, तो आणि त्याचे साथीदार खून जाळ-पोळ, मारहाण, लूटमार करत हिंडतात,तीच शक्ति चांगल्या कामाला

लावता येईलच की. अरे, अशी बिघडलेली मुलं इथं येतात. आधी चिडतात, भांडतात, वाईट वागतात पण हळूहळू त्यांच्यावर आश्रमाच्या शिस्तीचा परिणाम होतो. या वातावरणाचा परिणामच असा आहे की ते आपोआप शांत, समंजस होतात. त्यांच्या भोवताली सतत पवित्र, शान्त, स्वच्छ, सोज्वळ वातावरण असते. त्याचा परिणाम निश्चितच होतो. बरं या गोष्टी त्यांना कुणी शिकवत नाही, ते किती वाईट आहेत असं कुणी त्यांना म्हणत नाही, त्यांना उपदेश करत नाहीत. आपोआपच ते सुधारत जातात. त्यांच्या मनालाच त्यांचे दोष कळतात. श्री. अरविंद तर नेहमी म्हणत की सुधारणा आतून म्हणजे मनातूनच झाली पाहिजे. बाहेरून चिकटवलेलं शहाणपण टिकत नाही आणि ते खरं पण नाही. हे बघ, तू हडकुळा आहेस म्हणून माती चिटकवून का तुला लठ्ठ करता येणार आहे ? त्यासाठी तू चांगलं खायला, प्यायला पाहिजे, व्यायाम करायला पाहिजे, ताकत आणि वजन वाढवायला पाहिजे, तर तू छान दिसशील मुख्य म्हणजे खराखुरा छान होशील. "

अतुल आपल्या दीदीचं बोलणं मन लावून ऐकत होता. बोलला नाही.

" का रे गप्प झालास ? पटलं नाही मी काय म्हणते ते ? "

" पटलं, चल ना ग दी, उद्याच जाऊ आपण कलकत्त्याला. "

" कां रे ? एवढं सांगून सवरून परत तू जायची भाषा करतो आहेस ? "

" तसं नाही ग, हे सगळं आईला सांगायला हवं. ती फार काळजी करते समीरदाची. "

आईच्या आठवणीनं उदास झालेला अतुलचा चेहरा पाहताच सुनीताच्या मनात कालवाकालव झाली, वाटलं आपल्याला आई

मिळालीच नाही कधी. दां नी माया दिली, माँ नं प्रेम केलं म्हणून आपण जगू शकलो, नाहीतर मद्रासच्या एखाद्या अनाथ आश्रमात किंवा रिमांडहोममध्ये आपण वाढलो असतो. कदाचित् अतुलच्या दा प्रमाणे वाईट लोकांच्या हाती सापडलो असतो. विचार करता करता सुनीतानं स्वत:ला सावरलं, म्हणाली,

" राजा भैय्या, तुला एक गोष्ट सांगू ? "

" हो पण राजा राणीची नको हं. आता मी लहान नाही. " अतुल म्हणाला.

" छे रे राजाराणीची गोष्ट मला मुळी येतच नाही. मी तुला एक रहस्यकथा सांगणार आहे. "

" म्हणजे डिटेक्टिव्ह ? वा मग तर मजाच झाली. ए दीदी, अग तो डिटेक्टिव्ह असा हुशार असतो की विचारू नकोस. दुष्टांना बरोबर पकडतो. फायटिंग तर अशी करतो ! वा. मी खूप वाचल्या आहेत रहस्यकथा. "

सुनीता हसू लागली. पाहता पाहता अतुलचा मूड एकदम बदलला होता. तो मांडी घालून सरसावून बसला होता. त्याचे डोळे चकाकत होते. त्याचे भुरे सोनेरी केस वारंवार कपाळावर येत होते. एक सुरेख बट वाऱ्यानं डुलत होती. सुनीताला वाटलं, किती सुरेख आहे हा ! याची आई पण अशीच छान असेल, झालं तर हेमा, समीर ... याचे बाबा ... या मुलामुळे आपल्याला ती माणसं आपलीच वाटू लागली आहेत. अशा एखाद्या कुटुंबाचं आपल्याला किती आकर्षण आहे.

" सांग ना ग दीदी. "

" या गोष्टीत डिटेक्टिव्ह कोण आहे माहित आहे ? "

" कोण ? "

" माँ. "

" चल माँ काय करणार हाणामारी. "

" ऐक तर खरं. त्यावेळी अरविंद, त्यांचे सहकारी, माँ आणि माँची दत्ता नावाची एक मैत्रीण सगळेजण एकत्र राहू लागले होते. एकदा अचानक काय झालं माहित आहे ? घरावर दगडच पडू लागले. इकडून तिकडून, चारी अंगानं दगडांचा वर्षाव होऊ लागला. प्रत्येकजण बाहेर पहात होता. पण कळतच नव्हतं कुठून हे दगड येताहेत ते. शेवटी दारं बंद करून सगळेजण बसून राहिले. तरीही बंद खोलीत दगड येत राहिले. एका मुलाला जखमी करत राहिले. परत सगळ्यांनी लाठी, काठी, कंदील घेऊन छतावर जाऊन पाहिलं पण दगड जसे हवेतूनच येत होते. ही दगडफेक बरेच दिवस चालू होती. "

" अरे बापरे ! मग ग ? "

" माँ ला गूढ विद्येचं ज्ञान होतं. शेवटी माँ नं आपल्या विद्येच्या बळावर या भुताटकीचं रहस्य शोधून काढलं. त्या घरात एक स्वैपाकी होता. वेट्टूल नाव होतं त्याचं. तो काम चांगलं करत नव्हता, म्हणून त्याला काढून टाकण्यात आलं होतं. चिडून त्यानं करणी केली पण शेवटी वेट्टूल स्वत: खूप आजारी पडला. त्याची बायको रडतच आली, माँच्या पाया पडली. तिनं सांगितलं की एका मुसलमान फकीराकडून तिच्या नवऱ्यानं ही भुताटकी केली होती. "

" मग ही दगडफेक थांबली ? "

" हो. त्यांच्याकडे एक छोटासा गडी होता त्याच्यावर ही करणी केली होती. माँ म्हणाली, 'आपण या मुलाला घरातून बाजूला करू

या. ' तो मुलगा त्या घराबाहेर पडताच त्या घरावर होणारी दगडफेक थांबली. माँ नं आपल्या मंत्रविद्येच्या जोरावर या संकटाचं मूळ शोधून काढलं. "

" वा छानच गप्पा रंगल्या आहेत तुमच्या. उठा, भूक बिक लागलीय की नाही अतुल ? " दांची हाक आली तेव्हा कुठे दोघांच्या गप्पा थांबल्या. तिघंजण किचनच्या वाटेला लागले.

# ६

समोर अथांग समुद्र पसरला होता. निळाशार पाण्यावर दूरवर एक बोट दिसत होती. रात्रभर धो धो पाऊस पडून गेला होता. किनाऱ्यावरचा बांध काही ठिकाणी तुटला होता. मोठाले दगड उन्मळून पडले होते. फुटपाथ बऱ्याच जागी उध्वस्त झाला होता. सकाळची कोवळी उन्हं पाण्यावर काचापाणी खेळत होती. किनाऱ्यावरील वाळूतून असंख्य पिवळेधमक खेकडे भोक पाडून वर आले होते.पिवळ्या सूर्यफुलांचा ताटवा फुलला होता जणू !

अतुल उगवत्या सूर्याकडे पहात, अंगावर गार वारं घेत एकटाच समुद्रकाठी सावकाश पावलं टाकीत हिंडत होता. त्याच्या मनात काहीतरी विलक्षण उभं रहात होतं, कोसळत होतं. खूप छान, अनपेक्षित असं घडून गेलं होतं. पण ते पेलवत नव्हतं. सांभाळलं जात नव्हतं. कुणाला तरी हा आपला आगळा अनुभव सांगावा वाटत होता पण तो सांगता येत नव्हता. त्या भावनेला शब्द मिळत नव्हते.

रात्रभर बरसणाऱ्या पावसाच्या लयीत अतुल आपला अनुभव परत परत आठवत होता. आपल्याला नक्की काय झालंय ते तपासून पहात होता. त्या बरसत्या धारेत आपले विचार ओवता येतील का याचा विचार करत होता.

खरं तर आपण इतका गंभीरपणें आजच विचार करतो आहोत. आजवर अशा छान छान कल्पना आपल्याला सुचल्याच नव्हत्या. निसर्गाचं असं आकर्षण कधी वाटलंच नव्हतं. काल रात्रभर आपल्या मनात कवितेच्या ओळी उमटत राहिल्या. नक्की काय होतं आपल्या मनात ते आपलं आपल्यालाच कळत नव्हतं पण काहीतरी चांगलं, कांहीतरी हवंहवसं मनात जन्म घेत होत हे खरं. आता त्या ओळी आठवत नाहीत, आतां ते विचार स्मरत नाहीत पण काहीतरी चांगलं घडलं होतं.

काल सकाळी दा आश्रमात जाऊन घरी आले तेव्हा त्यांचा चेहरा खूप आनंदी दिसत होता. दा कधी नव्हे ते गुणगुणत होते, स्वत:शीच हसत होते.

"दा मला कळलंय बरं का तुमच्या या आनंदाचं रहस्य, लपवू नका." दी मिस्किलपणे म्हणाली.

" बरं बरं तू फार शहाणी आहेस. झालं." दा हसत म्हणाले.

"पण माझा हा भैय्या, त्याला बिचाऱ्याला आपल्या दां च्या आनंदाचं रहस्य कुठे माहित आहे. नुसता टकमका पाहतोय."

"त्यात काय पहायचंच ग वेडे."

"नाही चुकलंच, तुम्ही गुणगुणताहात ना ते ऐकतोय."

"कोण मी गुणगुणतोय ? चल जन्मात गाणं म्हणालो नाही." हसतच दा म्हणाले. आपण दां चा आणि दीदीचा संवाद ऐकत

होतो, मनात येत होतं, आपल्या घरी असं खेळकर वातावरण कधीच का नसतं ? आई सारखी काळजीत, बाबा चिडलेले, कंटाळलेले आणि हेमादी घाबरलेली. त्यामुळे की काय आपण सारखे घराबाहेर असायचो.

दांच्या आनंदाचं कारण कळलं, माँ नं आपल्याला भेटायला बोलावलं होतं. माँ आशीर्वाद देणार होती मग शाळेत प्रवेश मिळणार होता. खरं तर हे सगळं ऐकून आपल्याला आनंद झाला नव्हता. उलट मनात राग दाटून आला होता. या सगळ्या मोठ्या लोकांनी आपलं खेळणं करून टाकलंय. त्यांना वाटतंय म्हणून आपण तसं वागायचं. आपल्याला कधी कुणी काही विचारलंच नाही. तुला काय हवंय, काय नकोय, कुठं शिकावं वाटतंय, काय शिकावं वाटतय, कुणी कसली पर्वाच केली नाही. आजोबांची इच्छा होती म्हणून इथे पाठवून दिलं. मी समीरदा सारखा होऊ नये म्हणून आईनं स्वत:च्या मनाविरुद्ध आजोबांच्या इच्छेला मान दिला. बाबांना तर कशाचंच काही नव्हतं. माझ्यासाठी खर्च किती होईल हीच काळजी त्यांना होती. अनिल दा म्हणाले, 'मी घेतो जबाबदारी' तेव्हा त्यांनी आनंदानं आपली पाठवणी केली. हेमादीला आपला राग कळत होता पण करते काय विचारी म्हणाली, 'माझं लग्न झाल्यावर मी तुला माझ्याकडे घेऊन जाईन तोंवर रहा तिथं.'

अशी कशी ही मोठी माणसं ! आत्तां माँ ठरवणार त्या शाळेत आपण जायचं की नाही. वा !

दिवसभर आपण या सगळ्या विचारांनी पेटलो होतो. नाराज होतो. माँ ला भेटायला जायचं म्हणून दा आणि दीदी किती आनंदात होते. आला गेला म्हणत होता. "आज माँ च्या दर्शनाला जाणार नं !" त्यांच्या चेहऱ्यावरचा तो भक्तिभाव, आपल्या सुदैवाबद्दल

कौतुक, सगळं पाहून आपल्याला वाटत होतं, एवढं काय वाटतंय या लोकांना. आपण काही चंद्रावर नव्हतो निघालो.

दा आणि दीदीची धावपळ पाहून आपण चिडून विचारलं सुद्धा.

" दी, एवढं काय वाटतंय तुम्हाला ? मला तर काहीच वाटत नाही. "

दी नं कुठूनशी सुरेख फुलं आणली होती. त्या फुलांचा सुरेख गुच्छ करण्यात ती दंग होती. म्हणाली,

" तुला आत्ता नाही कळायचे ते. "

" रागावलीस ? " तिच्या चेहऱ्यावर नाखुशी पाहून आपण विचारलं.

" नाही. पण असं दां समोर बोलू नकोस. "

" पण मला खरंच काही कळेनासं झालंय. तुम्ही सर्व मोठी माणसं मला न विचारताच मी काय करावं, कसं वागावं हे का ठरवता? मला नाही ते आवडतं. "

" तू लहान आहेस ना अजून म्हणून. "

" नाही मी लहान नाही. मला सगळं कळतंय. माझं तिथलं शिक्षण अर्धवट सोडून मला इकडे जबरदस्ती आणलंय. दोन वर्षांनी मी मॅट्रिक झालो असतो. "

" तू आज माँ चं दर्शन घेऊन ये. तुला तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतील. हा फुलांचा गुच्छ मी तुझ्याचसाठी तयार करते आहे. तू खरच भाग्यवान आहेस म्हणून माँ तुला आशीर्वाद देणार आहे. माँ ला लहान मुलं खूप आवडतात. "

" हं. "

" तुला एक गोष्ट सांगू ? "

" म्हणजे काय होईल ? "

"तुझा पारा जरा खाली उतरेल," दी हसत होती.

"तू सुद्धा माझी चेष्टा कर छान आहे. तुमच्या तावडीत सापडलोय. करा काय हवं ते."

बोलता बोलता आपला आवाज चढला होता, दी उठली तिनं आपल्याला जवळ घेतलं. म्हणाली, "छोटे भैय्या तू इथे आल्यापासून मी किती सुखी झाले आहे ते तुला कसं सांगू ?"

अशीच आहे दी. आपल्याला रागवू देतच नाही मुळी. तिचा उदास चेहरा पाहून आपण म्हणालो.

"सांगतेस ना गोष्ट ?"

"हं. एकदा काय झालं, कलकत्त्याहून एक खूप श्रीमंत मनुष्य खूपसे पैसे घेऊन इथे आला. म्हणाला,"

"मला माँचं दर्शन हवंय, मी हे लाखो रुपये आश्रमाला देणगी म्हणून माँच्या हातात देणार आहे."

माँ कडे तसा निरोप गेला. माँ क्षणभर विचार करून म्हणाल्या, "नको, त्या माणसाला मला भेटायचे नाही, त्याचे पैसे पण आपल्याला नको." कुणाला काही कळेना असं माँ का म्हणतेय ते. शेवटी माँ म्हणाल्या,

"हे पैसे त्या माणसानं आपल्या भागीदाराला मारून मिळवले आहेत. आता पापाचं ओझं हलकं करण्यासाठी तो ते पैसे आपल्याला देऊ पाहतोय. आपल्याला असे पैसे नकोत."

"माँला हे कसं कळलं," आपण विचारलंच.

"योगामुळे माणसाला अनेक शक्ती प्राप्त होतात. निष्पाप मनाला चांगलं वाईट ओळखण्याची दृष्टी आपोआप मिळते. अज्ञात अशा गोष्टी जाणून घेणं, भविष्याची चाहूल लागणं हे साधनेनं माणसाला मिळवता येतं. माणसामध्ये कितीतरी सुप्त शक्ती असतात. त्यांना

जागृत करणं, त्या शक्तींचा उपयोग करून घेणं हे माणसाला जमू शकतं. तसा प्रयत्न मात्र हवा."

हे दा आणि ही दी काही विचारायला गेलं की हे असं न कळणारं बोलतात. कळत नसतं नीटसं पण ऐकावं वाटतं हे मात्र खरं. त्या शब्दांचा खरेपणा, सांगणाराचा भक्तिपूर्ण आवाज हे मनावर परिणाम करतातच. परवा आपण हेमादीला पत्र लिहिलं तेव्हा लिहिलं होतं, दीदी, मला तर वाटायला लागलंय, मी खूप मोठा झालोय, तुझ्यापेक्षा मोठा. अग म्हणजे भलताच गंभीर झालोय मी. शहाणा पण झालोय.

आणि खरंच माँ च्या भेटीचा तो प्रसंग ! त्या क्षणापासून पार वदलून गेलो आहोत आपण. मनावर एक दडपण आलंय् पण ते हवं हवसं वाटतंय. गूढ असं वलय स्वत:भोवती फिरतंय असं सतत जाणवतंय आपल्याला. माँ चा स्पर्श अजून अंगावर रोमांच आणतोय.

दुपारचे तीन वाजले असतील. दी नं इस्त्री करून ठेवलेला पांढरा शर्ट, पांढरी चड्डी आपण घातली, तिनं पण पांढरी स्वच्छ साडी नेसली. दा बरोबर होतेच. एका फार मोठ्या कामाला निघाल्यासारखे दोघं गंभीर होते. माझ्या आयुष्यात फार मोठ्या सुदैवाचा क्षण आलाय अशा भावनेनं ते आपल्याशी वागत होते. आपण आश्रमात आलो. मेडिटेशन हॉलच्या लगत असलेल्या जिन्यावरून आपण वर जाऊ लागलो. जिन्यावर हरणाच्या कातडीच्या रंगाचा गालीचा होता. मऊसूत, सुंदर. शांत शांत होतं सगळीकडे. माणसं मांजराच्या पावलानं वावरत होती. जिना चढून उजव्या हाताला असलेल्या गच्चीत आपण तिघं गेलो. आपल्याआधीच तिथे बरेच लोक होते. पुरुष, बायका, मुलं. प्रत्येकाच्या हातात फुलं होती. कुणी कुणाशी बोलत नव्हतं. एक म्हातारा मनुष्य हातात यादी घेऊन उभा होता.

एकेकाचं नाव पुकारायचा, आत मदरच्या दर्शनाला घेऊन जायचा. हा मनुष्य कसा एखाद्या साधूसारखा दिसत होता. अंगावर पांढरे-शुभ्र धोतर, गळ्यात जानवं, उघड्या छातीवर पांढरी दाढी रुळत होती. माँच्या दर्शनाला आलेली माणसं पाहून आपल्या मनात खूप खूप विचार येऊन गेले. त्यात परदेशी स्त्री-पुरुष होते. एक परदेशी मुलगी तर पातळ नेसून, डोळे मिटून, मांडी घालून बसली होती. तिन माँ साठी भरतकाम केलेले रुमाल आणले होते. एक पारशी मुलगी एका कागदी डब्यात माँ साठी साडी घेऊन आली होती. लहान लहान मुलांच्या हातात टॉफीचे डबे होते. एका माणसाचा एक पाय केवढा सुजला होता. आपण दीला विचारलं तर म्हणाली, ' हत्ती पाय झालाय त्याला.' एका गुजराथ्याचा खिसा नोटांनी फुगला होता नुसता. प्रत्येकाजवळ फुलं होती. नाना रंगांची, नानातऱ्हेची. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भक्तिभाव होता. कुणाला घाई नव्हती, कुणाची तक्रार नव्हती. माँ च्या दर्शनाला प्रत्येकजण उत्सुक होता. दा आणि दीदी पण कसे गप्प होऊन गेले होते. दीदीनं आपल्या हातातला फुलांचा गुच्छ घेतला, तिथेच बरेच ग्लास पाणी भरून ठेवले होते. फुलं सुकून जाऊ नये म्हणून ती सोय करण्यात आली होती. कित्येकांनी आपली फुलं त्या ग्लासातून ठेवली होती. दांनी टॉफीचा डबा आणला होता. म्हणाले होते, 'अतुल बेटा, हा डबा माँ च्या हातात दे, माँ त्याला स्पर्श करील तुला परत देईल. प्रसाद म्हणून आपण ती टॉफी सगळ्यांना वाटू.

"कलकत्त्याला पाठवू." आपण म्हणालो होतो.

"हो हो जरूर." दा म्हणाले.

"दी समीरदाला पण पाठवू ही टॉफी."

"तुरुंगात ?" तिनं विचारलं.

" सुनीता बेटी, प्रयत्न करू. माँ ची इच्छा असेल तर जमेलही. माँ चा प्रसाद मिळाल्यानं समीर भाग्यवान ठरेल, शहाणा होईल. " दा म्हणाले.

" अतुल चट्टोपाध्याय ... " गुहेतून आवाज यावा असा पुकारा झाला. आपण पटकन उठलो. दीनं फुलं आपल्या हातात दिली. दा आणि दीदी बाहेरच थांबले. आपण काचेचं दार लोटून माँ च्या खोलीत गेलो. फार मोठी खोली नव्हती. दाराशीच एक वृद्ध गृहस्थ उभे होते. त्यांनी आपल्याला 'थांब' म्हणून खूण केली. आपल्या पुढे एक परदेशी जोडपं होतं, एक म्हातारी बाई होती, एक मुलगी होती. खोलीत काय होतं हे आपण धडपणे पाहू शकलो नाही. एका खुर्चीवर माँ बसल्या होत्या, प्रणाम स्वीकारत होत्या, आशीर्वाद देत होत्या. शेजारीच फुलांचा ढीग साठला होता, कितीतरी वस्तु होत्या त्यांच्या आजूबाजूला. माँ च्या डोक्यावरचे केस अगदी विरळ झाले होते. अंगावर शाल होती. पाठ झुकली होती. त्या खोलीतलं वातावरण भारावून टाकेल असं होतं. त्या हवेत कसलातरी सुंदर गंध दरवळला होता. मंद प्रकाश होता. आपण माँ जवळ गेलो. हातातली फुलं आणि टॉफीचा डबा माँ ला दिला. माँच्या पुढ्यात डोकं टेकून प्रणाम केला. हो असं करायचं म्हणून दीदीनं दहा वेळा आपल्याला सांगितलं होतं.स्वतः त्याप्रमाणे करून दाखवलं होतं.माँ च्या चेहऱ्यावर सुरकुत्या होत्या.म्हातारपणामुळे त्या वाकल्या होत्या.पण माँ आपल्याकडे पाहून हसल्या तेव्हा मात्र आपल्या अंगावर फुलांचा वर्षाव झाला जसा काही. खूप खूप आनंद झाला होता. त्यांनी आपले हात हातात घेऊन त्यावर आपल्या रेशमासारख्या हातांनी थोपटलं तेव्हा आपल्या मनातली सगळी भीती, सगळा गोंधळ एकदम संपून गेला. कलकत्ता सोडल्यापासून पहिल्यांदाच मनात आलं, बरं झालं आपण इथे आलो

माँच्या स्पर्शात निश्चितच जादू होती. तिचं हंसणं म्हणजे खरंच आईसारखं हंसणं होतं. खूप प्रेमळ, खूप आपलेपणाचं.

चार पाच मिनिटांतच आपण त्या खोलीबाहेर आलो. हातात माँनं परत दिलेला टॉफीचा डबा होता आणि एक फूल पण होतं.

" माँन दिलं हे फूल ? " बाहेर येताच दीनं विचारलं.

" हो. "

" श्री. अरविंद. श्री. माँ..." डोळे मिटत आपल्या छातीवर उजवा हात फिरवीत दा म्हणाले.

" दा ..." आपण त्यांच्या जवळ गेलो.

" बेटा, माँ नं तुला आपल्या छत्राखाली घेतलं. आता मी जबाबदारीतून मोकळा झालो. सुनी बेटा, आपल्या अतुलचं कल्याण झालं. मेल्यावर याच्या आजोबाला जाऊन सांगीन. आता त्याची काळजी करू नका. माँ नं त्याला आशीर्वाद दिला. "

आपल्या हातातल्या फुलाकडे पहात दांनी विचारलं.

" अतुल, हे फूल कशाचं प्रतीक आहे, माहीत आहे ? "

" नाही. "

" हे फूल गॉडस् माइंडचं प्रतीक आहे. "

करदळीच्या फुलासारख्या त्या बदामी रंगाच्या फुलाकडे आपण पाहिलं. गॉडस् माइंडचं प्रतीक ! खरंच !

" तू फार भाग्यवान आहेस भैय्या. या फुलाच्या स्वरूपात माँ नं तुझं भविष्य सांगितलंय, " दी म्हणाली.

" म्हणजे ? "

" म्हणजे तुला देवबुद्धि मिळालीय. तू फार मोठा होशील, हुशार होशील. माँ आणि अरविंदांच्या मनात ही भूमि देवभूमी करायची

जिद्द आहे... या देवभूमीला योग्य असा तू दिव्य मानव होशील. उषानगरीला योग्य असा नागरिक होशील."

कालचा सबंध दिवस आपण एका अद्‌भुत अशा शक्तीनं भारावून गेलो होतो. काय होतंय कळत नव्हतं. पण तृप्त वाटत होतं. खूप शांत, खूप आनंदी वाटत होतं. मनात सुखाचा झरा वहात होता जसा. काही खावं प्यावं पण वाटेना.

रात्रभर पाऊस पडत राहिला. आपण जागेच होतो. मध्येच डोळा लागत होता. डोळे मिटल्यावर पिवळा धमक प्रकाश दिसत होता. दीदी आणि दा पण रात्रभर झोपू शकले नाहीत. पहाटे त्यांचा डोळा लागला असावा. आपण उठलो, समुद्रावर आलो.

अतुल समुद्राच्या काठाकाठानं फिरत होता. विचार करत होता त्याचं त्यालाच आश्चर्य वाटत होतं. खरं तर आपण आजवर इतका विचार कशाचाच केला नाही. पण काल माँचं दर्शन झाल्यापासून हे काय झालंय आपल्याला ? भूक तहान कशी विसरून बसलो आपण ?

"अतुल बेटा ..." दांचा आवाज असा रडवा का होता ?

"काय दा ?"

"अरे, मला सांगून तरी इकडे यायचंस. किती काळजी केली. मी तुझी ? किती शोधाशोध केली ?"

"चुकलचं दा माझं."

"पण बायकांना उपजतच शहाणपण असतं बघ. तुझ्या दीनं बरोबर सांगितलं. म्हणाली, समुद्राच्या काठी भटकत असेल. आलो तर खरंच तू इथेच फिरतोहेस."

"चला दा, जाऊ या घरी." अतुल म्हणाला.

" या पावसाचा आणि भविष्यातील घटनांचा संबंध असावा असं मला नेहमी वाटतं. आत्तापर्यंत दोन चार वेळा मला या धो धो पावसाचा असाच अनुभव आलाय. काहीतरी चांगलं, काहीतरी निराळंच होणार असलं की असा हा पाऊस कोसळतो."

" दा ..."

पण अनिलदा आपल्याच स्वप्नात रंगून गेले होते. म्हणाले,

" बरं का अतुल, श्री. अरविंद चंद्रनगरहून पाँडेचरीला आले तो एप्रिलचा महिना होता. म्हणजे ते पावसाचे दिवस नव्हते पण त्यांनी या किनाऱ्यावर पाऊल टाकलं आणि अचानक धो धो पाऊस आला. अरे, मी भिजलो आहे त्या पावसात ? सगळेजण चकित झाले. निसर्गाचा केवढा चमत्कार होता. एका महापुरुषाचं आगमन झालं होतं. पावसानं त्याचं स्वागत केलं होतं. असाच आणखी एकदा मी मुसळधार पावसात भिजलो आहे." दा म्हणाले.

" कधी ?"

" ज्या दिवशी माँ आपलं घर सोडून आमच्याबरोबर रहायला आल्या त्या दिवशी तर पावसानं नुसता धुमाकूळ घातला होता. माँ चं घर पाण्यानं भरलं होतं. सामानाचं नुकसान झालं होतं. घरात कोरडी जागा शिल्लकच नव्हती. रात्रीची वेळ होती. पावसामुळे घरं पडत होती, छप्परं उडून जात होती. अरविंदांना रहावलं नाही. तशा पावसात ते माँ च्या घरी आले. मी होतोच त्यांच्या पाठोपाठ. माँ शान्त होती. चकित होऊन पाऊस पहात होती. माँ च्या आगळेपणाचा तो माझा पहिला अनुभव. त्या लहान वयातही माँ चा तो शान्तपणा, हसरा चेहरा पाहून मी थक्क झालो होतो. खरं तर किती नुकसान झालं होतं ! त्या घरात राहणंही धोक्याचं होतं पण माँ ला जणू कशाची चिंता नव्हतीच. सेजदा तिला म्हणाले,

" चला माझ्या घरी. आमच्याबरोबर रहा." मुकाटपणे सगळं सोडून माँ त्यांच्या पाठोपाठ आम्ही रहात होतो त्या घरी आली. त्याच रात्री आम्ही सगळ्यांनी मिळून माँ चं सामान हलवलं.

चल बाबा घरी. चल पटकन. तुझी दीदी वाट पहात असेल.

दांनी एकदम विषय बदलला, अतुलला घेऊन ते घराकडे निघाले.

# ७

अतुलची शाळा सुरू झाली होती. तो बावरून गोंधळून गेला होता. कलकत्त्यापेक्षा ही शाळा अगदीच निराळी होती. आश्रमाच्या समोरच ही शाळा होती. उंच भिंतीच्या आड हिरव्यागार झाडांनी त्याचं स्वागत केलं. फुलं बहरली होती. शाळेतील इतर मुलं पण कशी आनंदी, उत्साही दिसत होती. त्यांचं वागणं बोलणं कसं मनमोकळं होतं. आपल्या कलकत्त्यातल्या शाळे-सारखी ही मुलं कंटाळलेली, दडपलेली दिसत नव्हती. भोवताली शिक्षक, शिक्षिका वावरत होत्या. पण त्यांचं नातं जणू बहीण भावाचं होतं. सगळेच मोकळेपणानं बोलत होते. अभ्यासाचा बोजा नाही. होम-वर्क नाही, शिक्षा नाही. परीक्षा नाही. मास्तरांचा धाक नाही. भीती तर मुळीच नाही.

अतुलला सगळंच विचित्र वाटत होतं. ही काय शाळा झाली ! वह्या, पुस्तकं पण शाळेचीच. ती शाळा नव्हतीच जशी. वर्ग नव्हते,

एक मोठं घर होतं. मोठाल्या मोकळ्या खोल्या होत्या. अभ्यासक्रम होता पण त्याचं बंधन मुलांवर नव्हतं, मुलांनी आपल्या आवडीचे विषय निवडायचे, इतकंच नव्हे तर ठराविक तास नाहीत, तोच तो कंटाळवाणा कोर्स नाही. एका मागून एक धडा शिकवणे नाही. सर कसलाच धाक दाखवत नाहीत.अमुक करा,तमुक लिहा म्हणत नाहीत. उलट आज आपण कसला अभ्यास करायचा हे मुलांना विचारतात. शिक्षक शिकवत नव्हते तर नुसती वाट दाखवून देत होते, मार्गदर्शन करत होते. मुलांना व्याख्यानं देत नव्हते. उपदेश करत नव्हते. स्वत:च्या मोकळ्या मित्रत्वाच्या वागण्यानं आपलेपणा उत्पन्न करत होते. शंभर शंभर मुलांच्या वर्गात बसणाऱ्या अतुलला या सगळ्या गोष्टीचं मोठं आश्चर्य वाटत होतं. इथे तर तीन चार मुलांसाठी एक शिक्षक होता. बंधन म्हणून कशाचंच नाही. अडी अडचणी नाहीत. कायदेकानू, नियम नाहीत. म्हणूनच की काय प्रत्येक विद्यार्थी स्वत:हून नियमाचं पालन करत होता. शिस्त पाळत होता. अदबीनं वागत होता. बंधनातीत राहूनच ती मुलं सर्वांगानं वाढत होती. आपली सर्वांगीण उन्नती करून घेत होती.

अतुलशी त्याच्या बाई बराच वेळ बोलत होत्या. त्याची सगळी माहिती त्यांनी करून घेतली. आपल्या धाकट्या भावाशी बोलावं असा तो संवाद होता. अतुल आपल्या मोठाल्या डोळ्यांनी चकित होऊन सगळं टिपत होता, पहात होता.

" मी तुम्हांला काय म्हणू ? " त्यानं विचारलं.

" काहीही म्हण, तुला आवडेल ते म्हण."

" बहनजी म्हणू ? "

" म्हण की तुला हवं असल्यास."

" मी कुठल्या वर्गात बसू ? कलकत्त्याला आठवीत होतो. "

" छे रे इथे वर्ग विर्ग नाही. परीक्षा पण नाही."

" वा मग मी मॅट्रिक कसा होणार ? "

" नको होऊस. पदवी चिकटली की ज्ञान मिळालं असं समजायचं कारण नाही. मला जर विचारशील तर मी म्हणेन की तू बंगालीची आणि हिंदीची हायर स्टँडर्डची परीक्षा दे. पण तुझं गणित मात्र कच्चं दिसतंय. त्यासाठी तू गणिताची लोअर स्टँडर्डची परीक्षा दे. इतिहास भूगोल येतोय तुला. फ्रेंच आणि इंग्लिशची संवय तुला आपोआप होईल. या शाळेत विषयाच्या प्रगतीप्रमाणे एकच विद्यार्थी दोन तीन इयत्तेत असतो."

बहनजी काय बोलत होत्या त्याला काहीही कळत नव्हतं. एकाच विद्यार्थ्यानं अशा निरनिराळ्या वर्गातल्या परीक्षा कशा द्यायच्या ? तो विचारच करत राहिला.

" अतुल तुला खेळांपैकी काय आवडतं ? "

" मला बॉक्सिग आवडतं. शिवाय फुटबॉल."

" वा छान. इथे देशी-परदेशी सगळे खेळ खेळायला मिळतील. बरं पोहायला येतं ? "

" नाही."

" अरेच्चा ! काही हरकत नाही. तुला पोहायला शिकवू या. बरं गाणं, वाद्य, नृत्य, शिल्प, पेंटिंग, चित्रकला यांपैकी काय आवडतं ? "

" सतार वाजवायला आवडते, पण वाजवायला मिळालीच नाही. हेमादी हात लावू देत नाही. गायला पण आवडतं."

" चित्र काढतोस कधी ? "

" नाही."

" मी शिकवीन तुला. शिकशील चित्रकला ? "

" हो.पण खरं सांगू का ? मला समुद्राचं खूप आकर्षण आहे. बोटीत बसून खूप दूर दूर जावं वाटतं."

" अस्सं ! काय रे अतुल तुला बोट तयार कर असं म्हटलं तर करशील ? "

" आनंदानं. मला ठोकाठोकी खूप आवडते. माझी सायकल तर मीच रिपेअर करायचा. अहो, माझ्या हेमादीदीची सायकलची चेन पडली तरी ती घाबरून जाते. मी एका मिनिटात चेन बसवून देतो." अतुल हसत हसत म्हणाला.

" खरंच खूप हुशार आहेस हं तू. मला फार आवडलास. " बाई म्हणाल्या.

" तुम्ही मला बोट तयार करू द्याल ? इथे सुतारकाम पण शिकवतात ? " अतुलनं विचारलं.

" अरे शिकवणार कुणीच काही नाही. मात्र तुला मदत प्रत्येकजण करेल, तुला मार्गदर्शन करण्यात येईल. बोट तयार करण्यासाठी जे जे सामान लागेल ते मिळेल. "

" खरंच ? "

" हो मी कधी खोटं बोलत नाही अतुल."

" मला तर गंमतच वाटतेय या शाळेची. " अतुल हंसत म्हणाला.

" शिक्षणाविषयी, विद्यार्थ्यांविषयी माँ चे विचार, अरविंदांची मतं तुला एकदा कळली ना की तुला हे सगळं स्वाभाविक वाटेल, चांगलं वाटेल."

" चांगलं तर वाटतंच आहे, मजा पण वाटतेय. होमवर्क नाही अभ्यासक्रम नाही, परीक्षा नाहीत, वह्या-पुस्तकांचा भारा नाही. अभ्यासाचा काच नाही, मास्तरांचा धाक नाही ... "

" काय नाही तेवढंच तुला कळलं पण काय काय आहे ते नाही

जाणून घेतलंस ? हे बघ अतुल, पुस्तकातूनच फक्त शिकायला मिळतं हे विसर. मुलांनी भोवतालच्या वातावरणातून शिकावं, अनुभवातून शहाणं व्हावं. प्रत्यक्ष कृतीतून ज्ञान मिळवावं, हे जे ज्ञान मिळेल ते सर्वांगीण असावं. विद्यार्थ्यानं एकाच विषयाचा नव्हे तर अनेक विषयांचा अभ्यास करावा असं आमचं धोरण असतं. तुझी प्रकृती सुधारली पाहिजे. तुझ्या मनाचा योग्य तो विकास झाला पाहिजे, तुझी पंचेंद्रिय कार्यक्षम झाली पाहिजेत. मग तू खऱ्या अर्थानं शिकलास असं म्हणता येईल. तुझा तू शोक तुझा तू मार्ग काढ, चुकलास तरी हरकत नाही पण तूच ती चूक शोधून काढ. आम्ही तुला उत्तेजन देऊ. तू मागशील तेवढंच सहकार्य देऊ, तुला हवा तितकाच सल्ला देऊ. तुझ्या कामात आम्ही लुडबुड करणार नाही. तू स्वतःच्या कर्तृत्वानं, स्वतः कष्ट करून, स्वतःची अक्कल हुषारी चालवून मोठा हो. कळलं ? "

" हो कळलं. "

" बहनजी, इथे शिकायचं म्हणजे अरविंदांची आणि मदरची पुस्तकं वाचायची का ? "

" छे रे, तुला हे कुणी सांगितलं. इथे कोणत्याही विशिष्ट धर्माचं शिक्षण देण्यात येत नाही. आदर्श वागणूक हाच इथला धर्म. एकदा माँ ला असाच काहीसा प्रश्न विचारण्यात आला बरं का. माँ म्हणाली, अरविंदांचे विचार शिकावे, वाचावे लागत नाहीत, आश्रमाच्या सुंदर, पवित्र वातावरणात मुलं ते आपोआपच आत्मसात करतात. खरा माणूस म्हणून कसं जगावं हे अरविंदांनी आम्हांला शिकवलं आहे. इथे मुलांना आयुष्याला सामोरं जायला योग्य प्रकारे तयार करणं हेच शिक्षणाचं उद्दिष्ट आहे. मुलांनी जगात जगायला लायक झालं पाहिजे. आमच्या शाळेत खूप विद्यार्थी असण्यापेक्षा जी मुलं आहेत तीच तेजस्वी, बुद्धिवंत आणि निर्मळ मनाची असावी असं

आम्हांला वाटतं. ही मुलं भविष्याची देणगी आहे, म्हणून त्यांना येणाऱ्या काळासाठी तयार करायची आमची जिद्द आहे. प्रत्येक मुलाकडे इथे जातीनं लक्ष दिलं जातं."

"बहनजी, इथे खूप भाषा शिकवल्या जातात म्हणे. मला तर फ्रेंच अजिबात येत नाही."

"न का येईना. अरे तुला जे जे येत नाही पण यावं वाटतं ते तुला शिकता यावं म्हणून तर आम्ही इथं आहोत."

"इथं तर परदेशातले खूप विद्यार्थी आणि शिक्षक दिसताहेत."

"हो आहेत तर. जगात सगळीकडे आश्रमाचा बोलबाला आहे. अरविंदांचे आणि माँ चे भक्त जगभर आहेत. अरविंदांची पुस्तकं सगळ्या भाषांतून वाचली जातात. इथेसुद्धा इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, स्वित्झरलंड ... सगळीकडची मुलं आहेत, शिक्षक आहेत. झालं तर इथे संस्कृत, हिंदी, बंगाली, गुजराथी, ओरिया, तामिळ, तेलगू, कन्नड, प्रमाणेच इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, ग्रीक, लॅटिन, जपानी ... सर्व भाषा शिकवल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्याला संस्कृत शिकावं लागतं."

"म्हणूनच या शाळेला श्री. अरविंद आंतरराष्ट्रीय विद्या केंद्र म्हणतात का?" अतुलनं विचारलं.

"हो. अरे इथून शिकून बाहेर पडलेला विद्यार्थी जवळ सर्टिफिकिट नसलं तरी इतर विद्यार्थ्यांत चमकून उठतो, सरस ठरतो. परदेशातसुद्धा इथे शिक्षण घेतलेल्या मुलाला महत्त्व दिलं जातं. किंडनगार्डन पासून पार पदवी परीक्षेच्या अभ्यासापर्यंत या केंद्रात अभ्यासाची सोय आहे."

"पण इतक्या भाषा कशा शिकायच्या?"

" शिकायच्या नाहीतच. आपोआप येतात भाषा. अरविंदांना तर जवळ जवळ सगळ्या भाषा येत होत्या. माहित आहे ना तुला? परदेशात होते तेव्हा ते तिकडल्या सगळ्या भाषा शिकले. इकडे आल्यावर भारतीय भाषांचा त्यांनी अभ्यास केला. इथे हिंदीचे टीचर आहेत ना त्यांना दहा बारा भाषा येतात. मी तुझ्याशी फ्रेंच मध्ये बोलत जाईन. आपोआप तुला ती भाषा यायला लागेल. हे बघ अतुल, अभ्यासक्रम ठरवलेला असतो पण त्याचं बंधन मुलांवर नसतं. ज्याची जशी कुवत, मुख्य म्हणजे आवड असेल तसे विषय तो निवडतो, शिकतो. वर्गात शिकवण्यापेक्षा खुल्या वातावरणात सहा कार्यानं मुलानं शिकावं असं आम्हांला वाटतं. तू इथल्या कोणत्याही टिचरकडे जाऊन आपली शंका विचारू शकतोस. त्यांच्याशी गप्पा मार, चर्चा कर, वादविवाद कर, नाही पटलं तर तसं मोकळेपणाने सांग. तू जितका धीटपणानं वागशील तितकाच लवकर शिकशील."

" इथं कसंही वागलं तरी चालतं ? "

" कसंही म्हणजे कसं रे अतुल ? "

" म्हणजे हेच आपल्या मनासारखं ? "

" हो. काय हरकत आहे. वागून पहा तू मनासारखं. "

" म्हणजे वाईट पण वागता येईल ? "

" इथे वाईट वागावं वाटतच नाही हीच तर गंमत आहे. मुलांना मोकळीक दिली की ती बिघडतात हा समज या केंद्रानं चुकीचा ठरवलाय. "

अतुल आपले डोळे मोठाले करून ऐकत होता. त्याला सगळं अजबच वाटत होतं.

" म्हणजे या शाळेत तास नाहीत, शिकवणं नाही ? "

" वा नाही कसं ? असतं तर. शिकवणं असतं पण धड्यामागून धडे

शिकवत जाणं, प्रत्येक शब्दाचा, ओळीचा अर्थ सांगणं असं नाही आम्ही शिकवत, तर हा विषय कोणता आहे, कसा आहे, यात काय सांगितलंय याची आम्ही तुम्हा मुलांना ओळख करून देतो. आता समजा आपण भूगोल शिकतो आहोत, तर भारताच्या नकाशाची तिथल्या हवापाण्याची, पिकांची, लोकांची ढोबळ माहिती आम्ही तुम्हाला देतो पण त्यानंतर त्या नकाशाचा अभ्यास तुम्ही करायचा. आम्ही जे सांगितलं नाही ते तुम्ही शोधून काढायचं. शिक्षकाला खूप प्रश्न विचारायचे. तिथल्या प्राण्यांची, राहणीची, हवामानाची, पीकपाण्याची ओळख करून घ्यायची. एखादी भाषा शिकवताना आम्ही त्याच्या लिपीची ओळख करून देऊ पण त्यानंतर त्याचं व्याकरण तुम्हांला वाचून आपोआप शिकायचं आहे. तुम्ही चार सहा विद्यार्थ्यांनी एकत्र जमून त्या त्या विषयावर चर्चा करायची, अडचणी असतील त्या टीचरला विचारायच्या. अतुल, तुला वाटेल तो टीचर तू निवडू शकतोस. नुसते विषय निवडायचं तुम्हांला स्वातंत्र्य नाही तर त्या विषयातला नेमका कोणता भाग तुम्हाला शिकावा वाटतोय ते तुम्ही टीचरला सांगू शकता. तुला जर बोट बांधावी वाटतेय तर तुला कुणी असं म्हणणार नाही की तू आधी सुतारकामाची परीक्षा दे. तुला बोट चालवायची असेल तर तुला पोहायला शिकवण्यात येईल. वल्ही मारायला शिकवण्यात येईल. आमचा अनुभव असा आहे की आवडीचा विषय मुलं लवकर शिकतात आणि चांगला शिकतात मग तो तांत्रिक भाग का असेना. हे बघ अतुल, प्रत्येक मूल फुलासारखं उमललं पाहिजे हा तर मदरचा खास संदेश आहे. जो विद्यार्थी मागे पडेल, त्याच्यात काही दोष असेल, उणीव असेल, तर शिक्षक त्या मुलाकडे खास लक्ष पुरवतात. त्याच्यावर जास्त मेहनत घेतात. उत्तम शिक्षण देणं हेच ध्येय असतं."

" खूप पगार मिळतो तुम्हांला ? कलकत्त्याला आमचे सर तर कसाबसा तास संपवून घरी पळायचे. जेवण करून घालायला त्यांच्या घरी कुणीच नव्हतं. बायको मरून गेली होती. मुलं लहान होती. "

" नाही, शिक्षकांना पगार नसतो कारण इथे शिक्षकांना स्वतःची अशी काही काळजी नसते. अन्न, वस्त्र, निवारा या सगळ्या जबाबदाऱ्या आश्रमानं उचललेल्या असतात. त्यामुळे मुलांसाठी, शाळेसाठी सगळा वेळ देता येतो. वरच्या वर्गात मुलाला घालण्यापूर्वी ठराविक प्रगती करून घेण्यासाठी धडपड करता येते. "

" बहेनजी, मग पुस्तकं कोणती आणायची ? " अतुलनं विचारलं.

" पुस्तकं शाळेतर्फेच मिळतात. पुस्तकांचा खर्च विद्यार्थ्यांवर पडत नाही. वह्या, पेन्सिली पण अत्यंत नाममात्र किंमतीत देण्यात येतात. शिवाय शाळेची फी नाही. वर्ष संपलं की पुस्तकं शाळेलाच परत करायची असतात. मधल्या सुट्टीत भाज्यांचं सूप मुलांना देतात. व्हिटॅमिन्स आणि उकडलेल्या भाज्या देतात. मुलांची वर्षातून दोनदा वैद्यकीय तपासणी होते. त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येतात. दर शनिवारी मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी खास कार्यक्रम असतो. कोणी संवाद लिहितात. कोणी तो स्टेजवर येऊन म्हणून दाखवतात. नकला, गाणी, नाच वगैरे करमणुकीचे कार्यक्रम होतात. अशा कार्यक्रमांमुळे एखादा भिडस्त मुलगा धीट होतो तर वात्रट, खोडसाळ मुलगा आपोआप निवळतो, शान्त होतो. त्यांच्या खोडकरपणाला कलागुण लाभतो. व्यायाम मात्र करावाच लागतो बरं कां. यात सवलत मिळत नाही. "

" बहेनजी, कॉलेजात केव्हा जायचं ? " अतुलनं विचारलं.

" दहावीनंतर तीन वर्षाचा हायर कोर्स असतो. इतर कॉलेजातील

बी. ए. च्या तोडीचा हा अभ्यासक्रम असतो. पण आमचा अनुभव असा आहे की इथला विद्यार्थी बाहेरच्या विद्यार्थ्यांपेक्षा हुशार असतो. त्याचं ज्ञान सर्वांगीण असतं. कॉलेजचं नाव 'नॉलेज' आहे. कॉलेजमध्ये पण प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे त्याला विषय निवडता येतात. कोणताही विचार, कोणताही आग्रह, नियम मुलांवर लादण्यात येत नाही. ते त्याचं त्यानंच आत्मसात करायचं असतं. उद्योग ही प्रार्थना आहे, सतत काम करत राहणे हीच देवाची पूजा आहे हे माताजींचं वचन पाळण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करतो. दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा ते विचार स्वतःच आचरणात आणा असं त्या नेहमी सांगत असतात."

"बहनजी, माझा मित्र अरविंद, त्याची बहीण मीनाक्षी, त्यांचा धाकटा भाऊ हेमंत सगळे इथेच राहतात. त्यांचे आई वडील तर दिल्लीला आहेत."

"अरे, दिल्लीच काय भारतातल्या सगळ्या भागातून मुलं इथे शिकायला येतात. इथे विद्यार्थ्यांसाठी अनेक वसतिगृहं आहेत. पण वसतिगृह आहेत म्हणजे तिथे शेकडो मुलं आहेत असं नाही बरं का! मोठ्यात मोठं हॉस्टेल वीस बावीस मुलांचं आहे. तिथल्या व्यवस्थापिकेवर त्या मुलांचे खाणे, पिणे, प्रकृती, अभ्यास सगळ्यांची जबाबदारी असते. मुलांची वेगळी आणि मुलींची वेगळी वसतिगृहं आहेत. हॉस्टेलचा खर्च मात्र द्यावा लागतो बरं का. अलीकडे एक नवीन उपक्रम चालू केलाय. शिक्षक आणि विद्यार्थी एकमेकांच्या सान्निध्यात जास्तीत जास्त यावेत म्हणून 'कॉर्नर' हाऊस उघडले आहे. तिथे नॉनव्हेज पण मिळते. दूध, अंडे पण देण्यात येतं. दूध तर प्रत्येकाला देण्यात येतंच. त्यासाठी आश्रमाच्या मालकीची डेअरी आहे. अंड्यांसाठी कोंबड्या पाळलेल्या आहेत. डायनिंग रूमचे उष्टे अन्न कोंबड्यांसाठी वापरण्यात येतं.

" बहेनजी एक विचारू ? " अतुल म्हणाला.

" विचार की. तू मला खूप विचारावंस आणि मी सांगावं या परता दुसरा आनंद नाही."

" दी, माझा समीरदा इथे आला तर तुम्ही त्याला घ्याल इथल्या कॉलेजात ? "

" माँ नं परवानगी दिली तर जरूर घेऊ. "

" पण माँ देणार नाही." अतुल रडव्या आवाजात म्हणाला.

" का ? "

" तो चांगला नाही म्हणे."

" म्हणजे ? "

" तो तुरुंगात आहे. तो नक्षलवादी आहे. "

" अगबाई खरंच ? "

" हो. "

बराच वेळ बाई विचार करत राहिल्या. त्या बोलेनात तेव्हा अतुल परत म्हणाला,

" नाही घेणार समीरदाला या केंद्रात ?"

" मदरला पत्र लिहून तू विचार."

" मदरला पत्र मी लिहू ? "

" हो लिही की. मुलांनी लिहिलेली पत्रं मदरला खूप आवडतात. ती स्वत: त्या पत्रांना उत्तर देते."

" खरंच ? "

" हो."

" पण परवा मी दर्शनाला गेलो तेव्हा माँ शब्दही बोलल्या नाहीत."

" त्या बोलत कुणाशीच नाहीत."

"पण हसल्या खूप छान."

"त्यातच सर्व आलं नाही का ?"

"हो. मग लिहू मी मदरला पत्र."

"लिही की. पण थांब इतक्यात घाई करू नकोस. तुला या शाळेत कसं काय वाटतंय ते पहा, मग लिही."

"बरं."

अतुल घरी परतत असताना त्याच्या डोक्यात नाना विचार थैमान घालत होते.

# ८

" अरे आटप ना अतुल, चल मला आज मुळीच वेळ नाही. उठ बाबा." सुनीता अतुलला पहाटेच उठवत होती.

" जरा झोपू दे की ग. मस्त ऊब आलीय." अतुल गुरफटून म्हणाला.

" छे छे आज झोप येते तरी कशी तुला ? "

" का ? "

" परत तेच तेच विचारू नकोस. कालपासून मी तुला सांगतेय उद्या लवकर ऊठ. उद्या एकवीस फेब्रुवारी आहे. माँ चा वाढदिवस आहे. दर्शन-दिन आहे. "

" ते सगळे लक्षात आहे ग माझ्या. दर्शन-दिन म्हणजे काही दिवाळी नाही की पूजेचा सण नाही." अतुल म्हणाला.

" अरे बाबा, आम्हांला हाच सणाचा दिवस, उत्सवाचा दिवस.

आमची होळी, दिवाळी, पूजा, पोंगल म्हणजे वर्षातून येणारे हे चार दिवस. माँ त्या दिवशी दर्शन देते. चल ऊठ."

सुनीता कामाला लागली. अतुल उठला. दीदीनं आज त्याच्यासाठी नवे कपडे काढून ठेवले होते. माँ साठी भरलेली साडी तिनं छानशा फडक्यात बांधून घेतली. दा सुरेख अशी फुलं घेऊन आले. फुलं सुकून जाऊ नयेत म्हणून त्यांनी फ्लॉवरपॉट मध्ये ती फुलं ठेवली.

"दा, तुम्ही हा फ्लॉवरपॉटच घेऊन चलणार ?"

"हो बेटा. आटपलं कां तुझं ? उशीरच झाला आपल्याला. दर्शनाच्या दिवशी आश्रमाचं दार दहालाच बंद होतं."

"दी, आज शाळेला सुट्टी का ?"

"मुळीच नाही. आज लहान मुलं शाळेत जमतात. तिथे सामुदायिक ध्यानधारणा होते."

"इतक्या लवकर आश्रम उघडला असेल ?"

"कमालच करतोस तू ! अरे आश्रम तर रोज पहाटे पाच वाजताच उघडतो. रात्री अकरा वाजता ते दार लावण्यात येतं. आज खूप गर्दी होणार. नेहेमीच होते म्हणा." दी म्हणाली.

"बाहेर गावची लोक आली आहेत का ?" अतुलनं विचारलं.

"अरे, थोडी थोडकी नाहीत. दर्शन दिनी हजारोनं लोक येतात. परदेशची लोक सुद्धा येतात या वेळी. मद्रासहून तर टॅक्सी, गाड्यांची रीघ लागलेली असते."

"आज फार मोठ्या आनंदाचा दिवस आहे." दा म्हणाले.

"हो, काल शाळेत सुद्धा दर्शनाचा विषय ज्याच्या त्याच्या तोंडी होता. मला कळेनाच एवढा कसला आनंद झालाय या लोकांना." अतुल म्हणाला.

"बरोबर आहे. आज तू प्रत्यक्ष तो सोहळा पहा. माँचं दर्शन

घे, सामुदायिक साधनेत भाग घे. म्हणजे तुला कळेल हा आनंद कसला आहे ते." दी म्हणाली.

"आणखी कधी माँ दर्शन देतात?" अतुलनं विचारलं.

"पूर्वी वर्षातून चार वेळा माँ दर्शन देत. पण आता तीनदा देतात. एकवीस फेब्रुवारी हा माँ चा जन्म दिवस, पंधरा ऑगस्ट श्री. अरविंदांचा जन्म दिन आणि चोवीस नोव्हेंबर हा अरविंदांचा सिद्धि दिन अशा तिन्ही दिवशी दर्शन-दिवस मोठ्या उत्साहानं साजरा होतो." दा सांगत होते.

"दा, तुम्ही आता याच्या नादी लागू नका. हा प्रश्न विचारायला दमायचा नाही आणि तुम्ही उत्तरं देताना थकणार नाहीत. चला बरं. दहा वाजतां दार बंद होईल आश्रमाचं."

अतुलच्या ओठांवर प्रश्न आलाच होता पण सुनीतादीनं दाराला कडी कुलूप घातलं. तिघं घराबाहेर पडले. रस्त्यानं साधकांची गर्दी होती. बहुतेकांनी पांढरे कपडे घातले होते. प्रत्येकाच्या हातात हार, फुलं होतीच. मोठ्या भाविकतेनं एकमेकांशी फारसं न बोलता जो तो आश्रमाकडे निघाला होता. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर आनंद होता, उत्साह होता. खरोखरीच उत्सवाचं वारं वातावरणात भरून राहिलं होतं. अतुल चकित होऊन भोवताली पहात होता. लहान मुलं मुली सुद्धा आज नेहमीचा दंगा, खोड्या, गडबड करायची विसरून आपल्या हातातली फुलं सांभाळीत कोरे कपडे घालून निघाली होती. रस्त्यातून खूप नवे चेहरे दिसत होते. बायका, पोरं, म्हातारी माणसं, देशी, परदेशी सगळेजण आश्रमाकडे निघाले होते. त्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता होती, कुतुहल होतं. अतुल पण भोवतालच्या वातावरणामुळे प्रभावित झाला. आश्रमात जायला उत्सुक झाला.

आश्रमाच्या दाराशी दोघं तिथं उभे होते. गर्दीला आवरत होते.

धक्का बुक्की होऊ नये म्हणून काळजी घेत होते. अतुल आपल्या दी आणि अनिलदां बरोबर आश्रमात गेला. बापरे ! किती माणसं जमली होती. पण अजिबात आवाज, गडवड, गोंधळ नव्हता. कुणी कुणाशी बोलत नव्हतं. प्रत्येकजण येई, समाधीपाशी डोळे मिटून, हात जोडून उभा राही आणि पटांगणात मांडी घालून बसून डोळे मिटून घेई. म्हणूनच की काय खूप माणसं असूनही प्रत्येकजण एकेकटाच होता. अतुल समाधीपाशी गेला. उदबत्त्यांचा गंध दरवळला होता. एका थाळीत तुळशीचो पानं पाण्यात घालून ठेवलेली होती. समाधीवर अत्यंत सुंदर असा फुलांचा गालिचा पसरला होता. शिवाय भोवताली संगमरवरी फुलदाण्यांत फुलं होती. समाधीवर डोकावलेलं भलं मोठं झाड दाट सावली धरून होतं. दीदी आणि दा समाधीपाशी गुडघे टेकून बसले. हात पसरून माथा नमवला. अतुलनं पण आपलं डोकं समाधीवर टेकलं. नेहमीच त्याला या जागी खूप बरं वाटत होतं. आजही त्याचं मन भारावून गेलं. त्याच्या नकळत तो दीदीसारखा गंभीर झाला. या आनंदाच्या, उत्सवाच्या क्षणी जे गांभीर्य, जी शांती प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होती तिचा अनुभव अतुलला आला. सण, उत्सव म्हणजे दंगा, गडबड, गप्पा, हसणं, खिदळणं, खाणं हा विचारच इथे नव्हता. देवळात देवाच्या दर्शनाला निघाल्यासारखा प्रत्येकजण भावमग्न झाला होता.

सकाळचे दहा वाजायला आले. आश्रमाचं दार बंद झालं. शेकडो माणसं पटांगणात शान्तपणे डोळे मिटून बसून होती. बरोबर दहा वाजता एक टोल पडला. सगळीकडे अगदी शान्त शान्त झालं. प्रत्येक जण भक्तिभावात बुडून गेला. इतरांचं पाहून अतुलनं पण मांडी घातली, मान ताठ करून, पाठीचा कणा जरासुद्धा न वाकवता डोळे मिटून घेतले. त्याला वाटलं हा टोल पडल्यानंतर इथे भजन, कीर्तन,

प्रार्थना, आरती काही तरी सुरू होईल. पण छे काहीच नाही. साडे-दहा वाजता परत टोल पडला. म्हणजे अर्धा तास प्रत्येकजण ध्यान धारणा करत होता. आश्चर्य म्हणजे आपण पण अर्धा तास गप्प बसून राहिलो, अगदी डोळे मिटून बसून राहिलो. आपल्या मिटल्या डोळ्यांसमोर आपलं घर, आपली शाळा, मित्र, आपली आई, आपली दीदी दिसत होती. पण एक मात्र खरं, काहीतरी निराळं, काहीतरी चांगलं असं आपल्याला वाटलं. मनात काही विचारच नाहीत, कसला बोजा नाही. हलकं हलकं वाटलं. या जागेबद्दल आपलेपणा वाटू लागलाय, आपण आपल्या घरापासून, आपल्या माणसांपासून खूप दूर आलोय ही आपली रुखरुख खूपच कमी झालीय. आपलं मन रमलंय इथे. दीदी म्हणाली होतीच, काही दिवस रहा तर खरं, मग आपोआप रुळशील. अरे, इथली मुलं तर परत आपल्या गावी जायला तयार होत नाहीत. खरंय, अलीकडे आपल्याला घरची आठवण तितक्या तीव्रतेनं होत नाही.

आश्रमाचं दार उघडलं. मुलं आश्रमाबाहेर जायला पळाली. अतुल त्यांचा आनंद डोळे भरून पहात होता.

"चल अतुल..." दी हळूच म्हणाली.

"कुठं ?"

"या रांगेत पठ्कन उभा रहा. मग चौकशा कर."

अंगणातच भली मोठी रांग तयार झाली होती. दीदी त्याला तिकडे घेऊन गेली.

"कशासाठी ही रांग आहे ग दी ?" अतुलला रहावलं नाही.

"श्री अरविंदांची खोली पाहण्यासाठीं ही रांग आहे. इथंच ते शेवटपर्यन्त होते. एकोणीसशे सव्वीस साली त्यांनी स्वेच्छेनं एकान्तवास पत्करला. तोच दिवस सिद्धिदिन म्हणून मानला जातो.

पाच डिसेंबर एकोणीसशे पन्नास साली श्री अरविंदांनी देहत्याग केला त्या दिवसापर्यन्त ते त्याच दोन खोल्यात होते."

"काय सांगतेस दीदी? म्हणजे जवळ जवळ चोवीस वर्षं अरविंदांनी या खोलीबाहेर पाऊल टाकलं नाही?"

"नाही. अरे चाळीस वर्षात ते पाँडेचरीच्या बाहेर गेले नाहीत. माँ एकदा इथे आल्या त्या आजपर्यन्त पाँडी सोडून गेल्या नाहीत, हे सांगितलं नाही कां मी तुला?"

"खूप मोठी रांग आहे नाही ग दी?"

"हो. दर दर्शन-दिनी अशीच रांग असते. लोक तासन्तास उभे राहतात."

"तू तर अरविंदांची खोली पाहिली असशील. मग का उभी आहेस?"

"पुष्कळदा पाहिली आहे मी त्यांची खोली, पण प्रत्येक वेळा निराळा अनुभव येतो. अपूर्व अशी शांती मिळते. त्या खोलीत अजून अरविंद आहेत असं वाटतं. तिथं गेलं की कधी तरी प्रत्यक्ष दिसतील, आशीर्वाद देतील असं वाटतं."

"खरं?"

"हो त्यांच्या खोलीत एक विलक्षण जिवंतपणा वाटतो."

"ते गेले तेव्हा जशी खोली होती तशीच ठेवलीय अजून?"

"हो. आता तू प्रत्यक्षच पहा न सगळं."

बराच वेळ रांगेत उभं राहिल्यावर दोघं अरविंदांच्या खोलीत आले. तिथलं गांभीर्य, सौंदर्य, टापटीप सुगंध या सगळ्यांमुळे अतुल परत भारावून गेला. तो उत्सुकतेनं पाहू लागला. दैवी वातावरण होतं त्या खोलीत.

त्या खोलीत जणू अजून अरविंद रहात होते. आत्ताच उठून बाहेर

गेलेत, इतका जिवंतपणा त्या खोलीत होता. त्यांचं अंथरूण, ते वापरत असलेला कोच, टेबल, पुस्तकं तिथेच, तशीच होती. कॅलेन्डरवर तीच तारीख, समाधि दिनाची ५-१२-१९५० घडयाळ पण त्याच क्षणावर थांबलं होतं, ज्या क्षणी अरविंदांनी डोळे मिटले तोच क्षण हा. दुपारचे एक वाजून सव्वीस मिनिटं.

शेजारच्या लहान खोलीत सोफ्यावर वाघाचं कातडं होतं. अरविंदांचं तैलचित्र त्यावर विसावलं होतं. शेजारीच माँ ची उंच पाठीची खुर्ची होती. फार मोठी खोली नव्हती ती. अरविंदांच्या अंथरुणावर वाघाचं कातडं होतं. अरविंद आणि माँ ज्या कोचावर बसून दर्शन देत तो पण तिथेच तसाच होता. एका साधकानं एका शिंपल्यावर अरविंदांची आकृति कोरली आहे ती पण तिथं होती. "अतुल, अरविंदांचा हा ब्राँझचा पुतळा एका युरोपियन बाईनं तयार केलाय." दी म्हणाली.

"अगदी साधी खोली आहे ग ही."

"हो साधेपणा हा तर थोरामोठ्यांचा गुण असतो. बघ ना या एवढ्याशा खोलीत बसून अरविंदांनी केवढाले ग्रंथ लिहिले."

"माँ कधी दर्शन देणार? आपण जायचं त्यांना भेटायला?" अतुलनं विचारलं.

"नाही. आज माँ सामुदायिक दर्शन देणार आहेत. संध्याकाळी त्या गच्चीत येतील. पांच मिनिटं उभ्या राहतील. खाली रस्त्यावर हजारो लोक त्यांचं दर्शन घेतील. आता चल आपण जेवायला जाऊ या."

आज जेवणाचा निराळाच बेत होता. माँचा प्रसाद म्हणून खोबऱ्याची बर्फी देण्यात आली. आश्रमात प्रत्येकाला माँचा प्रसाद म्हणून एक एक रुमाल देण्यात आला होता.

संध्याकाळी अतुलनं रस्त्यावर उभं राहून शेकडो लोकांच्या

बरोबर माँच दर्शन घेतलं. माँ हळूहळू गच्चीवर आल्या, कठड्याला धरून उभ्या राहिल्या. आपले हात जोडून त्यांनी सर्वांना नमस्कार केला. त्यांच्या ओठांवर तसंच ते प्रेमळ हसू होतं. सगळेजण मंत्रमुग्ध झाले होते. माना वर करून हात जोडून माताजींना नमस्कार करत होते. पाच एक मिनिटांनी माँ निघून गेल्या पण लोक शुद्ध हरपल्या-सारखे काही क्षण तसेच उभे होते.

त्यानंतर सगळे क्रीडांगणावर जमले. तिथे खेळाडूंनी मार्चपास्ट केलं. त्यावेळी बॅण्ड वाजत होता. मग वंदेमातरम् म्हणण्यात आलं. माँ आणि अरविंदांच्या कांही स्लाईडस् दाखविण्यात आल्या. परत एकदा लोक ध्यानासाठी शान्तपणे बसले.

दिवस कलला. अंथरूणावर पडल्या पडल्या अतुल दिवसभराचा अनुभव परत परत आठवत होता. त्याच्या डोळ्यापुढून अरविंदांची खोली जात नव्हती. झोप लागली तरी चोवीस वर्षं एका खोलीत एखादा माणूस कसा राहू शकतो हा विचार त्याच्या मनात घोळतच राहिला.

# १

"ही सुंदर सुमने गंधाने भरलेली
की मुनीमनातील प्रसन्नता फुललेली..."

अनिलदा खोलीच्या दाराशीच उभे राहिले. आत जावं वाटलं नाही. सुनीता गात होती, आपण गेलो की तिचं गाणं थांबेल. दा दाराशीच थबकले. ही सुनीता, मोठाल्या डोळ्यांची, चिटुकल्या नाकाची आणि मिटुकल्या ओठांची ही मुलगी... कितीतरी गोष्टी दां ना आठवल्या. एके दिवशी माँ म्हणाल्या, "या मुलीला तुमच्याजवळ ठेवणार आहे. तिला सांभाळा." माँची आज्ञा ती. आपण त्या पाच सहा वर्षांच्या सुरेख मुलीला घेऊन आलो. जिवापाड सांभाळू लागलो. तिच्यामुळे आपला दिवस कसा आनंदात जात असे. सुनीतामुळे आपलं एकलेपण संपून गेलं. आपण बाप झालो. ती आपली मुलगी झाली. एक अनाथ, गरीब बाई आपलं बाळ माँ च्या पायांवर टाकून गेली. माँ नं तिला सांभाळलं. आपलं एकलेपण दूर व्हावं

20033 वा.पा. क्रमांक ... नोंद दि. ...

म्हणून की काय तिची जबाबदारी आपल्यावर टाकली. फार गुणी, फार समंजस आहे मुलगी. अतुलला पण किती माया लावली आहे. ती होती म्हणून ते पोरगं इथे राहिलं. आपली जबाबदारी सुनीतामुळे सोपी झाली.

तोच सुनीताच्या सुरेल आवाजात एक कोवळा आवाज मिसळला. अरेच्चा अतुल गातोय काय ! इतका गोड आवाज आहे याचा ? आपल्याला माहीत नव्हतं. याच्या टीचरला सांगितलं पाहिजे. दानी उत्सुकतेनं खोलीत पाऊल टाकलं. सुनीता आणि अतुल तर होतेच पण आणखीही काही मुलं तिथं जमली होती.

"दा आले, दा आले." एकदम सगळीजण म्हणाली.

"चालू दे चालू दे, छान चाललं होतं गाणं तुमचं. अतुल, तू इतका छान गातोस माहित नव्हतं मला."

दांनी कौतुकानं अतुलला जवळ घेतलं. त्याला शाबासकी दिली.

"अरे, पण आज ही वानरसेना इथं कशी जमलीय ?"

"हे हो काय दा, आम्हांला तुम्ही वानर सेना का म्हणता ?" अतुलचा दोस्त संजय म्हणाला.

"अरे, वानरसेना म्हणजे वाईट नाही की. आम्ही तुमच्याएवढे होतो ना तेव्हा खरोखरीच वानरासारखं इथून तिथे, तिथून इथे भटकत होतो. कलकत्त्याला कुणीही येवो, कुणाचं भाषण असो आमचं टोळकं त्याच्या मागोमाग असायचंच." दा म्हणाले.

"दा, तुम्ही अगदी वेळेवर आलात. ही सगळी मुलं माझ्या-मागे लागली होती गोष्ट सांग म्हणून. मला तर एकही गोष्ट



म. ... वा. क्र. ९४९८८ दि. ३०।३।८४

आठवेना. तेव्हा मी चक्क गाणं म्हणू लागले. आता तुम्हीच सांगा ना काहीतरी गंमत. तुमच्याजवळ खूप आहे सांगण्यासारखं."

"हो हो दा, तुम्हीच सांगा." अतुल म्हणाला.

"दा आणखी अट आहे बर का या मुलांची की त्यांना राजा-राणीची गोष्ट नकोय, त्यांना डिटेक्टिव्ह गोष्ट हवीय" सुनीता म्हणाली.

"नाही नाही तसं काही आपल्याला येत नाही. आपण तसं कधी वाचलं पण नाही." दा म्हणाले.

"तुम्ही इथे कसे आलात आमच्याहून लहान असताना ? तेच सांगा." अतुल म्हणाला.

"हो हो दादा, तेच सांगा." सगळ्यांनी गिल्ला केला.

"बरं सांगतो ऐका. पण सुनीता बेटी, तू एक काम कर बरं. द्विजाताला जरा बरं नाहीये. तू आज किचनमध्ये जा आणि मदत कर विमलाबहेनला." दा म्हणाले.

"जाते. विमलादीदीला विचारून आज अतुलच्या आवडीचे कटलेट करते." सुनीता म्हणाली.

"कसले कटलेट दीदी ?" अतुलनं विचारलं.

"भाज्यांचे ..आवडतात ना... ?"

"हो" ...अतुल खूष झाला.

"हं ऐकतोस ना अतुल." दा म्हणाले.

"हो हो सांगा." अतुल म्हणाला.

"अरविंद इंग्लंडहून आले. त्यानंतर ते बडोद्याला जवळ जवळ चौदा वर्षं होते. तिथं त्यांनी कॉलेजात इंग्रजी, फ्रेंच शिकवलं. एका

कॉलेजचे ते प्रिन्सिपॉल होते. पण बडोद्यात असताना ते देशप्रेमानं भारावून जाऊन इंदुप्रकाशमध्ये लेख लिहीत होते. तरुणांची मनं तयार करत होते. ब्रिटिश राज्याची दडपशाही, त्यांचा स्वार्थ त्यांनी केलेला अन्याय यावर कडाडून हल्ला चढवत होते. वारीन्द्र हा त्यांचा धाकटा भाऊ. हा भयंकर चळवळचा होता. ब्रिटिश सत्तेला उलथून टाकण्यासाठी कुठलंही दिव्य करायची याची तयारी होती. यानं अरविंदांच्या सल्ल्यानं कलकत्ता येथे त्यांच्याच घरात बॉम्ब तयार करण्याचा छोटासा कारखाना काढला होता. तो आणि त्याचे साथीदार नेमबाजीत चांगले वाकबगार होते. जंगलात जाऊन ते नेमबाजीचा सराव करत."

"दा, तुम्ही इथे कसे आलात ते सांगणार होता ना? दीदी म्हणत होती ऐकण्यासारखी गोष्ट आहे ती." अतुल म्हणाला.

"थांब रे, ही गोष्ट पण छान आहे." अतुलचा मित्र अमिताभ म्हणाला.

"सांगा हो दादा." किशोरी म्हणाली.

"सांगतो सांगतो. बरं का अतुल, त्यापूर्वीचा इतिहास तुम्हाला सांगितला नाही तर आमच्या इकडच्या यात्रेची खरी गंमत कळणार नाही. मी किती वेडा होतो पण किती भाग्यवान होतो हे पण तुम्हाला समजायचं नाही. बरं का, १९०५ साली जेव्हा बंगालची फाळणी झाली तेव्हा अरविंदांना बडोद्यात स्वस्थ बसवेना. आता इथे न थांबता आपण प्रत्यक्ष रणांगणात उतरलं पाहिजे असं त्यांच्या मनानं घेतलं. पडद्याआड राहून त्यांनी तरुणांची मनं चेतवली होती. आता त्यांच्यात जाऊन काम करायला हवं होतं. देशप्रेमानं प्रेरित झालेल्या तरुणांच्या खांद्याला खांदा लावून लढा द्यायला हवा होता. कारण बंगालची

फाळणी म्हणजे इंग्रजांच्या दुष्टपणाचा कळस होता. याची कटु फळं पुढच्या अनेक पिढ्यांना भोगावी लागतील हे अरविंदांना कळलं होतं. त्यांनी आपली साडेसातशे रुपयांची नोकरी सोडली आणि ते कलकत्त्याला दीडशे रुपयांवर एका कॉलेजात शिकवू लागले. राष्ट्रीय विद्यालयात प्राचार्य म्हणून ते कलकत्त्यात दाखल झाले."

"इकडे बारीन्द्र बंगालच्या खेड्यापाड्यात जात होता. तरुणांचं संघटन करत होता. गुप्त बैठकी घेत होता. क्रांतिकारकांच्या कथा सांगत होता. विवेकानंदांची भाषणं वाचून दाखवत होता. ही चळवळ देशव्यापी व्हायला हवी होती. अरविंदांनी लोकमान्य टिळक, लालालजपत राय, बिपिनचंद्र पाल, यांची भेट घेतली."

"म्हणजे लाल, बाल, पाल म्हणतात तेच ना?" अतुलनं विचारलं.

"हो राजा, तेच ते. लाला लजपतराय, लोकमान्य टिळक आणि बिपिनचंद्र पाल यांनी पंजाब, महाराष्ट्र आणि बंगालमध्ये स्वातंत्र्या-साठी मोठा यज्ञ मांडला होता. ही माणसं हिमालयासारखी भव्य, दिव्य होती. मुलांनो, त्यांना नुसतं पाहिलं, त्यांचा खणखणीत आवाज ऐकला, त्यांनी लिहिलेल्या ओळी वाचल्या की त्यावेळचे तरुण भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात तळहातावर शिर घेऊन उडी टाकत. त्या काळात देशाला फार मोठं, अपूर्व असं पुढारीपण लाभलं होतं. आम्ही पोरं-सोरं आपल्या नेत्यांना पाहण्यासाठी मैल मैल उन्हा-तान्हात भटकत होतो.

उभा देश स्वातंत्र्यभावनेनं पेटला होता. कुठलाही त्याग करायला सवसामान्य माणूस तयार झाला होता. इंग्रज सरकारनं हे सगळं पाहून दडपशाहीचा मार्ग स्वीकारला होता. राजद्रोहाच्या नावाखाली

जबर शिक्षा ठोठावण्यात येत होती. तरुण, चळवळी मुलं पकडून त्यांना डांबण्यात येत होतं. बडे बडे पुढारी गजाआड बंद करण्याचं धोरण अवलंबिलं होतं. यामुळे तरुण रक्त तापलं, अन्यायामुळे त्यांची डोकी भडकली. तरुणांनी आपला राग दाखवण्यासाठी इंग्रजांवर बाँब टाकले, मिरवणुकी काढल्या, चळवळी केल्या. काही तरुणांनी किंग्जफोर्ड या न्यायाधीशाला मारण्याचं ठरवलं. त्यांच्या गाडीवर बाँब टाकण्याचा कट रचण्यात आला. पण चुकून बाँब दुसऱ्याच गाडीवर पडला आणि त्यात दोन स्त्रिया मरण पावल्या."

"पण त्या न्यायाधीशानं त्या तरुणांचं काय केलं होतं, दा ?" अतुलनं विचारलं.

"सांगतो. अरे एका कोवळ्या मुलानं वंदेमातरम्‌चा उच्चार उघडच्यावर केला म्हणून त्याला या न्यायाधीशाच्या आज्ञेनं उघडच्यावर चाबकानं फोडण्यात आलं होतं. ते कोवळं पोर किंकाळ्या मारत होतं, सगळी जमीन त्याच्या रक्तानं माखली होती."

बोलता बोलता दा गप्प बसले. ऐकणारी मुलं अस्वस्थ झाली. संतापानं त्यांना रडू फुटत होतं. चीड त्यांच्या मनात मावत नव्हती. नकळत त्यांच्या मुठी आवळल्या गेल्या. कपाळावरची शीर फुगली.

"पाहिलंत ? नुसतं ऐकून तुमच्या अंगाची आग झाली. मग ज्यानं प्रत्यक्ष हा अत्याचार पाहिला असेल त्यांना किती संताप आला असेल ? याचा विचार करा. इतकंच नाही तर देशभक्त ब्रह्मबांधव उपाध्याय हे 'देशभक्त' चे संपादक होते त्यांच्यावर खटला भरून किंग्सफोर्डनं त्यांना दवाखान्यात तडफडत सडत मरायला लावलं होतं. त्यांचा छळ करण्यात आला होता पण त्यांच्यावर औषधी उपचार करू दिले

नव्हते. या दोन्ही गोष्टींमुळे तरुणांना संताप येणं साहजिकच होतं. पण दुर्दैवानं तो दुष्ट न्यायाधीश मेला नाही. धरपकड झाली आणि खुदीराम बोस या तरुणाला पकडून या गुन्ह्याबद्दल फाशी देण्यात आलं. "

" खुदीराम बोस ... ? " सगळी मुलं नकळत म्हणाली.

" हो तोच. केवळ अठरा वर्षांचा कोवळा तरुण होता तो. "

" फाशी का दिलं हो दा ? " अतुल रडवेला झाला होता.

" अरे, असे कित्येक तरुण फासावर चढले होते. त्या दुष्टांना दया-माया नव्हतीच मुळी. "

" याच बाँब-प्रकरणात अरविंदांना पण पकडण्यात आलं. अलिपूर जेलमध्ये त्यांची रवानगी झाली. इकडे टिळकांवर खटला भरून त्यांना सहा वर्षांचा कारावास सुनवण्यात आला. मंडालेच्या तुरुंगात लोकमान्य डांबले गेले. "

" या दोघांनी काय केलं होतं ? "

" अरे करायला काय पाहिजे ? त्यांनी काहीच केलं नव्हतं पण या दोघांच्या इशाऱ्यावर उभा देश चळवळ करायला सिद्ध झालाय हे इंग्रजांना दिसत होतं. त्यांना एकदा डांबून टाकलं की चळवळीतलं वारंच जाईल असं त्यांना वाटलं होतं. या बाँब प्रकरणाशी अरविंदांचा तसा कांहीच संबंध नव्हता पण त्यांचा धाकटा भाऊ बारीन्द्र यानं बाँबचा छोटा कारखाना चालवला होता. तिथे त्याला आणि त्याच्या साथीदारांना पकडण्यात आलं होतं. सगळीकडे धरपकड आणि अटकेचं सत्र सुरू झालं होतं. बारीन्द्र आणि उल्लासकर दत्त यांना फाशीची शिक्षा झाली. त्यांचे इतर साथीदारांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. "

"बारीन्द्राला फाशी दिलं ?" अमिताभनं विचारलं.

"नाही. त्यांनी हायकोर्टाकडे अर्ज केल्यावर त्या दोघांना पण काळ्या पाण्याची शिक्षा झाली."

"लोकमान्य टिळकांनी काय केलं होतं ?" अतुलनं विचारलं.

"काहीच नाही. केसरीमध्ये 'बॉम्बचे रहस्य' हा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी विचार मांडला होता की सरकार जितका जास्त अन्याय, अत्याचार करील तितका जास्त हिंसेचा मार्ग जनता पत्करील. झालं ! सरकारला एवढं पुरेसं होतं. राजद्रोहाचा त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांना मंडालेला डांबून टाकण्यात आलं."

दा बोलण्यांत रंगून गेले होते, मुलं पण भान विसरून ऐकत होती. खोलीत अंधार भरून आला. दा उठले त्यांनी दिवा लावला. अरविंदांच्या आणि माँ च्या फोटोपुढे उदबत्ती लावली आणि ताजी फुलं त्यावर वाहिली. नमस्कार केला. मुलांनी पण आपले हात जोडले.

"बरं कां रे मुलांनो, खटला चालू होता तेव्हा अरविंद वर्षभर तुरुंगात होते. शेवटी त्यांची निर्दोष म्हणून सुटका झाली. सरकारला त्यांच्यावर आरोप सिद्ध करता आला नाही. कारण तसा पुरावा नव्हताच काही. थोर देशभक्त चित्तरंजन दास यांनी अरविंदांचं वकीलपत्र घेतलं होतं. त्यांचं भाषण मोठं ओजस्वी होतं. त्यात त्यांनी नकळत अरविंदांबद्दल भविष्य कथन केलं. ते म्हणाले होते,

'माझं निवेदन आपण ऐकून ठेवा. भविष्यात या महापुरुषाकडे सगळेजण राष्ट्रीयतेचा क्रांतदर्शी मंत्रद्रष्टा म्हणून पाहतील. अखिल मानवतेवर प्रेम करणारा म्हणून याला ओळखतील. केवळ भारतातच नव्हे तर साता समुद्रापलीकडे या महापुरुषाचं नाव गाजत राहील.

याच्या महाप्रयाणानंतरही याच्या अमृतवाणीचा प्रतिध्वनी उमटत राहील.' आणि खरंच आज आपण पाहतो आहोतच, त्यांच्या विचारांचा प्रसार जगभर झालाय. एक महायोगी, एक द्रष्टा म्हणून लोक त्यांना ओळखताहेत."

जरा वेळ दा गप्प बसले. पाणी प्यायले आणि उठून आपल्या पुस्तकांच्या कपाटाजवळ गेले. त्यातून त्यांनी एक पुस्तक काढलं. त्यातलं हवं ते पान काढत हसत हसत म्हणाले, "मुलांनो, आता मी तुम्हांला एक गंमत वाचून दाखवणार आहे."

"गंमत? वाचा वाचा ..." मुलं म्हणाली.

"अरविंद वर्षभर तुरुंगात होते. तिथून सुटून आल्यावर 'कारा कहाणी' म्हणून एक लहानशी पुस्तिका त्यांनी लिहिली. त्यात त्यांनी आपले तुरुंगातील अनुभव लिहिलेत. फारच सुंदर, फारच आकर्षक पद्धतीनं त्यांनी आपले अनुभव मांडलेत. त्यांनी आपल्या अडचणी, जेवण्याखाण्याचे, राहण्याचे जे हाल झाले ना त्याबद्दल खूप विनोदी पद्धतीनं मजेशीर असं लेखन केलंय. थांबा हं, तुम्हांला त्यांचं ते सुंदर लिखाण वाचूनच दाखवतो."

दा वाचू लागले. मुलं मन लावून ऐकू लागली.

माझी खोली होती नऊ फूट लांब आणि पाच फूट रुंद. एकही खिडकी त्या बिचाऱ्या खोलीला नव्हती. समोर लोखंडाचे गज होते. असा एक छानसा पिंजरा होता तो. रहायला तर अशी छानशी जागा होतीच, पण आमच्या दयाळू सरकारचं आतिथ्यही काही कमी नव्हतं. आमची धनदौलत म्हणजे एक थाळी आणि एक कटोरा. पण त्यामुळे समोरचं अंगण कसं शोभिवंत होऊन जाई. ती थाळी जेव्हा स्वच्छ करून ठेवली जाई तेव्हा त्यावरची चमक आणि

स्वच्छता पाहून मी तर खूष होऊन जात असे. पण पंचाईत अशी होती की मी त्या थाळीला स्पर्श करताच ती अरबस्थानातील फकीराप्रमाणे नानातऱ्हेचा नाच करू लागे पण करणार काय ! एका हातानं तिला पकडायचे आणि दुसऱ्या हातानं जेवायचे. असं नाही केलं तर ती थाळी नाचत, उड्या मारत मूठभर जेवण मिळायचं ते पण घेऊन पळून जायची. थाळीपेक्षाही कटोरा मला खूप आवडायचा. त्याचा उपयोग पण नानाप्रकारे होत असे. तो कटोरा ब्रिटिश नागरिकाप्रमाणे कोणतेही काम करण्यात हुशार होता. सांगायचा अवकाश की तो क्षणात न्यायाधीश, कलेक्टर, पोलीस अधिकारी, शिक्षक, धर्मोपदेशक, म्युनिसिपालटीचा प्रमुख, कोणतीही भूमिका कुशलतेनं पार पाडीत असे. ज्याप्रमाणे हे महाशय एकाच वेळेला खटला भरणारा, न्यायाधीश, वादी, सलाहकार, आणि प्रीती-भोजनाचे निमंत्रक बनत, त्याप्रमाणे माझा प्रिय कटोरा पण बहुरंगी, बहुढंगी होता. जेलमध्ये आल्यावर मी त्याच कटोऱ्यात पाणी घेऊन हातपाय धुतले होते. अशी अमूल्य वस्तू ब्रिटिश राज्यातच मिळू शकते. इतरत्र नाही मिळणार. त्यानंच पाणी प्यायचं, त्यातच कांजी मिळायची, कालवण मिळायचं. हातपाय धुवायचे, शौचासाठी पण तोच कटोरा वापरायचा. अशाप्रकारे माझ्या सगळ्या सांसारिक गरजा तो कटोरा भागवत होताच, पण माझ्या साधनेत पण या कटोऱ्याचा उपयोग व्हायचा. सगळी आसक्ती, माया, मोह सोडण्यासाठी या कटोऱ्याहून चांगला उपदेशक, सहायक कोण मिळणार होता ? एकान्तवासानंतर सगळ्या कैद्यांना जेव्हा एकत्र ठेवण्यात आलं तेव्हा मात्र या बिचाऱ्या कटोऱ्याची सत्ता कमी झाली. शौचासाठी निराळं भांडं ठेवण्यात आलं. बिच्चारा कटोरा !

दा वाचता वाचता थांबले. दांनी पाहिलं, ती मुलं हंसत नव्हती तर उलट गंभीर झाली होती.

" का रे गप्प झालात ? " त्यांनी विचारलं.

" इतका त्रास देतात तुरुंगात ? "

" अरे, हा तर काहीच नाही. ब्रिटिशांनी हाल हाल केले आपल्या लोकांचे. पण ही मोठी माणसं पहा कशी शान्तपणे संकटाला, अडचणींना, त्रासाला तोंड देतात ते. "

" अरविंदांनी आपल्या जेवणाबद्दल पण खूप मिस्किलपणे लिहिलंय. ऐका आणि बघा कांही शिकता आलं तर. "

आमचं जेवण म्हणजे जाड तांदुळाचा भात. त्यात माती, खडे, केस, अळ्या असा नाना तऱ्हेचा मसाला घातलेला असे. वरण म्हणजे पाणी. भाजी म्हणजे उकडलेलं गवत, पानं, केरकचरा. भाजी असायची कोळशासारखी काळीभोर, जळलेली. ती पाहून मी तर थक्क होऊन जाई. असं अन्न माणसाला खायला देतात याचा मला मोठा चमत्कार वाटायचा. एखादा घास खाऊन मी मोठ्या भक्तीनं अन्नाला नमस्कार करून थाळी दूर सारीत असे. महिनेन् महिने तेच जेवण. सगळं कसं नित्य, सनातन, अनादी, अनंत, अद्वितीय असायचं.

सेजदांनी लापशीचं वर्णन तर पहा कसं बहारदार केलंय.

लापशी माझ्या दाराशी हजर होई पण काही दिवस तिचा माझा डोळ्यांनीच परिचय झाला. तिला मी चाखली नाही. काही दिवसानंतर त्या दिव्य चवीचा मी अनुभव घेतला. या लापशीच्या तीन अवस्था होत्या. पहिल्या दिवशी लापशी म्हणजे शुद्ध शिवमूर्ती होती, दुसऱ्या दिवशी त्या लापशीचं हिरण्यगर्भ रूप दिसायचं

म्हणजे डाळीत मिसळलेली, खिचडीच्या सुंदर नावाने सुशोभित अशी पीतवर्ण. नाना धर्मांपासून तयार केलेली दिसायची. तिसऱ्या दिवशी लापशीचं स्वरूप विराट होई. अल्पगूळमिश्रित, धूसरवर्ण, अल्पप्रमाणातच मानवाच्या आहाराला योग्य अशी.

दां नी पुस्तक मिटलं. मुलं मुकाटयानं उठली. आपआपल्या घरी गेली.

त्या दिवशी सुनीता दीनं मुद्दाम तयार केलेले कटलेट अतुलला खावे वाटले नाहीत. त्याच्या डोळयासमोर अरविंदांची ती थाळी फिरत होती.

# १०

"दी आज अशी मजा आली अशी मजा आली की विचारू नको." अतुल शाळेतून आला तो, आनंदानं नाचतच.

"अरे पण असं झालं तरी काय ? मला सांग तरी."

"अग आज आम्ही शाळेत नव्हतोच मुळी..."

"अगबाई, मग ?"

"आम्ही किनई शेतावर गेलो होतो."

"अय्या, हो ? पण शेतावर का ?"

"काही मजुरांनी संप केलाय म्हणे, कामावर येणार नाहीत. मग काय ? आम्हांला विचारलं, येणार का शेतात काम करायला ? आम्ही सगळेजण गेलो, खूप मजा आली."

"वा छान. काय केलं तिथं तुम्ही ?"

"खूप मजा केली."

" मजाच, की काम पण केलं ? "

" केलं तर ! कुणी भाताच्या शेतात,कुणी भुईमुगाच्या शेतात काम केलं. पेरणी, लावणी, खुरपणी म्हणजे काय ते सगळं कळलं आता मला. शेंगांचं हिरवंगार शेत तर असं मस्त आहे. अग, तू ये एकदा. फळं तर किती आहेत. काजूसुद्धा लागलेत. शिवाय फुलं तर विचारू नकोस. मोसंबी, चिक्कू, संत्र, केळी, नारळ... वा वा... उद्या पण आम्ही तिथेच जाणार आहोत. "

" छोटे भैय्या, आज खरा खुशीत आहेस हं. कपडे बघ किती मळवले आहेस. चल दूध पी. खाऊन घे. मग मी पण तुला एक गंमत सांगणार आहे. "

" अग, मी तुला आणखी एक गंमत सांगायची विसरलो. "

" हो ? कोणती रे ? "

" मला नाटकात घेतलंय. त्यात मी गाणं पण म्हणणार आहे. माझा आवाज सगळ्यांना खूप आवडतो. शेतावर काम करताना सुद्धा मी एक गाणं म्हटलं. सगळ्यांनी खूप टाळ्या वाजवल्या. "

" कशाबद्दल आहे रे हे नाटक ? "

" वा ! तुला नाही माहीत ? अग, एक डिसेंबरला आमच्या स्कूलची एनीवर्सरी आहे ना... "

" अगबाई खरंच. एक आणि दोन डिसेंबरला तर शाळेचा म्हणजे आश्रमाचाच मोठा उत्सव. मी येणार हं तुझं नाटक पाह्यला. "

" वा आलंच पाहिजे. दा पण येतील. ए दीदी, माझ्या आईला आणि दीदीला बोलवून घ्यायचं ? त्या येतील ?"

" खरंच आपण दां ना विचारून आजच पत्र टाकू या. त्या दोघी आल्यावर खूप मजा येईल. नक्की बोलवू या त्यांना. "

" बरं, तुझी गंमत नाही सांगितलीस. " अतुल म्हणाला.

" माझी गंमत तुझ्याइतकी छान नाही, पण आहे. "

" सांग की."

" माझा वाढदिवस आहे दोन दिवसांनी, माँ मला एकटीला दर्शन देणार आहेत. आशीर्वाद देणार आहेत. "

" हात् तिच्या ! तुला काय कुणीही म्हणेल, 'सदा सुखी हो.' "

" वा वा नाटक चांगलंच मुरलंय अंगात. कसा म्हणालास 'सदा सुखी हो...' बाहेरून कुणी ऐकेल तर वाटेल पन्नास साठ वर्षाचा पुरुष बोलतोय. "

दोघं कितीतरी वेळ हसत होती.

" बरं का भैय्या, आश्रमातल्या साधकाचा वाढदिवस मोठ्या निष्ठेनं, मोठ्या आस्थेनं पाळला जातो. आणि माँ चा आशीर्वाद म्हणजे दैवी वरदानच असतं. माझी एक मैत्रीण आहे, परवा तिला बरं नव्हतं म्हणून मी किचनमध्ये काम करायला गेले होते ना ती. तिचं नाव आहे द्विजाता. हे काही तिचं खरं नाव नाही. "

" मग ? "

" तिचं खरं नाव आता कुणाला आठवतसुद्धा नाही. तिचे वडील आॅफ्रिकेत होते. त्यांनी तिथे खूप पैसा मिळवला. मग ते मुंबईत आले, चैनीत राहू लागले. पण द्विजाता अगदी लहान होती ना तेव्हापासून तिचा ओढा धार्मिक गोष्टींकडे होता. एकदा तिनं कुठल्यातरी वर्तमानपत्रात अरविंदआश्रमाबद्दल वाचलं आणि इथे येण्याचा हट्ट धरला. तुला आश्चर्य वाटेल पण इथे आल्यावर माँ ला भेटायचं म्हणून हट्ट धरून बसली. शेवटी तिच्या वाढदिवशी तिची आणि माँची भेट झाली. शिकली सवरलेली ही तरुण मुलगी परत जाईना. आई वडिलांनी किती खटपट केली पण ती गेली नाही. आज पाच वर्ष झाली ती इथेच आहे, माँ कडे तिनं हट्ट धरला, म्हणाली, माझा

पुनर्जन्म झालाय, मी आता पहिली मुलगी राहिले नाही. माझं नाव बदला, माँ नं तिला हे नाव दिलं. द्विजाता... म्हणजे परत जन्म झालेली."

"हं." अतुल म्हणाला.

"का रे खरं नाही वाटत? विश्वास नाही बसत?"

"बसतो तर."

"एकदा माँ चा एक भक्त खूप आजारी पडला. डॉक्टरांनी पण हात टेकले. काय करावं कळेना. शेवटी ऑपरेशन करायचं ठरवलं. त्या साधकानं माँ चे आशीर्वाद मागितले. माँ नं त्या साधकाला आशीर्वाद दिले इतकेच नव्हे तर त्याचं आजारपण बरं व्हावं म्हणून स्वत: प्रयत्न केले. त्याचा पुनर्जन्म झाला. माँ नं त्याचं नाव 'नवजात' ठेवलं. एका साधिकेची अरविंदांबद्दलची निष्ठा पाहून तिचं नांव 'निष्ठा' ठेवण्यात आलं. एकाचं नाव 'पवित्र' ठेवण्यात आलं. अरे, ऑरोविल मध्ये जन्म झालेल्या पहिल्या मुलाचं नावं 'ऑरो' ठेवावं असं मदरनंच सांगितलं. कितीतरी परदेशी भक्त असे आहेत की ते आपली जुनी नावं विसरून गेले आहेत. माँ नं दिलेलं नांव लावण्यात प्रत्येकाला भूषण वाटतं. परगावी असलेल्या लोकांसाठी माँ एक सुंदर भेट कार्ड स्वत:च्या सहीनं पाठवते. त्यावर संदेश लिहिलेला असतो. माँ आपल्या संदेशातून श्रद्धा, त्याग, समर्पण, सच्चेपणा, स्फूर्ती या सद्‌गुणांचा आशीर्वाद त्या व्यक्तीला देते. प्रत्येकाचा वाढदिवस म्हणजे त्याचा पुनर्जन्म आहे, त्या दिवशी माणसानं अधिक चांगल्या जीवनाचा, अधिक उत्तम अशा दैवी आचार-विचारांचा स्वीकार करावा असं माँ चं मत आहे."

"दी!"

"का रे इतका गंभीर झालास?"

"समीरदाला असा नवा जन्म घेता आला तर फार छान होईल." अतुल म्हणाला.

"हो खरंय. आपण तुझ्या समीरदाला नक्कीच इथं घेऊन येऊ हं."

"दी, शाळेचा उत्सव खूप छान असतो का ग. ?"

"हो. एक गोष्ट तुझ्या लक्षात आलीय ना ?"

"कोणती ?"

"व्यायामाबद्दल. शारीरिक आरोग्याबद्दल इथे फारच दक्षता पाळण्यात येते. त्याला खूपच महत्त्व देण्यात येतं."

"हो. मला पूर्वी व्यायामाचा, मैदानी खेळाचा फार कंटाळा होता. आता आवडतं मला खेळायला. अग, पोहायला लागलो की पाण्याबाहेर यावं वाटत नाही."

"वा पोहायला पण लागलास का ?"

"मग तुला काय वाटलं ? आता तर मी समुद्रात सुद्धा पोहू शकेन. अग, मी एक नाव तयार करणार आहे. आणि स्वत: समुद्रात ती वल्हवणार आहे."

"ए, मग आम्हाला ने की त्या बोटीतून तुझ्या कलकत्त्याला." सुनीता हसतच म्हणाली.

"तू आत्ता चेष्टा कर माझी. पण वेळ आल्यावर दाखवीन. अशी मस्त होईल माझी बोट की पहात राहशील." अतुल म्हणाला.

"आता आधी नाटकातलं काम पाहते तुझं, गाणं ऐकते मग पाहते आमच्या छोटे भैय्याचा उजेड."

"च् बघ बुवा तू फार विषय बदलतेस. गॅदरिंग बद्दल बोलता बोलता उगाच फाटे फोडतेस," अतुल म्हणाला.

"बरं बरं आणि तू तरी आल्यापासून दुसरं काय करतो आहेस.

रे ? कपडे बदलले नाहीस, हातपाय धुतले नाहीस, खाल्लं नाहीस, बसलाय गप्पा मारत."

"असू दे ..."

असं म्हणतच अतुल मोरीत गेला. त्यानं जरा रागानंच दार लावून घेतलं. कपडे बदलून बाहेर आला. दीदीनं दूध आणि खायला दिलं.

"अरे वा घावन ? वडा ? मजा आहे." अतुल म्हणाला.

"आटप. तुला त्याच त्या जेवणाचा कंटाळा आलाय ना म्हणून गणपतरामच्या हॉटेलातून मुद्दाम घेऊन आले तुझ्यासाठी."

"किती छान आहेस ग तू दीदी. तू पण खा की."

"नको नको. मला भूक नाही."

"हुं. तुला कधीच भूक नसते. म्हणूनच बघ कशी आहेस हडकुळी. मी बघ कसा झालोय ठणठणीत. आई सुद्धा ओळखणार नाही मला."

"पुरे पुरे भैय्या, दृष्ट लागेल हो अशानं. घे खा."

"तू खा आधी, तरच मी खाईन."

दोघं एका बशीतून खात असतानाच दांनी घरात पाऊल ठेवलं.

"काय चाललंय बहीणभावाचं ?" दा म्हणाले. दोघांना एका बशीतून खाताना पाहून दांना एकदम आठवण झाली. बाबूमोशाय आणि आपण असेच खात असू. तो एका मोठ्या जमीनदाराचा मुलगा, आपण अनाथ पण त्याच्या आईनं कधी दुरावा केला नाही. बाबूमोशायचा हा नातू पण तसाच आहे. आपल्या आजोबासारखा लाघवी. आला तेव्हा सारखा रागवायचा, रुसायचा. आता रुळलाय चांगला."

" दा बरं झालं तुम्ही अगदी वेळेवर आलात. हा तुमचा लाडका अतुल माणसाला स्वस्थ काही बसू देत नाही. हे विचार, ते विचार, अमुक सांग, तमुक सांग असं चालू असतं. " सुनीता म्हणाली.

" बरं आहे की ग. एकटी होतीस तेव्हा मला सारखी म्हणायचीस ना, करमत नाही, मी घरात एकटी असते, आता अतुल आलाय तर तुला माझ्याशी बोलायला वेळ नाही. " दा हसत हसत म्हणाले.

अतुलला दोघांच्या अशा वागण्यानं नेहमीच घरची आठवण यायची. आपल्या घरी अशा गप्पा, हसणं, रुसणं कधी नसतंच मुळी. बघावं तेव्हा आई कष्टी, बाबा रागावलेले, धुसफुसलेले, दीदी घाबरलेली.

" हं काय विचारायचंय तुला अतुल बेटा ? " दांनी एक केळ सोलत विचारलं.

" तुमचा लाडका नातू शाळेच्या वार्षिक महोत्सवात गाणं म्हणणार आहे. नाटकात काम करणार आहे. " दी म्हणाली.

" वा वा शाबास. थोड्याच दिवसात तू खूपच पुढे आलास हं. तुझ्या बहनजी मला सांगत होत्या, मुलगा हुषार आहे पण जरा हट्टी मात्र आहे. "

" नाही हं दा, हल्ली मी कसलाही हट्ट करत नाही. पण मला एखादी गोष्ट कळली नाही की मग मात्र आवडत नाही. मी दीदी-जवळ, बहनजीजवळ हट्ट धरून बसतो. आता शाळेबद्दल विचारतोय तर दी सारखा विषय बदलतेय. " अतुल म्हणाला.

" अरे लबाड आहे तुझी दीदी. तिला एखादी गोष्ट माहीत नसली की ती असंच करते. " अनिलदा म्हणाले.

तिघंही हसले. अतुलनं दीदीकडे डोळे मिचकावून पाहिलं. दीदीनं जीभ काढून त्याला वेडावलं.

" सांगा न दा. " अतुल म्हणाला.

" सांगतो. आम्ही पाच सहा लोक इथं आलो, तेव्हा एवढा मोठा पसारा मांडून बसू असं वाटलं नव्हतं. "

" हां, बरी आठवण झाली, त्या दिवशी तुम्ही इथे कसे आलात ते सांगायचं राहूनच गेलं, तुम्ही इतर गोष्टीच सांगत बसलात. " अतुल म्हणाला.

" असेच आहेत दा. त्यांना एखादी गोष्ट सांगायची नसली की असेच फाटे फोडतात. इतर गप्पा जास्त. मुख्य सांगायचं राहूनच जातं. " सुनीता म्हणाली.

" अग लबाडे ..." म्हणतच दा हसले.

" पण जे सांगतात ते पण खूप छान असतं. त्यावेळी लोक कसे वागत, देशासाठी केवढा त्याग करत हे किती मस्त सांगितलं दांनी. " अतुल म्हणाला.

" शाळेची सुरुवात पण देशाची गरज म्हणून झाली असं म्हणायला हरकत नाही.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानच्या बाँबहल्ल्यापासून मुलांना वाचवावं म्हणून बऱ्याच मुलांना माँ च्या आश्रयाखाली पाठवण्यात आलं आणि अचानक एक मोठं काम येऊन मदरपुढं उभं राहिलं. आमचं आश्रमातलं आयुष्य या मुलांच्या येण्यानं बदलूनच गेलं. आश्रमातलं शान्त वातावरण मुलांच्या येण्यानं गजबजून गेलं. त्या मुलांच्या मानसिक, शारीरिक वाढीची काळजी घेणं पहिलं काम होतं. टेनिस खेळून झाल्यावर मदर सरळ प्ले ग्राऊंडवर जायची. तिथं ती मुलांचे खेळ पहायची. माँ मुलांना गोष्टी सांगत असे.

त्यांचे तास घेत असे, शिकवत असे. मुलं मुली एकत्र खेळत, व्यायाम घेत. त्यावर काही लोकांनी राग व्यक्त केला. पण माँ चं नेहमी म्हणणं असतं की, अनुशासन, शिस्त ही बाहेरून थोपवली जात नाही, मनांतूनच तिचा उगम झाला पाहिजे. त्यासाठीच निर्मळ वातावरण, उच्च विचार आणि चांगले सत्शील शिक्षक हवेत. सुदृढ प्रकृती हवी.

पहिल्यांदा मुली पायजमा घालून व्यायाम घेत पण एकदा एक मुलगी व्यायाम करताना पडली, तिला दुखापत झाली. मदरनं लगेच निर्णय घेतला आणि मुलींसाठी शॉर्टस् शिवण्यात आले. लोकांनी टीका टिप्पणी केली. पण जे योग्य, जे चांगलं ते करताना मदरनं कुणाच्या रागालोभाची पर्वा केली नाही. तिनं मुलींच्या पुढे स्वत: भाषण करून या पोषाखाचं खेळाच्या दृष्टीनं महत्त्व समजावून सांगितलं. जुन्या रूढी, कल्पना, श्रद्धा, परंपरा, काळानुरूप बदलल्या पाहिजेत असं मदरचं मत आहे. डिसेंबर मध्ये वार्षिक उत्सवाच्यावेळी मदर स्वत: नाटकाच्या तालमी घेत असे. पण माँची शिस्त कडक हं. कोणी चुकलं वेळेवर काम केलं नाही किंवा शिस्तीत वागलं नाही तर ती रागवायची, सौम्य अशी शिक्षा पण करायची. नृत्य, नाट्य, संगीत, खेळ या सगळ्यांतून मुलांची सर्वांगीण वाढ होते, झाली पाहिजे असा माँचा सतत प्रयत्न असतो. यातूनच शारीरिक आरोग्य तर मिळतेच पण मनाचा योग्य असा विकास होतो.

अरे अतुल, मी काही पोर नव्हतो तेव्हा पण माँ बरोबर संध्या-काळचे चार ते नऊ हा वेळ फार छान जायचा. मुलं तिच्याबरोबर खेळायची. तिनं सांगितलेल्या गोष्टी, तिनं घेतलेले धडे यामुळे वेळ कसा मजेत जायचा. मी माँ कडूनच फ्रेंच शिकलो. सेजदांमुळे निर-निराळ्या भाषा कळू लागल्या. त्यांनी लिहिलेल्या कविता, नाटकं,

लेख त्यांच्या तोंडून ऐकण्याची मजा औरच होती. मोठं भाग्यच होतं ते आमचं. माँ स्वतःच्या हातानं खाऊ देत असे. मुलामुलींना सारखेच शारीरिक शिक्षण दिलं जावं अशा मताची माँ आहे. आपल्या शरीराच्या हालचालीवर अधिकार मिळवणं, ते आरोग्यपूर्ण ठेवणं हा तर व्यायामाचा उद्देश. चांगल्या शरीरात समर्थ, पवित्र, सोज्वळ मनाची घडण तयार होते. आत्म्याच्या योग्य विकासासाठी संगीत, कला, कविता अत्यंत आवश्यक आहे. एक डिसेंबरला नृत्य, नाट्य, संगीत यांचे कार्यक्रम साजरे करतात. दोन डिसेंबरला प्लेग्राउंडवर कसरती, मैदानी खेळ खेळले जातात. मलखांब, वजन उचलणे, ड्रिल, आसनं अशा प्रकारचे खेळ करून दाखवण्यात येतात.

या सगळ्या खेळांसाठी देशी, परदेशी तज्ज्ञ लोक आहेत. ते मुलांना शारीरिक शिक्षण देतात. दोन डिसेंबरचा कार्यक्रम संध्याकाळी पाच वाजता सुरू होऊन दोन तीन तास चालतो. या दिवशी स्पोर्ट-ग्राउंडवर रोषणाई करण्यात येते. मार्च पास्ट आणि मदरला मानवंदना देण्यात येते. मग बँडवर वंदेमातरम् वाजविण्यात येतं. पाहुण्यांचं स्वागत करून सामुदायिक ड्रिल होते, काही कसरती, खेळ दाखविण्यात येतात आणि शेवटी बँडवर 'जनगणमन' वाजविण्यात येऊन कार्यक्रम संपतो. हुषार मुलांना, विशेष कर्तृत्व दाखविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीसं पण देण्यात येतात. स्पोर्ट-ग्राउंडवरचे प्रोग्राम इतके छान असतात की वर्षनूवर्ष पाहिले तरी त्यातले नाविन्य, औत्सुक्य कमी होत नाही. मुलांच्या कवायती, ड्रिल, खेळ पाहताना अंगावर रोमांच उभे राहतात. अलीकडे मात्र माँ शाळेच्या एनिवर्सरीला हजर रहात नाही. कारण खूप वय झालंय आता. ज्या जागी, ज्या खुर्चीवर माँ बसून दर्शन देत असे ती खुर्ची ठेवण्यात येते. माँ मुलांना आशीर्वाद पाठविते."

" हं अतुल राजे, ऐकलंत सगळं! आता उठा. कामाला लागा." सुनीता म्हणाली.

" थांब ग, मुख्य गोष्ट राहिलीच की " अतुल म्हणाला.

" दा, याला तुम्ही फार लाडावून ठेवलं आहे हं.

इथली सगळी माहिती देण्याच्या नादात याला गोष्टीवेल्हाळ मात्र करून ठेवलंय. लोकांनी बोलावं आणि यानं मांडा ठोकून ऐकावं. बरंय की, मजा आहे. काम नको करायला, आळशी कुठला." सुनीता म्हणाली.

" तू पण बस. खूप ऐकण्यासारखी गोष्ट आहे. तुमच्या भाषेत बोलायचं म्हणजे एकदम थ्रिलिंग आहे." दा म्हणाले.

" आणि माझं काम ?" सुनीतानं विचारलं.

" मी करायला लागेन. बस ग. सांगा दा." अतुल म्हणाला.

" अजून मला चांगलं आठवतंय, सेजदा तुरुंगातून सुटून आले होते. संध्याकाळची वेळ होती. नेहमी प्रमाणे सेजदा 'कर्मयोगीच्या' कार्यालयात शाल पांघरून बसले होते. मी नेहमीप्रमाणे कचेरीतलं साफसफाईचं काम करत होतो. सेजदा माझ्याकडे पाहून कौतुकानं हंसले. मी एवढासा मुलगा त्यांचं पडेल ते काम हौसेनं करत होतो. त्याचं त्यांना नेहमीच कौतुक वाटायचं. 'वंदे मातरम्' म्हटल्यामुळे माझी शाळेतून हकालपट्टी झालीच होती. बाबूमोशायच्या घरी जेवाखायचं आणि सेजदांच्या कार्यालयात पळायचं, हा माझा नित्यनेम होता. काम असं फार काय असणार ? सेजदा लिहित असताना मी नुसता त्यांच्याकडे पहात असे. ते खूप झपाटच्यानं लिहीत. अग्रलेख तर बोलता बोलता लिहून देत. विचार स्पष्ट, नेमकी काय ते सांगणारी ओजस्वी भाषा यामुळे 'कर्मयोगी' साप्ताहिक चांगलं चाललं होतं. त्यांना कधी संदर्भ पुस्तकं लागत

नसत. लिहिताना मधूनच थांबत. काही वेळ कुठेतरी टक लावून पहात, विचार करत मग परत झपाट्यानं लिहायला सुरुवात करत. मधूनच सिगारेट ओढत. पाँडेचरीला आल्यावर सुद्धा ते सिगारेट पीत पण एकदा माँ नं त्यांना सिगारेट सोडून देण्याबद्दल सुचवलं. तेव्हापासून ती पण सुटली. आश्रमातल्या लोकांसमोर चांगला आदर्श असावा म्हणून त्यांनी सिगारेट सोडली."

"मग त्या कार्यालयात काय झालं, दा ?" अतुलनं विचारलं.

"सांगतोय, तेच सांगतोय बेटा, त्या संध्याकाळी रामचंद्र मुजुमदार नावाचा तरुण झपाट्यानं कचेरीत घुसला, म्हणाला, 'वॉरंट निघालंय, तुम्हांला पकडण्यात येणार आहे.' हे शब्द ऐकताच त्या खोलीतलं वातावरण एकदम बदललं. आम्ही सगळेजण सेजदांकडे उत्सुकतेनं पाहू लागलो."

"मी चंद्रनगरला जातो." एकदम ते म्हणाले.

"आत्ता ?" रामबाबूंनी विचारलं.

"हो आत्ता. याच क्षणी." एवढं, म्हणून सेजदा रामबाबूंबरोबर बाहेर पडलेसुद्धा. सुरेश चक्रवर्ती, वीरेन पण त्यांच्या पाठोपाठ निघाले. मी पण मुकाट्यानं त्यांच्यामागून निघालो. अनेक गल्ली-बोळ ओलांडून त्यांनी गंगेचा किनारा गाठला. खरं म्हणजे 'कर्मयोगीच्या' कचेरी भोवताली सतत गुप्तहेर असायचा, पण नेमका त्याचवेळी तो कुठे गेला होता कोण जाणे. योगायोगच म्हणायचा. रामबाबूंनी एक नांव बोलावली. नावाड्याशी हळूच काहीतरी बोलले. आम्ही नावेत बसलो. रामबाबू परतले. त्या चांदण्यारात्री मी सेजदा बरोबर निघालो होतो. कुठे कुणास ठाऊक ? पण माझं मन आनंदानं काठोकाठ भरलं होतं. त्या शान्त, नीरव रात्री माझ्या आयुष्याला निराळंच वळण लागलं. मला एका थोर

महापुरुषाची सावली कायमची लाभली. माझ्या डोक्यावर हात ठेवत सेजदा पुटपुटले.

' निवेदिताला काहीं सांगता आलं नाही. निरोप दिलाय खरा, पण आता 'कर्मयोगीचा' सगळा भार तिच्यावरच पडलाय."

"दा, निवेदिता म्हणजे विवेकानंदांची शिष्या ?" सुनीतानं विचारलं.

"हो बेटा तीच." मी मनोमन बाबूमोशायचा विचार करत होतो. एकमेव मित्र, उपकारकर्ता पण त्याला निरोप देता आला नाही. आता तो कलकत्ताभर भिरभिर हिंडत राहील. आपल्याला शोधत राहील.

आमची नाव चंद्रनगरच्या किनारी लागली. आता पुढे काय म्हणून प्रत्येकजण चिंतेत होता. पण शिषिर घोष भेटले. म्हणाले, " मोतीलाल यांच्या घरी अरविंदांच्या गुप्त निवासाची सोय करण्यात आली आहे." वीरेन आणि सुरेशनं परत कलकत्त्याला जावं असं ठरलं. त्यामुळे कलकत्त्यात कुणाला संशय येणार नव्हता. माझं काळीज धडधडत होतं, आता आपल्याला पण परत नेतात की काय ! पण देवाची कृपा म्हणून माझ्याकडे कुणी लक्षच दिलं नाही. मी सेजदांना सावलीसारखा चिकटलो. सेजदा अगदी शान्त होते. कुठल्याही प्रकारे विचलित झाले नव्हते. कुणाला संशय येऊ नये म्हणून त्यांचं जेवण मोतीबाबू बाहेरून आणत. सेजदांचं जेवण फार नव्हतं. माझं एवढंसं पोट त्यांच्या डब्यात सहज भरायचं. सेजदा बराच वेळ ध्यानस्थ असत. फार बोलणं कधी नसायचेच. मोतीलाल त्यांचे खरे खरे भक्त होते. त्यानंतर पाँडेचरीला आल्यावरसुद्धा त्यांनी सेजदांना हरप्रकारे मदत केली. इथे आमची पैशाची नेहमीच चणचण असायची. पुरेसे कपडे नसायचे. एकदा तर सेजदांजवळ फक्त आठ आणे उरले होते.

चार पोटं भरायची त्यांच्यावर जबाबदारी होती, पण मोतीबाबू नेहमीच मदतीला धावून येत. चंद्रनगरहून पैसे पाठवत. कपडचा-लत्त्याची मदत करत. "

जवळजवळ महिना दीड महिना आम्ही चंद्रनगरला राहिलो.

चंद्रनगरहून पाँडेचरीला जाईपर्यन्तचा तो प्रवास ! बापरे ! अजून आठवलं की माझ्या अंगावर शहारा येतो. पण सेजदा शान्त होते. कोणत्याही गोष्टीमुळे विचलित होणं जणू त्यांना माहीतच नव्हतं.

चंद्रनगरला येऊन महिना झाला असेल, सेजदांना पाँडेचरीला जाण्याचा आदेश मिळाला.

" कुणी दिला आदेश, दा ?" अतुलनं विचारलं.

त्यांच्या मनानं. पुष्कळदा आपल्यासारख्या सामान्य माणसाला सुद्धा मनातून एक प्रेरणा होते, अचानक एखादा विचार येतो. एखाद्या गोष्टीचा साक्षात्कार होतो. पण आपल्याला ते काही नीटसं कळत नाही. वळत नाही. योगी पुरुषाला या प्रेरणा स्पष्ट स्वरूपात होतात. मनातून आदेश येतो. उदाहरणच द्यायचं तर रामबाबूंनी सेजदांच्या अटकेची बातमी देण्यापूर्वी निवेदितानं त्यांना हेच सांगितलं होतं की ब्रिटिश सरकारनं तुम्हांला देशाच्या हद्दीबाहेर काढण्याचं ठरवलंय तर तुम्ही हद्दपार होऊनच कार्य का करत नाही ? पण तेव्हा अरविंदांच्या मनानं तसा आदेश दिला नाही. त्यांनी कलकत्ता सोडलं नाही. ते म्हणाले, " मला आत्तातरी कुठे जायची आवश्यकता वाटत नाही. मी देशाच्या नावानं एक खुले पत्र लिहिण्याचं ठरवलंय् त्यामुळे सरकारला मला अटक करावी लागणार नाही. " त्याप्रमाणे सेजदानं 'कर्मयोगीच्या' अंकात देशाच्या नावानं एक पत्र लिहिलं.

" काय लिहिलं त्यांनी या पत्रात ?" सुनीतानं विचारलं.

" आता मला त्याबद्दल विस्तारानं सांगता येणार नाही, पण एक मात्र खरं की त्या पत्रामुळे सरकारनं त्यांच्या हद्दपारीचा विचार सोडून दिला. त्या पत्राचं एक आणखी महत्त्व मानलं जातं ते म्हणजे त्या पत्रात सेजदांनी गांधीजींच्या आगमनाचं भविष्य वर्तवलं होतं. देशाचं भवितव्य ज्याच्या हातात सोपवलं जाईल अशा महात्म्याची प्रतीक्षा करा. तो येणार आहे, असं त्यांनी स्पष्ट लिहिलं होतं. सेजदा चंद्रनगरला आल्यानं त्यांनी अटकेच्या भीतीनं पलायन केलं असा आरोप करण्यात आला. त्यावर त्यांनी आपली बाजू मांडताना सांगितलं की मी राजकारणातून निवृत्त होत आहे कारण मला माझी साधना करायची आहे. मी जे आंदोलन सुरू केलंय ते कुठेही चालू राहील, स्वातंत्र्यप्राप्तीचा जो मार्ग मी दाखवून दिला आहे त्यावर चालल्यास यश हे मिळणारच. निराशा किंवा भीतीच्या पोटी मी राजकारण सोडलेलं नाही."

" दा तुम्ही पाँडेचरीला कसे गेलात सांगा न ! " अतुल म्हणाला.

" सांगतो. सेजदांना पाँडेचरीला जाण्याचा आदेश आला. पाँडीत जायची इच्छा व्यक्त करताच मोतीलाल त्या कामाला लागले. ते सेजदांचे निस्सीम भक्त होते. अरविंदांच्या मावस भावावर, सुकुमार मित्र याचेवर ही जबाबदारी सोपवण्यात आली. डुप्ले जहाजाची तिकिटं रिझर्व करण्यात आली. पोलीसांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठी आधी कोलंबोचं तिकिट काढण्यात आलं. उतारूंची नावं पण बनावटी देण्यात आली. आम्ही चंदरनगरहून नावेनं निघालो. घाटावर पोहोचलो. दुमरतल्ला घाटावरून आम्ही कलकत्त्याला जायचं ठरलं होतं. पण घाटावर आम्हांला घ्यायला सुकुमार नव्हता किंवा विजयनाग पण नव्हता. टांगा करून सुकुमारच्या घरी गेलो

तिथं कळलं तो घाटावरच गेलाय, आम्ही टांगा घाटाकडे वळवला. मी सेजदांकडे पाहिलं, ते शान्त होते. गंगेच्या पाण्याकडे पहात विचार करत उभे होते.

इकडे सेजदांची गाठ न पडल्यामुळे सुरेन आणि नगेन 'कर्मयोगीच्या' कार्यालयात गेले, सुकुमारबाबूंनी त्यांना परत पाठवलं. शेवटी सगळ्यांची गाठ पडली तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. पण तोपर्यंत कळलं की जहाजाचे डॉक्टर प्रवाशांची तपासणी करून निघून गेले होते. डॉक्टरांच्या सर्टिफिकिटा शिवाय कुणी जहाजावर येऊ दिलं नसतं. पण दैवयोगानं कुली चांगला होता. त्यानं डॉक्टरचं घर दाखवलं. डॉक्टर भला माणूस होता. त्यानं तपासणी केली आणि ज्योतिंद्रनाथ मित्तर यांना मलेरियाचा ताप येत असल्यानं ते हवाबदल करण्यास जात आहेत असं प्रमाणपत्र तयार झालं आणि आम्ही डुप्ले जहाजावर पाऊल ठेवलं."

"अरविंदांचं नांव ज्योतिंद्रनाथ मित्तर म्हणून नोंदवलं होतं?" अतुलनं विचारलं.

"हो."

"किती दिवसांनी पाँडेचरीला पोहचलात?" सुनीतानं विचारलं.

"कलकत्त्याहून एक एप्रिल १९१० ला डुप्ले जहाजानं आम्ही निघालो ते चार एप्रिलला पाँडेचरीला पोहचलो. आपण कुठे निघालो आहोत, पुढे काय करणार आहोत कशाचीच मला कल्पना नव्हती. काळजी, चिंता करण्याचं वय पण नव्हतं. एवढ्या सगळ्या धावपळीत, गडबडीत मला कुणी बाजूला सारलं नाही याचाच मला आनंद होता. सेजदांबरोबर यायला मिळालं होतं, त्यांची सेवा करायला मिळाली याचाच मला आनंद होता. आज केस पिकले, आज या सगळ्या

गोष्टींची आठवण येते तेव्हा वाटतं, आपण परत कलकत्त्यात कधीच येणार नाही आहोत, आपल्या जन्मभूमीवर आपलं पाऊल कधीच पडणार नाही याची सेजदांना तरी कल्पना होती का ? ते तर जणू अज्ञाताला भेटायला उत्सुक होते. अजूनही मला त्यांचा शान्त, गंभीर विचारमग्न चेहरा आठवतोय."

अनिलदा गप्प झाले. सुनीता आणि अतुल सगळी कहाणी ऐकून भारावून गेले होते. समोर असलेल्या माँ च्या, अरविंदांच्या फोटोकडे पहात होते.



श्री अरविंद



श्री माताजी

# ११

" प्रिय हेमा दीदी ........

अतुल आपल्या बहिणीला पत्र लिहीत होता.

दीदी, बरेच दिवस झाले तुझं पत्र नाही. मी आता पाँडेचरीत रमलोय हे खरंय पण तुमची सर्वांची खूप आठवण येते. समीरदाला तर पहायला माझा जीव नुसता तळमळतोय. दीदी, तो खरंच खूप चांगला आहे, मला त्यानं किती गोष्टी दाखवल्या हे तुम्हा कुणाला माहितही नसेल. अग, त्यानंच सगळं कलकत्ता शहर मला दाखवलं. ट्रॅममध्ये बसविलं. बसमध्ये हिंडवलं. बागेत हिंडवलं. पशू, पक्षी, झाडं, पानं, फुलं यांची तर त्याला खूप माहिती आहे. पक्ष्यांचे निरनिराळे आवाज तर असे मस्त काढतो. सुंदर नकला करतो. पण बाबांना त्याचं कौतुक नाही. त्यामुळे तो नेहमी एकटा एकटा असायचा. मला नेहमी म्हणायचा, " घरातून मला प्रेमच मिळत नाही. तू आणि हेमा सगळ्यांना आवडता. मीच आवडत नाही. मी निरनिराळे

आवाज काढतो तर बाबा म्हणतात हा जंगली आहे. आई मला सारखी दूर दूर ठेवते. ती माया करते माझ्यावर, पण माझे लाड करावे तिला वाटत नाही. मॅट्रिकला मी पहिला आलो तर बाबा म्हणाले 'यानं कुणाचीतरी कॉपी केली असेल किंवा या गुंडाला पेपर कळला असेल." दीदी, समीरदा अशा खूप खूप गोष्टी मला सांगायचा. मग एक दिवस म्हणाला, " मी घर सोडणार आहे. माझ्या गुणांचं कौतुक करणारी माणसं मला मिळाली आहेत." कधी कधी खूप चिडायचा, रागवायचा, मोठ्या माणसांना शिव्या द्यायचा. एकदा त्याचे बूट चोरीला गेले, खरंच चोरीला गेले पण बाबांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. मग त्यानं दहा रुपये चोरले. पण दीदी, त्या दिवशी तो खूप उदास होता. जेवला पण नाही."

समीरदाला इथं आणायचंय, त्याला इथं प्रेम मिळेल. हे वातावरणच असं आहे की तो सुधारेल, नक्की सुधारेल. सुनीतादीनं मला असंच सांगितलंय. आणि ती कधी खोटं बोलत नाही.

ए दीदी, तू मनातल्या मनात हसते आहेस ना ? मी इतकं शहाण्या-सारखं लिहितोय म्हणून ? कदाचित् नवलसुद्धा करत असशील. तुला खूप खूप काही काही सांगायचंय, लिहायचंय. अग, खरं तर आज मी तुला ऑरोविल किंवा उषानगरी या नव्या नगरीविषयी लिहिणार होतो. नुकताच मी तिथे जाऊन आलो. खरंच सांगतो, मला तर तिथून यावंसंच वाटलं नाही. आश्रमाचं वातावरण, धोरण, तिथलं ध्येय विशाल रूपात तिथे आकार घेतंय असं वाटतंय. मस्त जागा आहे ती. तिथल्या त्या हिरव्यागार बागा, शेतं, नव्या नव्या डिझाईनच्या इमारती पाहून मन थक्क होऊन जातं. खूप खूप लिहिता येईल, लिहावं वाटतंय पण लिहित नाही, तुम्ही सर्वजण लवकर इकडे या. समीरदा केव्हा सुटून येणार आहे ते जरूर कळव. आई बरी आहे

ना ? आणि बाबा ? खरंच दी, तुझा रवीन्द्र संगीताचा अभ्यास कुठवर आला ? मोठं मोठं पत्र पाठव. सर्वांना माझा नमस्कार सांग.

तुझा,
अतुल

अतुलनं पत्र चिकटवून पोस्टात टाकलं. येता येता आपलं काही पत्र आलंय का म्हणून पहायला गेला तर त्याचं पत्र होतं. हेमादीदीनं लहानसं पत्र लिहिलं होतं. समीरदा सुटून आल्याचं कळवलं होतं. पण तो खूप अबोल झालाय, वाळलाय्, एकटाच कसलातरी विचार करत बसून राहतो, घराबाहेर पडत नाही. त्याला पाँडेचरीला घेऊन जावे अशी आईची फार इच्छा आहे पण बाबा समीरदाबद्दल काही बोलायलाच तयार नाहीत, असं लिहिलं होतं.

पत्र वाचताना अतुलला आनंद झाला होता. समीरदा घरी आला होता. बाबा नेहमी असे का वागतात ! आपली आई तर किती चांगली आहे ! तिचं ते का ऐकत नाहीत ? समीरदाला इथे आणण्यासाठी काय करावं...अतुल विचाराच्या तंद्रीतच घराकडे परतला.

"काय राजे, कसला विचार चाललाय ? "सुनीता विचारत होती. अतुल बोलला नाही. त्यानं हेमादीदीचं पत्र तिच्या हातात ठेवलं. सुनीतानं पत्र वाचलं. जरावेळ काहीच बोलली नाही. मग म्हणाली,

"आपण दां ना विचारू या. माँ ला ते विचारतील. तिनं परवानगी दिली तर समीरदाला लगेच बोलावून घेऊ."

"माँ नं परवानगी नाही दिली तर ?" अतुलनं विचारलं.

"नक्की देईल. अरे, इथे कितीतरी हिप्पींना माँनं परवानगी दिलीय मुद्दामच. या वातावरणात ती मुलं सुधारतील असा माँ चा विश्वास आहे. तू तर ऑरोविलमध्ये पाहिलं असशीलच कितीतरी अशी मुलं मुली काम करताहेत. सध्या तरी तिथे राहणं सोपं नाही

आहे. पाण्याची, विजेची, घराची अडचण आहे. नवी नगरी उभारताना येणाऱ्या बऱ्याच अडचणी आहेत. पण ती मुलं दिलेलं काम मनापासून करताहेत. गैरसोयींना तोंड देताहेत. कितीही वाईट असो, योग्य वळण लागलं तर माणूस सुधारतोच. तो मुळात काही वाईट नसतो." सुनीता बोलत होती.

"काय बाईसाहेब कसली व्याख्यानबाजी चाललीय ?" द्विजाता आंत येत म्हणाली.

अतुल द्विजाताला पाहून हसला.

"तुझा हा अतुल मला देऊन टाक ग सुनीता. फार छान हंसतो." द्विजाता म्हणाली. अतुल लाजून गेला.

"वा ग वा शहाणीच आहेस. अग, त्याची हेमादीदी आली की तो" माझासुद्धा राहणार नाही. कोण सुनीता म्हणून विचारेल." सुनीता म्हणाली.

"नाही ग दी मी तुला कधीच विसरणार नाही." अतुल मनापासून म्हणाला.

"माझा छोटा भैय्या." म्हणतच तिनं त्याला जवळ घेतलं.

"बरं बाईसाहेब सकाळीच कशाला आल्या होत्या ?" तिनं द्विजाताला विचारलं.

"अग, ऑरोविलची माहिती देणारी पुस्तिका तयार झाली आहे कां ? कांही लोकांना पोस्ट करायची आहे. ते काम माझ्याकडे आलंय. म्हटलं त्याबाबत तुला नक्की माहित असणार."

"हो हो भाईजींनी मला कालच या बाबत सांगितलंय. चल आपण ऑरोविलच्या ऑफिसमध्ये जाऊ या." सुनीता म्हणाली. चल रे तू पण ... जाता जाता सुनीता म्हणाली.

अतुल त्या दोघींबरोबर ऑरोविलच्या ऑफिसमध्ये गेला. तिथें प्रत्येकजण आपल्या कामात दंग होता. त्याला आश्चर्य वाटलं, लहान मोठी सगळीच माणसं पडेल ते काम करत होती. त्यांचे सर सुद्धा तिथे होते. मांडा ठोकून तिकिटं चिकटवित बसले होते. एक वृद्ध गृहस्थ कागदांचा कचरा उचलून टाकत होते.

" या ... या. ये बेटी ... " कुणीसं म्हणालं. अतुलनं वळून पाहिलं, एक गोरा गोरासा हंसऱ्या चेहऱ्याचा माणूस द्विजाताला त्यांनी काय करायचं ते सांगत होता. सुनीताला म्हणाला, 'तू माझ्या खोलीत चल, तुला काही पत्रं डिक्टेट करायचीहेत. सुनीतानं जाता जाता अतुलला पण बरोबर घेतलं. कोण हे ? अतुलनं डोळ्यानंच प्रश्न विचारला.

" हे न ? भाईजी, ऑरोविलची जबाबदारी त्यांच्यावर आहे. "

" तुझे बॉस आहेत ? " अतुलनं विचारलं. सुनीता हंसली. चार पावलांवर असलेले भाईजी म्हणाले,

" बेटा, इथे कुणी कुणाचा बॉस नाही. सगळे माँ चे सेवक आहेत. कोणतंही काम लहानमोठं नसतं. माँ सांगेल ते काम मनापासून करणे हाच एका दृष्टीनं अरविंदांनी सांगितलेला योग आहे. ते म्हणत 'सर्व जीवन हाच एक योग आहे.' म्हणजे प्रत्येक काम पवित्र आहे, चांगलं आहे, ते करताना आपण सचोटी, कष्ट, एकाग्रता, निष्ठा हे गुण अंगी बाणवले पाहिजेत. " भाईजी म्हणाले.

अतुल भाईजींच्या खोलीत गेला. सुनीता टाईपरायटर घेऊन पुढे बसली. तिनं कागद जुळवून लावले. कॉर्बन घातला. भाईजी हलक्या आवाजात तिला मजकूर सांगत होते. दी ची बोटं भराभरा फिरत होती. सगळीकडे शांत होतं. पलीकडे बरीच माणसं काम करताहेत

हे जाणवत सुद्धा नव्हतं. दीदीच्या टाईपरायटरचा आवाज तेवढा ऐकू येत होता. एक ओळ संपली की टाईपरायटरची घंटी हळूच वाजत होती.

अतुल त्या खोलीतला साधेपणा पहात होता. टापटीप होती. स्वच्छता होती. माँ चा मोठा फोटो होता. त्यावर सुंदर गुलाब वाहिलेला होता. सुरेख फुलांचा फ्लॉवर पॉट पण टेबलावर होता.

मजकूर सांगता सांगता भाईजींनी अतुलच्या हातात एक पुस्तक दिलं. डोळ्यानं खूण केली, वाच.

अतुल ते पुस्तक घेऊन खोलीच्या बाहेर व्हरांड्यात आला. जिना दिसला. चढून वर गच्चीवर गेला. दूरवर निळाशार समुद्र दिसत होता. अतुल खुष झाला. बराच वेळ समुद्राकडे पहात राहिला. मग सावलीला बसून त्यानं हातातलं पुस्तक उघडलं.

सुंदर गुळगुळीत कागदावर ऑरोविलचे कितीतरी फोटो त्यात होते. मातृमंदिर, निवासस्थान, शाळा, घरं, शेतं, दवाखाना, उद्यान, समुद्रकिनारा, त्यावर धुंद होऊन सळसळणारी नारळी, पोफळी ! ऑरोविल विषयी त्या पुस्तकात सचित्र माहिती दिली होती. अतुल वाचत होता.

ऑरोविल किंवा उषानगरी कुणा एका जमाती, राष्ट्र, धर्म, भाषेसाठी नाही. जगातल्या कोणत्याही मानवाला इथे राहण्याचा हक्क आहे. सर्वसामान्य माणूस देवत्व प्राप्त करू शकतो, ही पृथ्वीच स्वर्गतुल्य होऊ शकते. स्वर्गाकडे धावण्यापेक्षा इथेच स्वर्ग का निर्माण करू नये ? देवत्वाकडे नेणारी ही नगरी आहे. सतत विकसित अशी ही नगरी आहे. विकास हीच तिची अवस्था आहे. ही ताजेपणाची नगरी आहे, तारुण्याची नगरी आहे. वृद्धत्व तिला ठाऊक नाही. देवरूप होण्याची ज्याला आस आहे तो या नगरीचा

नागरिक होऊ शकेल. माताजी म्हणतात त्या प्रमाणे पृथ्वीवर असं एक ठिकाण हवं जिथे राष्ट्रा-राष्ट्रात वैरभाव नसेल. तऱ्हेतऱ्हेच्या सामाजिक प्रथा, निरनिराळे नैतिक विचार, परस्पर विरोधी धर्म, विभिन्न भाषा हे सर्व सुखाने एकत्र नांदले पाहिजे. धनाचा उपयोग धन मिळविण्यासाठी न होता त्याच्या साह्यानं देवरूप मानवाच्या जन्मासाठी योग्य भूमी तयार झाली पाहिजे.

ऑरोव्हिल म्हणजे उगवत्या सूर्याची नगरी. म्हणजेच उषानगरी. परमेश्वराच्या लेकरांचं स्वागत करायला उभारली जात असलेली नगरी.

सोळा चौरस मैलाच्या जागेवर पसरलेल्या या नगरीची रचना काहीशी कृष्णाच्या सुदर्शन चक्रासारखी वर्तुळाकार आहे. या नगरीचे चार भाग कल्पिले आहेत. औद्योगिक विभाग, सांस्कृतिक विभाग वसाहतीचा विभाग आणि आंतरराष्ट्रीय विभाग.

२८ फेब्रुवारी १९६८ रोजी देशोदेशीची मुलं, एक मुलगी एक मुलगा ऑरोविल मध्ये जमली होती. हातात होती, आपआपल्या देशाची मूठभर माती. त्या दिवशी कित्येक राष्ट्रांची माती गळ्यात गळा घालून मातृमंदिराच्या पायाशी विसावली. खऱ्या अर्थानं एकात्मता, एकरूपता. हे मातृमंदिर उषानगरीच्या मधोमध उंचावर जणू सगळ्यांवर आशीर्वचनाचा शुभहस्त घेऊन उभे राहील. चारी बाजूला असतील सुंदर उद्यानं. भोवताली उमलत्या पाकळ्या-सारख्या भरीव भिंतीची योजना करण्यात आली आहे. मध्यभागी काँक्रीटचा पोकळ स्तंभ आहे. मातृमंदिराचा गाभारा प्रार्थनास्थाना-सारखा राहील. ईश्वरी अस्तित्वाचे प्रतीक म्हणून दोन एक फूट व्यासाचा चकचकीत गोळा ठेवण्यात येईल. चैतन्य निर्माण करणारे वातावरण इथे राहील. उगवत्या सूर्याची सोनेरी किरणं या गोल

करंडकाभोवती बसवलेल्या रंगीबेरंगी तबकड्यांवर पडून तिथली ध्यान-सभागृह उजळून टाकतील. दैवी शक्तींशी संपर्क साधण्याचं मातृमंदिर हे प्रतीक राहील.

सांस्कृतिक विभाग या नगरीचे मुख्य आकर्षण ठरेल. मानवाच्या उत्क्रांतीपासून आजपर्यन्तच्या संस्कृतीचे प्रतिबिंब या विभागाच्या रचनेचे वैशिष्ट्य राहील. संगीत, नाट्य, चित्रकला, हस्तकला इत्यादी कलांना उत्तेजन देण्यासाठी एक कलाविद्यालय स्थापन होईल. चित्रपट, टेलिव्हिजन सेंटरही असेल. नाट्यगृह असेल. विश्वसमाचार केंद्र असेल. उत्तम असे क्रीडांगण, पोहण्यासाठी तलाव, टेनिस, गोल्फ, रायडिंग वगैरेची सोय या विभागात असेल. इथे एक मोठे आंतर-राष्ट्रीय विद्यापीठ उभारण्याची योजना आहे. इथे मिळणारे शिक्षण परीक्षा, पदव्या, नोकरी यासाठी नसून मानवाचा मानसिक, शारीरिक विकास करण्यासाठी असेल. बालवयातच उत्तम असे संस्कार घड-वण्यासाठी काळजी घेण्यात येईल. बाई गरोदर राहिल्यापासूनच तिला सुंदर, पवित्र, शान्त अशा वातावरणात ठेवण्यात येईल. गर्भा-वस्थेपासून मुलावर उत्तम संस्कार व्हावेत म्हणून हरतऱ्हेचा प्रयत्न करण्यात येईल.

या नगरीला स्वावलंबी होता यावे म्हणून औद्योगिक विभाग झटत राहील. लघुउद्योग, हस्तव्यवसाय, छापखाने, कलाकुसर, कृषिव्यवसाय दुग्धालय, मच्छीमारीकेंद्र, फळफळावळ, इत्यादी व्यवसाय इथे असतील. शेतकीतज्ज्ञांसाठी प्रयोगशाळा असेल. औद्योगिक विषयां-संबंधी संशोधन पण होत राहील. प्रत्येक कारखान्याच्या भोवती सुंदर बाग असेल.

वसाहतीच्या विभागात नवनवीन प्रयोग केले जात आहेत. आज तुम्ही तिथे गेलात तर नानाप्रकारची घरं आढळतील. झोपडीसारखी

दिसणारी ही घरं स्वयंपूर्ण, स्वच्छ, कलापूर्ण अशी आहेत. या विभागात हॉटेल्स, अतिथिनिवास, पोस्ट ऑफिस, बँक, शाळा, दुकानं, दवाखाने, नर्सिंगहोम, डेअरी, पिठाची गिरणी, फिरता दवाखाना एक ना दोन दैनंदिन जीवनात जे हवं ते सगळं असेल. वाहनांची सोय असेल. आयुर्वेद, होमियोपथी, अॅलोपथी, युनानी सर्व प्रकारची चिकित्सा करण्याची सोय असेल.

आंतरराष्ट्रीय विभागात निरनिराळ्या राष्ट्रांची दालनं राहतील. प्रत्येक देशाचे दालन त्या त्या देशाच्या संस्कृतीचे प्रतीक राहील. इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान इत्यादी राष्ट्रांतील नागरीक सामूहिक जीवन जगतील, एकोप्याने राहतील. राजकीय, सामाजिक, धार्मिक संघर्ष राहणार नाही. विविधतेत एकात्मता असे हे सोज्वळ सामूहिक जीवन असेल. त्या त्या देशातील धर्म, साहित्य, चित्रकला, वास्तुशास्त्र, हस्तकौशल्य, औद्योगिक प्रगती यांचे प्रदर्शन त्या दालनात राहील, त्या त्या देशाचं लहानसं प्रतीकच त्या दालनात असेल.

उषानगरी कुणा एकाची नाही, ते मानवतेचं मंदिर आहे. दिव्य-शक्तीवर ज्यांची श्रद्धा आहे, दिव्य जीवन जगण्याची ज्यांची धडपड आहे अशांची ही नगरी असेल. सतत उमलणारी, विकसित होणारी, ज्ञानाचं भांडार लुटणारी अशी ही नगरी असेल. उषानगरी म्हणजे भूत आणि भविष्य यांना जोडणारा सेतू असेल. उषानगरी मानवी एकीचं आदर्श प्रतीक असेल.

*

बराच वेळानं अतुलनं मान उंच करून पाहिलं. समोर सागराला भरती आली होती. पुस्तक मिटून तो खाली आला.

खाली कुणीच नव्हतं. त्याला आश्चर्य वाटलं, दीदी आपल्याला सोडून कशी गेली ! पण तिथं कुणी कुणाच्या अध्यात मध्यात नसतं, चांभार चौकशा कुणी कुणाच्या करत नाही. आपलं काम बरं आपण बरं. कामापलीकडे फार बोलणं नाही, थांबणं, रेंगाळणं नाही. अशा गोष्टींना वेळच नसतो कुणाला.

नेहमी प्रेमानं वागणारी दीदी, अनिलदा यांचा असाच अनुभव त्याला आला होता. अतुल घराकडे निघाला.

# १२

आज समीरदा येणार होता. बाबा आई आणि हेमादी पण येणार होती. अतुल गेले आठ दिवस हेच घोकत होता. सुनीतादीला, अनिलदांना वारंवार हेच सांगत होता. ही सगळीजण ज्या गेस्टहाऊसमध्ये राहणार होती ती जागा, ती खोली चार वेळा जाऊन अतुल पाहून आला होता. त्या गेस्टहाऊसवर देखरेख करणाऱ्या नयनादीला आपल्या समीरदाला तो काळा पाव देऊ नको म्हणून विनवून आला होता. त्याच्यासाठी रोज पोळ्या करायचा आग्रह केला होता. नयनादी गोड गोड हंसली होती. तिनं अतुलच्या डोक्यावर प्रेमानं थोपटलं होतं. बाबांची मात्र अतुलला काळजी होती. ते कसे वागतील कोण जाणे. नसतेच आले तर फार बरं झालं असतं, आईला मोकळेपणानं वागता आलं असतं असंही त्याच्या मनात आलं. पण अनिलदा तर बाबांबद्दलच फार उत्साहानं बोलत होते. पाँडेचरीला ते येताहेत हे फार चांगलंय असंही म्हणत

होते. सुनीतादी मात्र हेमादीबद्दल, समीरदाबद्दल कितीतरी गोष्टी विचारत होती.

सगळेजण बसमधून उतरले. समीरदा खूपच वाळला होता, काळवंडला होता. आईचा चेहरा पण ओढलेला दिसत होता. हेमादी मात्र खुषीत दिसत होती. बाबा गंभीर होते. अतुलनं एकदम पुढे होऊन समीरदाचा हात धरला. आईनं अनीलदांच्या पायांना हात लावून नमस्कार केला.

" ए गुलामा, कसला उंचनिंच झालाहेस रे." हेमादी म्हणाली.

आईनं डोळे पुसत अतुलला जवळ घेतलं. म्हणाली,

" नको ग बेटी, असं बोलूस, दृष्ट लागेल त्याला."

समीरदा गप्प होता पण अतुलकडे पाहून एकदा हसला होता. त्यामुळे अतुल खुशीत होता.

" हेमादी, ही माझी सुनीतादी." अतुल म्हणाला.

" माहीत आहे रे, सुनीची आणि माझी गेल्या जन्मीची ओळख आहे."

हेमा म्हणाली तेव्हा सगळेच हसले.

" समीर दा, ही माझी सुनीता दी. खूप छान आहे." अतुल म्हणाला. समीरनं दोन्ही हात जोडून तिला नमस्कार केला. सुनीता हळूच म्हणाली, " नमस्ते."

" चला आटपा. पुरे झाल्या ओळखी पाळखी. मुक्कामाला जाऊन पडू दे एकदाची." बाबा चिडून म्हणाले तेव्हा सगळे गप्प झाले.

टॅक्सी करून सगळे गेस्ट हाऊसवर आले. त्यांची व्यवस्था पाहून अनीलदा आणि सुनीता निघून गेली. समीर आपल्या माणसात राहिला. जाता जाता सुनीता अतुलला म्हणाली,

" ए लबाडच्या, समीरदा आला म्हणून शाळा बुडवायची नाही हं. वेळेवारी परत ये."

" ए अतुल, माझ्याबद्दल काय सांगितलं आहेस तुझ्या त्या सुनीतादीला ?" समीरनं अतुलला विचारलं.

" तू खूप छान आहेस, हुषार आहेस, मला फार आवडतोस हेच सांगितलंय." अतुल म्हणाला.

" खोटं ?" समीर म्हणाला.

" छट्, इथं आल्यापासून मी फार शहाणा झालोय. कधीच खोटं बोलत नाही, वाईट वागत नाही, आळस करत नाही. भरपूर व्यायाम करतो, पौष्टिक अन्न खातो." अतुल ऐटीत म्हणाला.

" दिसतोच आहेस कसा गुटगुटीत आणि छान."

" समीरदा, आता तू परत कलकत्त्याला जाऊच नकोस. तू आणि मी इथेच राहू." अतुल म्हणाला.

" आत्ता तर काहीच ठरवलं नाही मी. हेमा मला जबरदस्तीनं घेऊन आली नाहीतर नसतो आलो. आता ती लवकरच लग्न होऊन सासरी जाईल." समीर म्हणाला.

" दीचं लग्न ठरलंय ? मला नाही कुणी सांगितलं ?" अतुल म्हणाला.

" त्यात काय सांगायचं रे नकट्या ? मोठाच लागून गेलास की नाही ?" हेमा तिथे येत हंसत म्हणाली.

" दी मी आता खरंच शहाणा झालोय. मोठा पण झालोय."

" खरंच झाला आहेस. किती समजूतदारपणे बोलतो आहे." आई म्हणाली.

" बरं बरं आई, तू याचे फार लाड करू नकोस हं ! आधीच त्या सुनीनं त्याला लाडावून ठेवलंय." हेमा म्हणाली.

त्या नंतर ते चौघेजण खूप वेळ बोलत बसले. अतुल आश्रमाबद्दल, माँ बद्दल, खूप खूप सांगत राहिला. तिथल्या शिक्षणाबद्दल, शाळेबद्दल माहिती देत राहिला.

नयनानं त्यांच्या नाश्त्याची सोय केली. चहा, लोणी लावलेला पाव, केळं आणि जॅम होता. काळा पाव पाहून अतुलनं नयनादीकडे पाहिलं. ती फक्त हंसली.

समीरदानं तो पाव खाल्ला. अतुल चकित झाला. त्याच्या खाण्या-पिण्याच्या खूप आवडी निवडी होत्या. तो समीरदाकडे पहात रहिला.

" पाहू नकोस असा. तुरुंगात याहून वाईट अन्न खाल्लंय." समीर म्हणाला.

" पण हे अन्न मुळीच वाईट नाही. पांढऱ्या पावापेक्षा हा पाव आरोग्याला जास्त चांगला असतो." नयना म्हणाली.

" हो हो इथलं सगळंच फार छान आहे, झालं." समीर एकदम कडवटपणे म्हणाला.

सगळे गप्प होऊन गेले. शाळेची वेळ झाली म्हणून अतुल निघून गेला. गेस्ट हाऊसच्या बाहेरच त्याला अनिलदा भेटले. ते सगळ्यांना आश्रमात घेऊन जायला आले होते.

समाधीपाशी आपल्याला जो आनंद मिळाला, जे समाधान, शांती लाभली ती समीरदाला पण मिळेल का ? अतुल विचार करत राहिला.

आज त्याचं मन शाळेत रमलं नाही.

*

अरविंदांच्या समाधीचं दर्शन घेऊन सगळेजण अनिलदांच्या घरी जमले होते. अतुलची आई तर समाधीवर माथा टेकताच वेड्या-सारखी ओक्सा बोक्शी रडू लागली. बाबा बराच वेळ भान विसरून

समाधीवर माथा टेकून बसले. काहीतरी आगळं वेगळं पाहिल्यासारखा समीर थक्क झाला होता. भारावून गेला होता. हेमादी तर समाधी पासून हलायलाच तयार नव्हती. वारंवार सुनीताला म्हणत होती, " इतकी शान्त, इतकी पवित्र जागा जगात कुठे असेल असं वाटलं नव्हतं. "

आश्रमापासून घरी येईपर्यन्त कुणाला बोलावं वाटेना. प्रत्येकाच्या मनावर जणू त्या वातावरणानं, अरविंदांच्या समाधीनं जादू केली होती. ज्याची कधी कल्पना केली नव्हती असं काहीतरी मिळालं होतं. प्रत्येकजण मंत्रमुग्ध झाला होता.

" माझ्या उभ्या आयुष्यात मला एवढी मनःशांती कधी मिळाली नव्हती. डोक्यावर सतत ओझं होतं. मुलांच्या काळजीनं मी दडपून गेले होते. आता इथून मी काही परत कलकत्त्याला जाणार नाही." अतुलची आई अनिलदांना म्हणाली.

" बेटी, असंच वाटतं. इथून हलूच नये असं वाटतं. सेजदांचा तपस्वी आत्मा त्या वातावरणात वावरतोय. त्यांच्या योगाचं तेज अजूनही आश्रमात भरून राहिलंय." दा म्हणाले.

" दा, तुम्ही फार भाग्यवान आहांत." अतुलचे बाबा म्हणाले.

आपल्या नवऱ्याचं बोलणं ऐकून अतुलच्या आईचे डोळे भरून आले. वाटलं नवऱ्याचा विचित्र स्वभाव इथे येऊन निवळला, समीर मार्गाला लागला तर माझ्यासारखी भाग्यवान मीच. आता अतुलची काळजी राहिली नाही. हेमाबेटी पण लग्न होऊन सासरी जाईल.

" मला तर हा संसार नको वाटतोय. काही सुख मिळत नाही या व्यापात. सगळ्यांसाठी पैसे मिळवा आणि त्यांच्या काळज्या करा एवढंच हाती उरलंय." अतुलचे बाबा उदासपणे म्हणाले.

"बेटा, संसार कुणाला चुकलाय ? काळज्या केल्याशिवाय कुणाची सुटका झालीय. सेजदांनासुद्धा हे सगळं करावं लागलं. त्यांच्यावर-सुद्धा सांसारिक जबाबदाऱ्या होत्या. मोठा झगडा त्यांनाही द्यावा लागला. आईला वेडाचे झटके येत असत. त्यांचे आजोबा म्हणजे आईचे वडील, देशप्रेमानं भारावलेले, आपला देश, आपली माणसं यांच्यासाठी कोणताही त्याग करणारे, भारतीय परंपरेचे भोक्ते आणि भारतीय संस्कृतीची पूजा बांधणारे होते, तर त्याउलट सेजदांचे वडील इंग्रजांची संस्कृती श्रेष्ठ मानणारे. आपल्या तिन्ही मुलांना लहान वयातच त्यांनी परदेशी शिक्षणासाठी पाठवून दिलं. सेजदा तर वयाच्या पाचव्या वर्षापासून आपल्या आईपासून दूर होते. आता सांगा, केवढा झगडा लहान वयातच त्यांना द्यावा लागला. आईची माया मिळाली नाही, आजोबांचे विचार आवडंत असून वडिलांच्या मर्जीप्रमाणे वागावं लागलं." अनिलदा म्हणाले.

"त्यांचं लग्न नव्हतं झालं ?" मध्येच हेमानं विचारलं.

"झालं होतं तर. त्यांनी स्वतःच्या लग्नाची जाहिरात दिली होती. मृणालिनी देवींशी त्यांचं लग्न झालं. लग्नानंतर ते आपली बायको आणि बहीण सरोजिनी यांच्या बरोबर बडोद्याला रहात होते. पैसा फारसा मिळत नव्हता. अत्यंत सामान्य, गैरसोयीच्या घरात ते रहात होते. कशाची आसक्ती नाही, मोह नाही म्हणून या गोष्टींचा त्यांना त्रास होत नव्हता. नंतर राजकारण, तुरुंग आणि पाँडेचरीला येणं, या सगळ्या प्रवासात बायकोबरोबर राहणे फारसे झालेच नाही. म्हणजे आईला वेडाचे झटके येत म्हणून आईचं सुख नाही, बायको चांगली पण ते स्वतः देशकार्यात दंग असल्यामुळे बायकोचा सहवास मिळाला नाही. वडील गेल्यानंतर आई, धाकटी बहीण सरोजिनी आणि धाकटा भाऊ बारीन्द्र यांची जबाबदारी सेजदांवर पडली. हे

त्यांना नियमितपणे पैसे पाठवत असत. बेटा, मोठ्या माणसांना देखील आपल्यासारख्या सामान्य माणसाची दु:ख भोगावी लागतातच, अडी अडचणींना, संकटांना तोंड द्यावं लागतंच पण निराश न होता, दु:खी न होता ते त्यावर मात करून अलौकिक असं आयुष्य जगतात म्हणून तर त्यांना मोठं म्हणायचं, महात्मा म्हणायचं." अनीलदा म्हणाले.

"ते राजकारणातून योगाकडे कसे वळले ?" बाबांनी विचारलं.

"त्यांच्या एक वर्षाच्या तुरुंगवासात त्यांना श्रीकृष्णाचं दर्शन झालं. स्वामी विवेकानंदांनी त्यांना स्वप्नात येऊन मार्गदर्शन केलं. एकान्तवासात सेजदा ध्यानस्थ असत, योगसाधना करत. तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांनी उत्तरपारा इथे केलेल्या आपल्या सुप्रसिद्ध भाषणात सांगितलं की मी कोठडीत होतो असं मला वाटलंच नाही. मला चारी बाजूला श्रीकृष्ण दिसत होता. तुरुंगातली ती खोली माझं साधनेचं मंदिर झाली होती."

"दा, श्री अरविंद बडोद्याला असतानाच विष्णुपंत लेले यांनी त्यांना योगाचे प्राथमिक धडे दिले होते ना ? आणि स्वामी ब्रह्मानंदांचे शिष्य देवधर यांनी त्यांना प्राणायाम करायला शिकवलं होतं ना ?" सुनीतानं विचारलं.

"हो बेटी, खरंय ते, पण त्यावेळी देशप्रेमानं त्यांचं तरुण रक्त सळसळत होतं, भारतमातेला स्वातंत्र्य मिळावं म्हणून जीव धडपडत होता त्यामुळे त्यांनी योगसाधनेत फारसं लक्ष घातलं नाही. तुरुंगातून बाहेर आल्यावर मात्र त्यांच्या मनानं देवाच्या प्राप्तीचा ध्यास घेतला. आपल्या पुढील आयुष्यात आपलं मन राजकारणात रमणार नाही असं त्यांना वाटलं. आज ना उद्या आपला भारत स्वतंत्र होणार आहे, नक्की होणार आहे. आता आपले पुढचे कार्य काय ! तर

स्वतंत्र भारताच्या नागरिकांसाठी देवभूमी निर्माण करणे. देवजाती निर्माण होईल असे वातावरण निर्माण करणे. सेजदांच्या मनानं पाँडेचरीचा ध्यास घेतला. इथे ते आले, शेवटची चोवीस पंचवीस वर्षं योगसाधना करण्यासाठी स्वतःला दोन खोल्यात बंदिस्त करून घेतलं. त्यांना एकांत हवा होता. तो इथे त्यांना मिळाला. माँ पाँडेचरीला आली आणि तिनं आश्रमाची जबाबदारी उचलली म्हणून सेजदा शान्त मनानं आपली योगसाधना करू शकले. प्रचंड असं लिखाण करू शकले. जगातल्या सगळ्या विषयांवर त्यांनी लिहिलं. काव्य, महाकाव्य, नाटकं लिहिली. लेख तर किती लिहिले. मोजदादच नाही. आपल्या साधकांना हजारो पत्रं लिहिली. त्यात सेजदांनी त्यांना सर्व प्रकारचं मार्गदर्शन केलं." अनिलदा बोलतांना रंगून गेले होते.

"पण एकांतात जायचं, योग बिग करायचा म्हणजे स्वतःला सर्वलोकांपासून दूर करायचं, एकट्यानं जगायचं, जग खड्ड्यात का जाईना, असच ना ?"

समीर आपल्या धारदार आवाजात म्हणाला. इतका वेळ तो गप्पच होता. आश्रमात सुद्धा मुकाट उभा होता. त्याचं बोलणं ऐकून सगळ्यांना त्याचा राग आला. बाबांच्या कपाळावर अठी पडली. आईचा चेहरा आकसला. हेमा आणि सुनीता भयचकित होऊन पाहू लागल्या. सगळ्यांना वाटलं की आता अनिलदा रागावणार. पण दा रागावले नाहीत. ते हंसून म्हणाले,

"बेटा समीर, तू म्हणालास ते काही अगदी खोटं नाही. पूर्वीचे आमचे बरेच ऋषी, मुनी एकांतवासात जात. जगाच्या कटकटीपासून दूर जाऊन हठयोग करत. खडतर तपस्या करत. न खाता, पिता, शरीराला महत्त्व न देता जगत. देवाच्या प्राप्तीसाठी आकाशाकडे

डोळे लावून बसत. मुक्ती मिळावी म्हणून कठिण साधना करत. आपल्या बरोबर आपल्या भोवतालच्या माणसांची, भोवतालच्या समाजाची उन्नती करावी, त्यांच्या मुक्तीचा विचार करावा असं फारसं कुणाला वाटलंच नाही. समीर बेटा, श्री ज्ञानदेवांचं चरित्र तू वाच. त्यांनी पसायदान मागताना साधूसमाज भूतलावर अवतारावा अशी देवापाशी इच्छा व्यक्त केली आहे. त्यांनी त्या काळांत आपल्या गावी देवभक्तांची व संतांची मालिका निर्माण केली..."

"पण तुमच्या सेजदांनी काय केलं ?" अनिलदांना मध्येच अडवून समीरनं विचारलं.


"सांगतो. श्रीअरविंदांनी जग तुच्छ मानलं नाही. शरीराला कष्ट देऊन, अरण्यात जाऊन, स्वतःला समाजापासून अलग करूनच साधना होते हा विचार त्यांनी बाजूला सारला. अरे, सेजदांच्या मते सगळं आयुष्यच योग आहे. आजच्या विज्ञानयुगात विज्ञानाचा उपयोग त्यांनी आपल्या साधनेत करून घेतला. एकटयादुकटयाची उन्नति केल्यानं जगात सुख शांती निर्माण होणार नाही तर सर्व समाज त्या मार्गानं गेला पाहिजे, असं ते आग्रहानं सांगत. नवमानव वंशाच्या निर्मितीची त्यांनी कल्पना मांडली. आजच्या मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी जो साधनामार्ग आवश्यक होता तो त्यांनी दाखवून दिला. मनुष्याने सतत उद्योगात राहणे, मनात असलेला गंड बाजूला सारणे, निर्मल मनानं, बंधुभावानं राहणे आवश्यक आहे असं ते मानत. जीवन आणि जगत् याकडे पाहण्याची नवी सशक्त दृष्टी त्यांनी दिली. सामूहिक जीवनाचा त्यांनी उदोउदो केला. पण एवढयावर ते थांबले नाहीत, तर अशा या आदर्श मानवाला जगण्यासाठी आदर्श भूमी तयार करण्याची त्यांनी धडपड केली.

दिव्य जीवन जगण्यासाठी दिव्यभूमी निर्माण करण्याचं त्यांचं स्वप्न होतं. परमेश्वरशक्ती भूतलावरच का येऊ नये ? मानवानं त्यासाठी स्वर्गाचीच आशा का धरावी ? ही पृथ्वीच स्वर्गतुल्य करता आली तर ! मनुष्याला काहीही अशक्य नाही. प्रत्येकानं आपल्या चांगल्या वागणुकीनं आदर्श माणूस होण्याचं ठरवलं, सर्वार्थानं उच्च पातळी-वर जगण्याची जिद्द ठेवली आणि त्या बळावर ईश्वरी सत्ता खाली खेचून आणण्याची महत्त्वाकांक्षा ठेवली तर अखिल मानवजात सुखी होईल, असे सेजदा म्हणत. बेटा समीर प्रत्येक माणसात दैवी अंश असतो, त्याला जागृत ठेवणं, बाहेरून आलेल्या राक्षसी वृत्ती मारून टाकणं एवढं ध्येय प्रत्येकानं ठेवलं तरी अखिल विश्वाचं कल्याण साधणार आहे. ''


अनिलदांच्या बोलण्यानं सगळेच गप्प झाले. हा विचार नवा आहे, चांगलं वागणं प्रत्येकाला शक्य आहे असा विचार सगळ्यांच्या मनात घोळत होता.

"योग म्हणजे काय ?" समीरच्या आईनं हळूच विचारलं.

"एकदा एकानं श्री अरविंदांना हाच प्रश्न विचारला होता. त्यावर त्यांनी उत्तर दिलं होतं तेच सांगतो. ते म्हणाले होते, "योग ही आपणच जाणून घेण्याची गोष्ट आहे आणि ती आपोआप समजतेही. आपल्यात अनेक थर असतात त्यातील अगदी आतल्या थरा-पर्यंत जायचे, आणि त्याविषयी जागृत रहायचे, आपल्या सगळ्या वृत्ती आत वळवायच्या हाच योग." एकदा एकाने विचारले 'मी कशासाठी प्रार्थना करू ? मला देवाजवळ काहीही मागायचे नाही कारण माझ्याजवळ सगळं काही आहे. कशाचीही उणीव नाही.' त्यावर सेजदा म्हणाले, "भगवंता, खाली अवतरून पृथ्वीवर ये, अशी प्रार्थना तुला करता येईल." अनिलदा सांगत होते.



समाधी



ऑरोविल ( उषानगरी )

" पण खरोखरीच भगवान् खाली येतो ?" समीरनं विचारलं.

" हो निश्चितच. " असंच म्हणाले होते श्रीअरविंद.

अनिलदा उठले. आपल्या पुस्तकाचं कपाट उघडलं आणि जाड-जूड पुस्तकांचा गठ्ठा त्यांनी बाबांसमोर ठेवला. म्हणाले,

" आता कलकत्त्याला परत जाण्याची घाई करू नका. ही पुस्तकं वाचा. इथल्या वातावरणात रहा, इथल्या राहणीची ओळख करून घ्या. सेजदांची विचारसरणी जाणून घ्या. हे बघा, हे ' सावित्री ' हे महाकाव्य आहे. यात त्यांनी पुराणातल्या सत्यवान - सावित्री आख्यानाचा उपयोग आपलं तत्त्वज्ञान मांडण्यासाठी केलाय. हे दोन ग्रंथ ' दिव्य जीवन ' नावाचे. यात दिव्य जीवनाची कल्पना मांडलीय. झालं तर हे पुस्तक ' भावी कविता ' यात भविष्यकालीन कविते-संबंधी त्यांनी खूपच आशावादी विचार मांडलेत. हे बघा ' गीतेवरील निबंध, 'भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ ', ही त्यांनी लिहिलेली नाटकं, कविता...एक ना दोन ! वाचाल तितकं थोडं आहे, ज्ञान मिळवाल तितकं कमीच पडेल. शिवाय त्यांचा पत्रव्यवहार, त्यांच्या-वर लोकांनी लिहिलेली पुस्तकं, जन्मभर वाचत रहाल तरी संपणार नाही. आनंदाला तोटा राहणार नाही... समीर, आता हे कपाट तुमचं सगळ्यांचंच. जमेल तितकं वाचा. आधी कळणार नाही, अवघड वाटेल, वाचायचा कंटाळा येईल पण चिकाटी ठेवली की अवघड वाटणारा अर्थ सहज कळत जातो. एखादं फूल आपोआप उमलत जावं असा तो अर्थ मनात उलगडत जातो. " अनिलदा तल्लीन होऊन बोलत होते.

" दा, किचनमध्ये जायची वेळ झाली. चलायचं ना ? " सुनीता म्हणाली.

"हो बेटा. माझ्या बडबडीत पाहुणे उपाशीच रहायचे. चला."

अनिलदा उठल्यावर सगळेच उठले. दां नी श्रीमाँ आणि श्री-अरविंद यांच्या फोटोसमोर उदबत्ती लावली, दोन ताजी फुलं वाहून नमस्कार केला.

सगळ्यांनीच माथा नमवला.

समीर हातांची घडी घालून त्या दोन्ही तसबीरींकडे टक लावून पहात होता.

# १३

सुनीता, हेमा आणि समीर यांची चांगली गट्टी जमली होती. अतुलची त्यांच्यात लुडबूड चालू होतीच. शाळा बुडवून त्यांच्याबरोबर हिंडण्याची अतुलची इच्छा होती पण दा नी शाळा बुडवायची नाही म्हणून सक्त ताकीद दिल्यामुळे बिचारा शाळेत जात होता.

समीर हळूहळू मोकळेपणानं बोलू लागला होता. सुनीताच्या आपलेपणाच्या वागणुकीनं त्याच्या मनातील कडवटपणा कमी झाला होता. हेमा पण सुनीतामुळे त्याच्याशी जास्त मायेनं वागत होती. दोघींपैकी कुणीही समीरला त्याच्या तुरुंगाबद्दल विचारलं नाही किंवा तो वाईट वागला, दुष्ट लोकांच्या नादी लागला असंही कुणी म्हणालं नाही. आश्चर्य म्हणजे बाबा, आई किंवा दा कुणीच त्याला चांगलं वागण्याचा उपदेश केला नाही, त्यामुळे समीरचा चिडकेपणा कमी झाला, त्याला आपल्या माणसांबद्दल आधार वाटू लागला.

तुरुंगातील हाल अपेष्टांमुळे समीरला शहाणपणा आला होता. त्याची चूक त्याला कळून आली होती. त्याच्यावर खटला चालू असताना किंवा शिक्षा ठोठावल्यानंतर कुणीही त्याच्या मदतीला आलं नव्हतं. कुणीही त्याच्या बचावासाठी प्रयत्न केले नव्हते उलट आपल्या नक्षलवादी संघटनेबद्दल काही माहिती दिलीस तर तुझा जीव घेण्यात येईल अशी जरब त्याला देण्यात आली होती. त्यामुळे समीरला तुरुंगात खूप छळ सोसावा लागला होता. काबाडकष्ट करावे लागले होते. समीर पाँडेचरीला आला तेव्हा आपल्या आयुष्याला कंटाळलेला होता. तरुण वयातच वाईट अनुभव आल्यामुळे तो थकून गेला होता. साऱ्या जगावर चिडला होता. इथे आल्यावर सगळ्यांच्या प्रेमळ वागणुकीमुळे तो हळूहळू हसू, बोलू लागला होता, मिळू मिसळू लागला होता. हाताला येईल ते वाचत होता. माँ विषयी, अरविंदा विषयी नित्य नव्या गोष्टी ऐकत होता. त्यांच्या मोठेपणा विषयी त्याची खात्री पटू लागली होती. कित्येक साधकांचे अनुभव तो ऐकत होता, प्रत्येकाची साधी राहणी, कामसू वृत्ती आणि माँ विषयी अपार श्रद्धा पाहून तो चकित झाला होता. ही आश्रमातली माणसं फुलांवर प्रेम करताहेत, मुलांच्या आरोग्याविषयी, व्यायामाविषयी ते विलक्षण जागरूक आहेत. मुलं, मुली मोकळेपणानं वागताहेत, बरोबर खेळताहेत, हिंडताहेत, शिकताहेत...कुठे शंका नाही, वाईट दृष्टी नाही, रागवा रागवी नाही. समीरला वाटलं ही सुनीता म्हणूनच किती मोकळेपणानं, किती अकृत्रिम स्नेहानं वागते आपल्याशी.

समीरच्या हातात एक पुस्तक होतं. अरविंदांच्या क्रांतिकारी जीवनाची माहिती वाचायला तो जास्त उत्सुक होता. देशाच्या मुक्ततेसाठी या क्रांतिकारी लोकांनी इंग्रजांवर बॉम्ब टाकले होते,

गाड्यांचे रूळ उखडले होते. जाळपोळ केली होती, सरकारी मालमत्तेचं नुकसान केलं होतं. भारतीयांचा छळ होत होता, त्यांची मालमत्ता लुटली जात होती, निर्दयपणे त्यांना मारझोड होत होती, तरुण मुलांना फासावर लटकवण्यात येत होतं, असहाय, नि:शस्त्र गरीब लोकांवर दुष्टपणे गोळीबार करण्यात येत होता. साहजिकच अन्यायाला विरोध करायला, त्याविरुद्ध आपला आवाज उठवायला हे क्रांतिकारक सज्ज होत होते, जिवाची पर्वा न करता परकीय सत्तेला धडक देत होते.

समीर वाचत होता. अरविंदांचे सहकारी चारुचंद्र दत्त यांनी आपल्या आठवणीत लिहिलं होतं....

१९०७ सालातील गोष्ट. एका तरुण क्रांतिकारकाच्या गैर-वर्तणुकीची तक्रार अरविंदांच्या कानावर आली. मी त्यावेळी कलकत्त्यातच होतो. नेहमीच्या रिवाजाप्रमाणे अशावेळी काय शासन करायचे ते आम्ही ठरवून त्यांच्या कानावर घालीत असू. पण यावेळी या क्रांतिकारकाच्या चौकशीत त्यांनी स्वत: लक्ष घालून त्या तरुणाला कडक शिक्षा फर्मावली. त्याप्रमाणे मला आदेश देण्यात आला. मी म्हणालो,

" तुम्ही सांगितल्याप्रमाणे शिक्षेची तत्काल अंमलबजावणी केली जाईल." मी तसे आश्वासन दिले खरे, पण त्या क्रांतिकारकाच्या अपराधाबद्दल माझी स्वत:चीच खात्री झाली नव्हती. पण मी हुकमाचा ताबेदार होतो. शिस्त पाळणं आवश्यक होतं. त्यामुळे मी शिक्षेच्या अंमलबजावणीस सुरुवात केली. दुसऱ्या दिवशी अरविंद अस्वस्थ दिसले. त्यांच्या वागण्या-बोलण्यात, त्यांच्या उदास मनाची छाया दिसत होती. मी विचारलं,

" का, प्रकृती बरी नाही ? "

" चारु, मी कालचा निर्णय घेण्यात घाई केली का ? तू त्याबद्दल मला बोलला नाहीस, " अरविंद म्हणाले. ते खूपच गंभीर झाले होते.

" तुमच्या शब्दाबाहेर आम्ही जातो का कधी ? " मी म्हणालो. मग मी चट्कन उठलो आणि " हुकमाची अंमलबजावणी कोठपर्यंत झाली आहे ते पाहतो. " असं म्हणत म्हणत बाहेर गेलो. सुदैवानं फारसा उशीर झाला नव्हता. पूर्वीचा आदेश मागे घेण्यात आला. अशा रीतीनं त्यांचा दयाभाव न्यायाच्या कठोरपणाची तीव्रता कमी करत असे.

समीर त्या पुस्तकात रमून गेला होता. क्रांतिकारी, चळवळच्या जीवनाची दुसरी बाजू त्याला कळत होती. त्यांचा त्याग, त्यांची शिस्त, झोकून देण्याची तयारी, देशासाठी त्यांची तळमळ सगळं वाचून समीरला आपल्या वागणुकीचा पश्चात्ताप होत होता. आपण आजवर चुकीच्या मार्गानं जात राहिलो याची खंत त्याच्या मनाला लागून राहिली होती.

*

समीर माँचं दर्शन घेऊन आला होता. माँनं त्याला भेटायला परवानगी दिली याचंच सगळ्यांना मोठं समाधान होतं. समीरची आणि माँची भेट बराचवेळ झाली होती. माँच्या अत्यंत समंजस हसण्यानं समीरला धीर आला होता. माँनं त्याच्या डोळ्यांत आपली तेजस्वी नजर रोखली तेव्हा त्याला वाटलं, या बाईंना आता काही सांगायचं राहिलं नाही. त्यांना आपल्या मनातला सगळा गोंधळ कळला आहे, आपल्या जिवाची घालमेल उमगली आहे. माँनं

समीरच्या डोक्यावर हात ठेवला तेव्हां त्याच्या अंगभर जणू वीज खेळून गेली. शरीरातली नस नि नस थरारून उठली. माँनं त्याच्या खांद्यावर थोपटलं तेव्हा समीरनं भान विसरून माँच्या पायांना मिठी घातली. तो ढसाढसा रडू लागला. गेली काही वर्षं मनावर असलेला ताण सैल झाला होता.

त्याला आनंद झाला होता आणि त्याला आपल्या गतजीवनाचा पश्चात्ताप पण झाला होता. तो रडत होता आनंदानं, कारण त्याला मनोमनी जाणवत होतं, आपला पुनर्जन्म झालाय. आपल्या मनातला सगळा गोंधळ संपलाय. आपल्या मनावरचं मणामणाचं ओझं माँनं सहज उचलून घेतलंय.

कितीतरी वर्षांनी समीर रडला होता. आनंदानं रडला होता.

आपल्या समीरदाकडे पाहून अतुलचा आनंद मनात मावत नव्हता. त्याला वाटत होतं सारखं गात रहावं, नाचत रहावं, धमाल करावी, मजा करावी. सुनीता दी म्हणाली तसंच झालं होतं. माँनं समीरदाला आशीर्वाद दिला होता. समीरदा पाँडेचरीत रमला होता. तो खूपच निवळला होता. सगळ्यांना आवडू लागला होता. शाळेतून आल्या-नंतर अतुल आपल्या भावाबरोबर समुद्रावर जात होता. अथांग समुद्राकडे पहात अतुल समीरला कितीतरी गंमती सांगत होता. सुनीता दी कशी छान आहे हे सांगत होता. समीरदानं आता इथंच रहावं म्हणून आग्रह करत होता. बहनजीला भेटून त्यांच्याशी बोलण्यासाठी गळ घालत होता. वारंवार म्हणत होता,

" दा, सुनीतादी खूप छान आहे, बहनजी फार हुषार आहेत. त्या म्हणाल्या माँ नं समीरदाला आशीर्वाद दिलाय. आता त्याचं कुणीच काही वाकडं करू शकणार नाही. दा, तू इथल्याच कॉलेजात शीक. राहशील ना इथेच तू ?"

" हूं. " एवढंच म्हणाला समीर.

" असं रे काय ? बोल की मी किती बोलतोय ? "

" तू चांगला मुलगा आहेस. मला खूप आवडतोस. " समीर म्हणाला आणि गप्प झाला. अतुल आपल्या दाच्या हातात हात घालून चालू लागला.

" दा, श्रीअरविंद पण लहानपणी हट्टी होते बरं का ? पण पुढे हाच हट्टीपणा करारीपणात बदलला. "

" असं ? " समीर हंसून म्हणाला. आपला धाकटा भाऊ आपल्याला बोलकं करायला धडपडतोय हे त्याला कळत होतं पण भडाभडा बोलायची सवयच मोडली होती.

" दा, मी तुला एक गोष्ट सांगू का ? "

" हो जरूर. सांग की. "

" एकदा अरविंदांच्या मामानं त्यांच्यापुढे आरसा धरून म्हटलं, हे पहा छोटंसं माकड. "

" मग तुझे अरविंद काय म्हणाले ? " समीरनं विचारलं.

" तेव्हा ते लहान होते. माझ्याहून लहान पण काय उत्तर दिलं माहीत आहे ? "

" काय ? "

" त्यांनी तोच आरसा आपल्या मामा पुढे धरला आणि म्हणाले, हे पहा मोठं माकड. " अतुल खो खो हसत म्हणाला. समीर पण हसला. अतुल खूष झाला.

" अरे दा, सेजदांची स्मरणशक्ती इतकी दांडगी होती की विचारू नकोस ...... "

" हं . "

" नुसतं हं काय म्हणतोस रे ! "

" मग काय त्यांच्या स्मरणशक्तीची पण गोष्ट सांगणार आहेस का ? " समीरनं विचारलं.

" हो. पण खरी खरी आहे हं ही गोष्ट. सांगू ? "

" सांग. "

" अरे सेजदांना खेळबिळ आवडत नसत. पत्ते, बुद्धिबळ कशातच त्यांचं मन रमत नसे. इंग्लंडला असताना एकदा क्रिकेट खेळायला गेले तर कंटाळून परत आले. त्यांत त्यांना काहीच गोडी वाटली नाही. " अतुल म्हणाला.

" अरे, पण तू त्यांच्या स्मरणशक्तीची गोष्ट सांगतोहेस ना ? "

" हो हो, तीच तर सांगणार आहे. ही की नाही थोडीशी बॅक ग्राउंड सांगितली. "

अतुलनं ते वाक्य अशा काही थाटात उच्चारलं की त्याच्या त्या अभिनयानं समीर दिलखुलास हसला. म्हणाला,

" काय रे गुलामा, नाटकाबिटकात काम करतोस की काय ? "

" मग ! यंदा गॅदरिंगमध्ये बक्षीस मिळवलंय. नाटकात पण आणि गाण्यात पण. " अतुल म्हणाला.

" अरे वा शाबास. बरं तुझी ती सेजदांची गोष्ट...... "

"हो हो, एकदा काय झालं सेजदा कॉलेजमधून घरी आले. त्यांच्या खोलीत त्यांचे मित्र पत्ते खेळत होते. आरडाओरडा चालू होता, गप्पा, हंसणं, खिदळणं चालू होतं. चहा झाल्यावर सेजदांनी बाजूला पडलेलं पुस्तक उचललं. त्या गोंधळातही ते पुस्तक वाचत राहिले. अर्ध्या तासात त्यांनी ते पुस्तक वाचून संपवलं. एका मित्रानं विचारलं,

" संपवलं पुस्तक ? "

" हो. " सेजदा म्हणाले.

मित्रांचा विश्वास बसेना. इतक्या गडबडीत वाचलं तेव्हा लक्षात राहणार नाही असं त्यांना वाटलं. एकानं एक पान उघडत विचारलं, " घेऊ परीक्षा ? मी एक ओळ वाचेन त्यापुढचा मजकूर सांगणार ? " सेजदा पट्कन कबूल झाले. त्या मित्रानं एक ओळ वाचली. आश्चर्य म्हणजे त्यापुढचा मजकूर सेजदांनी बरोबर सांगितला. आहे की नाही गंमत ?

" खरंच गंमत आहे. मी पण त्यांच्या एकाग्रचित्ताच्या बऱ्याच गोष्टी वाचल्या आहेत. अनेक भाषांतील अनेक पुस्तकं ते वाचत. वाचण्याचं त्यांना वेडच होतं पण त्यांच्या स्मरणशक्तीनं त्यांना कधी दगा दिला नाही. " समीर म्हणाला.

" दा, तू तुरुंगात होतास ? " एकदम अतुलनं विचारलं.

" हो. "

" का ? "

" सांगीन कधीतरी. "

" तुला तिथे छळलं ? मारलं ? "

" तू मोठा झालास की माझी सगळी कहाणी सांगीन तुला. आत्ता नको. " समीर म्हणाला.

" का ? सांग की. " अतुलनं आग्रह केला.

" नको भैय्या, मला सगळं विसरून जायचंय. आठवलं की मला फार त्रास होतो. "

आपल्या समीरदाचा रडवा आवाज ऐकून अतुल गप्प झाला.

अंधार पडला होता. दोघं घराकडे परतले. समीरनं वळून पाहिलं. आकाशात पूर्ण चंद्र होता. लालभडक दिसत होता. जणू चंद्रावर होळी पेटली होती. त्यानं आणि त्याच्या साथीदारांनी निरपराध लोकांची घरं लुटली होती, जाळली होती तेव्हा अशीच होळी पेटली होती, समीरनं खाली मान घातली.

# १४

रात्रीचे दोन वाजले होते. सगळी-कडे शांत होतं. आश्रमातील प्रत्येकजण आनंदात झोपी गेला होता. उद्या चोवीस नोव्हेंबर म्हणजे श्रीअरविंदांचा सिद्धिदिन. २४ नोव्हेंबर १९२६ साली अरविंद एकांतवासात गेले. त्यांनी स्वत:ला दोन खोल्यांत बंदिस्त करून घेतलं. लोकांना भेटणं, बोलणं सोडलं. योग ध्यानधारणा, आणि लेखन यांत ते दिवस रात्र घालवू लागले. माताजी-वर आश्रमाचा सगळा भार टाकून ते आपल्या साधनेत मग्न झाले. हे १९३८ साल. म्हणजे त्यांना एकान्तवासात जाऊन बारा वर्षं झाली. उद्या सिद्धिदिनानिमित्त श्रीअरविंदांचं दर्शन होणार. प्रत्येकजण आनंदात होता. प्रत्येकाच्या मनात उत्साह भरून राहिला होता. एकांतवासात गेल्यापासून वर्षातून चार वेळा अरविंदांचं दर्शन घडत होतं म्हणूनच उद्याचा दिवस उत्सवाचा दिवस होता.

माडीवरच्या कोपऱ्यातल्या श्रीअरविंदांच्या खोलीत दिवा जळत

होता. वाचन, लेखन चालू होते. दोन वरचा काटा पुढे सरकला होता. दोन वाजून पंचवीस मिनिटं झाली होती तोच श्रीअरविंदांच्या खोलीतून काहीतरी पडल्याचा आवाज आला. त्या शांत वातावरणात तो आवाज केवढ्यानं घुमला. पुराणी माताजींच्या अंघोळीसाठी पाणी तापवत होता. तो धावतच अरविंदांच्या खोलीपाशी आला. ते बाथरूमच्या दाराशी पडले होते. माताजी आधीच येऊन पोहचल्या होत्या. डॉक्टर आले. तपासलं. श्रीअरविंदांच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झालं होतं. या अपघाताची वातमी वाऱ्यासारखी पसरली. साधक दु:खी, कष्टी झाले. देशातल्या निरनिराळ्या भागातून लोक दर्शनासाठी आले होते, सगळे निराश होऊन परतले. आश्रमातला उत्साह मावळला, हे दुखणं बराच काळ घेणारं होतं. श्रीअरविंदांचा एकांतवास या अपघातानं संपला होता. त्यांच्या सेवेसाठी डॉक्टरांची आणि काही साधकांची नेमणूक झाली.

*

वाचता वाचता हेमा थांबली. विचार करत राहिली, अडतीस साली अपघात झाला आणि पन्नास साली श्रीअरविंद गेले. म्हणजे बारा वर्षांनंतर त्यांनी महासमाधी घेतली.

अनिलदा लिहीत बसले होते तिथे हेमा आली. मुकाट्यानं त्यांच्या जवळ बसली.

"काय बेटी ?"

"काही नाही. काय लिहिताय ?" हेमानं विचारलं.

"असंच काहीतरी खरडतोय..."

"तरीपण ..."

"खूप अनुभव गोळा केलेत. आठवतील तसे लिहून ठेवतो." दा म्हणाले.

" चांगले, वाईट खूप अनुभव आले असतील नाही ? "

" सेजदा होते तो पर्यन्त त्यांच्या सावलीखाली जगलो. ते गेल्यावर माँ नं माया दिली.आम्ही सगळेच माँ च्या आश्रयाखाली आजवर जगत आहोत. माँ इथं आल्यावर तिलाही काही कमी त्रास झाला नाही. एक परदेशी बाई म्हणून नाना शंका कुशंका घेण्यात आल्या, माँ बद्दल राग व्यक्त करण्यात आला. सेजदांनी आपल्या घरात माँ ला रहायला बोलावलं म्हणून त्यांच्यावर लोक रागावले. नाराजी व्यक्त करण्यात आली. या सगळ्यामागे एकच गोष्ट होती ती म्हणजे सेजदांबरोबर आलेली लोक राष्ट्रप्रेमानं भारावलेली होती. त्यांना कुणाही परदेशी माणसाबद्दल आपलेपणा वाटणं शक्यच नव्हतं पण सेजदांनी माँ मधील मोठेपणा, तिच्यातील दैवी शक्ति ओळखली होती. आपल्या ध्येयसिद्धिसाठी माँ चं इथे येणं, राहणं अत्यावश्यक आहे, हे त्यांनी आपल्या अंतर्दृष्टीनं ओळखलं होतं. अग हेमा बेटी, ही मोठी माणसं म्हणूनच आपल्यापेक्षा निराळी म्हणायची. श्रेष्ठ मानायची. कवी रवींद्रनाथ टागोरांना सुद्धा माँ चं आगळेपण कळलं होतं. माँ इकडे भारतात येण्यापूर्वी जपानला रवीन्द्रांची आणि माँ ची गांठ पडल्यावर त्यांनी तिला आपल्या विश्वभारतीच्या कामात मदत करण्यासाठी विनंती केली होती. पण त्यावेळी माँ इकडे आल्या नाहीत. माँ इथे आल्यावर साडी नेसू लागल्या. कित्येकदा त्यांच्या पांढऱ्या पातळावर ठिगळं लावलेली असायची. बेटा, माँ एका श्रीमंताची मुलगी, एका अधिकाऱ्याची बायको पण या वातावरणाशी, परिस्थितीशी कशी एकरूप झाली पाहिलंस ना ?

सेजदा एकाएकी इकडे निघून आले, त्यांनी राष्ट्रकार्यातून अंग काढून घेतलं म्हणूनही त्यांच्यावर काही कमी टीका झाली नाही. बेटी, मोठेपण सुखासुखी कुणालाच मिळत नाही. त्रास, अपमान,

कष्ट थोर माणसांनाही झेलावे लागतातच. अरविंदांसारखा कळ-कळीचा थोर नेता आपल्यातून गेला म्हणून त्यावेळच्या पुढाऱ्यांना अर्थातच वाईट वाटलं. चित्तरंजन दास, लोकमान्य टिळक, बॅरिस्टर बाप्टिस्टा, महात्मा गांधी, रवीन्द्रनाथ कितीतरी थोरामोठ्यांनी अरविंदांनी परत भारतात यावं, राजकारणाची सूत्रं हातात घ्यावी म्हणून प्रयत्न केले. पण एका विशिष्ट ध्येयानं प्रेरित होऊन सेजदा इकडं आले होते ते परत गेले नाहीत. इथे काही मोठे सुखाचे दिवस जात नव्हते. अन्न, वस्त्र, निवारा सगळ्यांचीच चणचण होती. चार माणसं बरोबर आली होती. त्यांची सगळी जबाबदारी सेजदांवरच होती. पण हातात पैसा नसायचा. एकदा तर जवळ फक्त आठ आणे होते. चंद्रनगरहून मोतीबाबू मदत पाठवत, पैसे, कपडे पाठवत पण तेही वेळेवर मिळत नसत. ब्रिटिश सरकार त्याबाबत हस्तक्षेप करतय असा संशय यायचा. अग हेमाबेटी, या काळात दोन प्रसंग असे घडले की त्यावरून सेजदांचीच काय आमचीसुद्धा खात्री झाली की ब्रिटिशांनी सेजदांना आपल्या जाळ्यात अडकविण्यासाठी पाँडेचरीत हेरांचं जाळं पसरविलंय."

"काय घडलं सांगा न दा," हेमानं आग्रह केला.

"सांगतो. आत्ता अतुल इथे असता तर त्याला पण खूप गंमत वाटली असती ऐकून." दा म्हणाले.

"खरंच दा, अतुल इथे आल्यापासून किती छान वागायला लागलाय. आई तर सारखी म्हणत असते, सख्खे मामंजी गेले पण अनिलदांच्या रूपात माझे वडीलच मला भेटलेत. समीरदा पण असाच मार्गाला लागला की आईची सगळीच काळजी मिटेल."हेमा म्हणाली.

"आईला म्हणावं आता समीरची मुळीच काळजी करू नकोस. मांनं त्याला आशीर्वाद दिलाय. तिनं त्याचा स्वीकार केलाय याचाच

अर्थ तो चांगला वागणार आहे. वाईट आचार, विचार सोडून देणा
आहे."

"खरंय दा, गेले दोन महिने आम्ही इथे आहोत ना खूप शा
झालाय समीरदा. मुख्य म्हणजे इथं सगळेच त्याच्याशी छान वाग
हेत. त्याच्या अपराधांची जाणीव त्याला कुणीच करून देत नाही."

"बेटी, या वातावरणाचा परिणामच असा आहे."

"दा, ते दोन प्रसंग सांगणार होता ना!"

"आमचा त्यावेळचा संसार मोठा धकाधकीचा होता. सेजदा बरोबर आलेली माणसं आळीपाळीनं स्वयंपाक करत. मी त्यांच्या हाताखाली काम करायचो. जेवणघर, स्वयंपाकघर एकच, टॉवेल पण एकच. श्री अरविंद सगळ्यात शेवटी अंघोळ करत. भात, भाजी, सांबार हे आमचं जेवण होतं. एकच कॅंपकॉट होती. दोनच दिवे होते. आम्ही चटईवर झोपत असू. एक दिवा आमच्यासाठी, एक दिवा सेजदांच्या लेखनकामासाठी. सेजदा अशावेळीही शान्त असत. त्यांना खाण्या-पिण्याचा, कपडयालत्त्याचा कशाचाच सोस नव्हता. मौज, मजा करण्याचा हव्यास नव्हता. त्यासाठी वेळ नव्हता. पैसा पण नव्हता.

अशातच फ्रेंच वसाहतीत रहात असलेल्या क्रांतिकारकांना पकडण्यासाठी ब्रिटिशसत्ता धडपडत होती. त्यावेळी बरेच क्रांति-कारक देशभक्त पाँडेचरीला येऊन राहिले होते. सुब्रह्मण्यम् भारती हे देशभक्त कवी, श्रीनिवासचारी, नागस्वामी, अय्यर, अरविंद अशी बडी बडी मंडळी ब्रिटिशांच्या दृष्टीनं धोकादायक होती. या लोकांवर सरळसरळ राजद्रोहाचा आरोप करता येईल अशी काही कागदपत्रं अय्यर यांच्या विहिरीत टिनच्या डब्यात बंद करून टाकण्यात आली. या कामी ब्रिटिश सरकारनं मयूरसेन नावाच्या माणसाची नेमणूक केली होती.

पण हा सगळा बेबनाव मोठ्या मजेदार पद्धतीनं उघडकीला आला. अय्यर यांची मोलकरीण विहिंरीचं पाणी भरायला गेली. बादली ओढताना त्यात खोटी कागदपत्रं असलेला डबा पण वर आला. तिनं तो डबा आपल्या मालकाला दिला. सेजदांच्या सल्ल्यानं तो फ्रेंच पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला. त्यांत बनावट कागदपत्रं सापडली. एका बंगाली वर्तमानपत्रावर 'काली' चं चित्र होतं. नंदोत नावाचे मॅजिस्ट्रेट आमच्या घरी आले. पण काही पुरावा सापडला नाही. तपासणीच्या वेळी काही कागद ग्रीक भाषेत लिहिलेले पाहून तो मॅजिस्ट्रेट चकित झाला. अरविंदांनीच ते लिहिले असून त्यांना लॅटिन सुद्धा येतंय् हे कळताच त्याला त्यांच्याबद्दल आदर वाटला. खोटच्या गोष्टी केल्याबद्दल मयूरसेनला समज देण्यात आली. तो बिचारा या लोकांना पकडायला जाळं टाकायला आला होता पण त्यालाच पळ काढावा लागला."

"अगबाई! मजाच झाली म्हणायची नाही!" हेमा म्हणाली.

"आत्ता मजा वाटतेय पण त्यावेळी धरपकड झाली असती तर ग...कल्पनाच करवत नाही. बेटी, हा प्रसंग तर काहीच नाही. एकदा तर ब्रिटिश सरकारचा हेर आमच्यातच रहात होता, कित्येक दिवस होता, पण तो प्रकार पण मोठा नाटचमय पद्धतीनं उघडकीला आला."

"सांगा ना दा."

"सांगा म्हणे. चांगला लिहीत बसलो होतो तर तू आलीस आणि गप्पा मारत बसलो वेडचासारखा. जा पळ, काम करू दे मला." दा म्हणाले.

"असं हो काय करता दा! आणि तुम्हीच तर आम्हाला गेस्ट हाउस मधून घरी घेऊन आला. पुढे मी परत येणार आहे वाटतं तुमचा वेळ घ्यायला? सांगा न" हेमा रुसून म्हणाली.

"का नाही येणार ग ? लग्न झाल्यावर मला म्हाताऱ्याला भेटायला नाही येणार ? जावईबापू कसे आहेत हे मला नाही दाखवणार ? माँ च्या पाया पडायला येणार नाहीस ? "

" असं नाही हो दा ..."

" मग कसं ग बेटी ... ? " दा हसत म्हणाले.

" सांगा ना दा, प्लीज ... "

" बरं बरं नाटकं नको करूस. तू तरी काय त्या लबाड अतुलचीच बहीण. ऐक. खुलन्याचे नगेंद्र कुमार नाग क्षयानं आजारी होते. समुद्रकाठी हवाबदल करण्यासाठी ते पाँडीला येणार होते. थंड हवेच्या ठिकाणी त्यांना बरं वाटलं नव्हतं. शिवाय अरविंदांचे विचार पण त्यांना जाणून घ्यायचे होते. नगेंद्र आले, त्याच्या बरोबर आम्हांला मदत म्हणून पैसा पण आला. मोठं घर घेण्यात आलं. तिथे चांगला उजेड होता, भरपूर दारं खिडक्या होत्या. नगेंद्र आपल्या बरोबर एक नोकर घेऊन आले. त्याचं नांव होतं वीरेंद्रनाथ रॉय. तो बंगाली होता. तो स्वयंपाक करत असे. आमच्यात तो मिळून मिसळून गेला. सगळ्यांवर तो देखरेख करत असे. जनरल मॅनेजरच झाला तो. एक दिवस आम्ही सगळे चकित झालो. पाहतो तर वीरेंद्रच्या डोक्यावर एकही केस नाही. तो गोटा करून आला होता. आमच्या पैकी मोनी म्हणजे सुरेश चक्रवर्ती व्यवस्थित राहणी, ठाकठीक कपडे, ऐटी यामुळे विशेष ओळखला जाई. त्याच्याकडे पाहिल्यावर मन प्रसन्न होत असे. तर अशा थाटात राहणाऱ्या मोनीनं वीरेंद्रप्रमाणे डोक्याचा गोटा करून घेतला. हे सगळं सहज गंमतीनं घडलं पण परिणाम विलक्षण झाला. वीरेंद्रनाथ रॉय हा बंगाल सरकारचा हेर होता. नगेंद्रनाग यांच्याकडे तो नोकर म्हणून राहिला आणि इकडे आला. त्याला येऊन आठ एक महिने झाले होते, आमची सर्व माहिती कळली होती.

बंगालच्या पोलिसांनी त्याला आता परत बोलावले होते आणि त्याच्याऐवजी दुसरा माणूस इकडे पाठविण्याचे ठरवले होते. पण इथे तर सगळेच बंगाली, तो माणूस वीरेन्द्रला कसा ओळखणार ! त्या दोघांची भेट एका हॉटेलात ठरली होती. वीरेन्द्रनं आपल्या डोक्याचे केस काढायचे म्हणजे त्याला ओळखणं सोपं जाईल, असा बेत ठरला. पण मोनीनं नेमकं तेच केल्यानं वीरेन्द्रला वाटलं, या क्रांतिकारक देशभक्तांनी आपला डाव ओळखला असावा. तो हेर आहे हे त्यांना नक्की कळलं असावं. बिचारा वीरेन्द्र घाबरला. त्याला वाटलं आता आपली धडगत नाही. ही लोक आता आपला छळ करणार, आपला खून करणार अशी भीती त्याला वाटली. तो पाँडी सोडण्याच्या गोष्टी करू लागला. मोनी म्हणाला, " हात्तिच्या जा की, नगेनदाची काळजी आम्ही घेऊ." मोनी सहज बोलला पण वीरेन्द्रला वाटलं हा आपली परीक्षा घेतोय. शेवटी तो बिचारा इतका घाबरला की सेजदांच्या पाया पडत म्हणाला, " मी सी. आय्. डी. चा मनुष्य आहे." आम्ही सगळे खो खो हसतच सुटलो. कुणाचाच विश्वास बसेना. शेवटी त्यानं पन्नास रुपये आणून दाखवले, या कामाबद्दल मिळाले असं म्हणाला. आणि रडू लागला. वातावरण बदललं. सगळे गंभीर झाले. त्यानंतर वीरेन्द्र काही दिवस आमच्यातच राहिला. पण तो घाबरला होता. झोपताना खोलीचं दार बंद करून झोपू लागला. त्याला वाटायचं हे क्रांतिकारी रात्री आपल्याला गोळी घालून मारतील. शेवटी तो बंगालमध्ये गेला. तिथून पहिल्या महायुद्धात मेसोपोटेमिया इथे सैन्यात दाखल झाला. हेतू हाच की त्यामुळे कुणा क्रांतिकारकाच्या तावडीत आपण सापडू नये." बोलता बोलता दा थांबले.

"थांबू नका दा, बोलत रहा. ऐकत रहावंसं वाटतं." हेमा म्हणाली.

" तो अतुल पण असाच तुझ्यासारखा... "

" दा, अतुल रमलेला दिसतोय इथे. " हेमा म्हणाली.

" हो. जरा हट्टी आहे. मधूनच डोकं फिरतं पण हुषारही तसाच आहे. हल्ली स्वारी कोणत्या नादात आहे माहित आहे ? "

" नाही. "

" बोट तयार करण्याचा ध्यास घेतलाय. त्याच खटपटीत असतो."

" अगबाई ! त्याला काय जमणार आहे ते ? "

" जमेल, जरूर जमेल. त्याचे शिक्षक त्याला मदत करताहेत. "

" दा, श्रीअरविंद गेले तेव्हा तुम्ही होता त्यांच्याजवळ ? "

" का ग बेटी, एकदम हा प्रश्न विचारलास ? "

" आत्ताच त्यांच्या अपघाताविषयी वाचत होते, म्हणून आठवलं." हेमा म्हणाली.

" होतो. ते दिव्य मरण या डोळ्यांनी पाहिलंय. "

" कशानं गेले सेजदा ? " हेमानं विचारलं.

" त्यांना मूत्रविकाराचा आजार झाला होता. बेटा, सुख दुःख समभावानं घ्यावं, जे भोगायला लागतं ते शान्तपणे सोसावं, गीतेतला हा विचार आपण नुसता वाचतो, ऐकतो पण सेजदा आणि माँ यांची वागणूक पाहिली की या शब्दांचा खरा अर्थ कळतो. सेजदांना अपघात झाला तेव्हा आमच्या तोंडचं पाणी पळालं. डॉक्टरांची धावपळ सुरू झाली पण सेजदा मात्र आपले शांत. सहा महिने अंथरुणावर पडून होते. माँ स्वतः त्यांचं पथ्य-पाणी पहात होती. एखाद्या लहान मुलासारखे सेजदा ऐकत. अमुक करा, तमुक घ्या. पायाला असा व्यायाम द्या, तसं चाला...डॉक्टर सांगायचे, ते ऐकायचे. त्या दिवसात माझ्यासारख्यांना मात्र ज्ञानगंगेत आकंठ डुंबता आलं, रोज संध्याकाळी आम्ही काही मंडळी जमत होतो.

सेजदांना नाना प्रश्न विचारत होतो. ते उत्तरं देत होते, माहिती देत होते. त्यावेळी त्या आजारपणातही ते विनोद करत. कधी मधी आमची चेष्टा सुद्धा करत. खूप खूप गोष्टी सांगत. इंग्लंडमधल्या गंमती जमती, राजकारणातले अनुभव, साहित्य, अध्यात्म, शास्त्र सगळ्या विषयांवर ते बोलत." अनिलदा सांगत होते.

"शेवटपर्यंत ते काम करत होते ?" हेमानं विचारलं.

"हो. लिखाण तर सतत चालूच होतं. पत्रव्यवहार तर इतका प्रचंड होता की पुढे तो थांबवावा लागला. 'सावित्री' महाकाव्यावर शेवटच्या दिवसापर्यंत ते मेहनत घेत होते. कित्येक ओळी वारंवार लिहीत होते. अग, पंधरा ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तेव्हा त्यांनी महत्त्वपूर्ण असं भाषण केलं. त्यांना भारताची फाळणी मान्य नव्हती. त्याचं त्यांना फार दुःख झालं. त्यात त्यांनी आपल्या आशा आकांक्षा, आपली स्वप्नं विस्तारानं सांगितली. भारत हा भविष्यात सगळ्या जगाचं नेतृत्व करील असंही ते म्हणाले. भारताच्या भविष्यातील महानतेसाठी हे विभाजन दूर होऊन अखंड भारत झाला पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला." दा बोलताना रंगले होते.

"दा, त्या दिव्य मरणाची हकीगत सांगा ना." हेमानं आग्रह धरला.

"दिव्य मरण म्हणू की महासमाधी म्हणू की आत्मयज्ञ म्हणू कळेनासंच होतं. मला तर वाटतं इच्छामरण होतं ते. सेजदा अजून आमच्यात आहेत असा आमचा विश्वास आहे."

"दा..."

"सांगतो बेटी, सांगतो, नोव्हेंबरमध्येच त्यांचं दुखणं वाढत गेलं. तरीपण २४ नोव्हेंबरला त्यांनी दर्शन दिलं. लोकांची निराशा केली नाही. तेच त्यांचं लोकांना झालेलं शेवटचं दर्शन."

"दा, त्यांनी आपल्या योगबलावर पुष्कळांचे रोग बरे केले, पुष्कळांचं संकट दूर केलं असं वाचलं मग त्यांनी स्वतःसाठी आपल्या योगशक्तीचा उपयोग का केला नाही ?" हेमानं विचारलं.

"बरोबर विचारलंस बेटा. सेजदांचा निस्सीम भक्त चंपकलाल यानं पण हाच प्रश्न त्यांना विचारला तर अत्यंत शान्तपणे ते म्हणाले, "नाही. का नाही हे मी तुम्हांला सांगू शकत नाही, तुम्हांला ते कळणार नाही." 'त्रास होतोय का ?' असं विचारलं तर म्हणायचे," छे काहीच त्रास नाही. प्रयत्न केला तर मनुष्य त्या सगळ्या यातनांच्या पलीकडे जाऊ शकतो– बेटी, मनावर तर सेजदांचा ताबा होताच पण शरीराच्या व्यथांवर पण त्यांनी जय मिळवला होता. एकदा तर त्यांनी प्रयोग म्हणून बरीच अफू खाल्ली होती. तेवढ्या अफूनं कितीतरी माणसं मेली असती पण सेजदांना काहीही झालं नाही. शरीरावर नियंत्रण करण्याची किमया त्यांनी हस्तगत केली होती. तीन डिसेंबरला माँनं शाळेच्या वार्षिक उत्सवाच्या निमित्तानं नेहमीप्रमाणे दर्शन दिलं. त्या वरवर शान्त दिसत होत्या. तीन डिसेंबरला सेजदांची प्रकृती चांगली होती. डॉ. नीरद वरण यांनी त्यांना फळांचा रस दिला. या...या हातांनी तो ग्लास धुतलाय. आम्ही सगळेच आनंदात होतो. पण दुपारी अचानक ताप आला. एकशे एक डिग्री ताप होता. मधूनच ते बेशुद्ध होत. मला चांगलं आठवतंय. अशा परिस्थितीतसुद्धा त्यांनी बंगालमधील निर्वासितांबद्दल चौकशी केली. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत त्यांची प्रकृती बरी होती. ते उठले. आरामखुर्चीवर डोळे मिटून पडून राहिले. त्यांची ती शांत मुद्रा, त्यांच्या डोक्यावरचे खांद्यापर्यंत रुळणारे पांढरे शुभ्र केस, पांढरी दाढी सगळं पाहून आपण एखाद्या ऋषी मुनीचं दर्शन घेत आहोत असं वाटायचं. बेटी, तुला आश्चर्य वाटेल पण तपःसाधनेमुळे त्यांचा रंग बदलला होता, पण तप्त

सुवर्णासारखा तेजोमयी झाला होता. थोड्याच वेळात त्यांचा जीव घाबरा झाला. अर्धवटबेशुद्धीतच त्यांनी आपल्या प्रियतम भक्ताला, चंपकलालला छातीशी ओढलं. त्याच्या कपाळावर ओठ टेकून त्याला आशीर्वाद दिला. माँ नेहमीप्रमाणे ग्राऊंडवर जाऊन परत आल्या. नेहमीप्रमाणेच सेजदांच्या अंथरुणावर त्यांच्या पायाशी फुलांच्या माळा ठेवल्या. श्रीअरविंदांना ग्लुकोजचं इंजेक्शन देण्याविषयी डॉक्टरांनी सुचवलं तर माँ म्हणाल्या "नको आता त्याची आवश्यकता नाही. त्यांनी आता प्रस्थानाची तयारी केली आहे."

आम्ही त्यांच्या भोवती बसून होतो. काळजी करत होतो. रात्री अकरा वाजता माँ टोमॅटोचा रस घेऊन आल्या. सेजदा तो रस प्याले. आश्चर्य म्हणजे त्यांना शुद्ध आली पण परत बेशुद्ध झाले. पाच डिसेंबरला रात्री एक वाजता माँ परत आल्या. त्यावेळी त्यांचा चेहरा शान्त दिसत होता. थोड्या वेळानं त्या परत गेल्या. एकांतात जाते म्हणाल्या मध्य रात्रीचे एक वाजून वीस मिनिटं झाली.सेजदांनी आपले दोन्ही हात छातीवर ठेवले. माँला बोलवायला जाणार तोच माँ खोलीत आल्या. त्या श्रीअरविंदांच्या पायाशी उभ्या राहिल्या. एक वाजून सव्वीस मिनिटांनी सगळं संपलं. आमचे सेजदा आम्हांला सोडून गेले.

आश्रमातच नव्हे तर जगभर ही दुःखद वार्ता पसरली. जो तो शोक करू लागला. दर्शनासाठी लोकांची रीघ लागली. प्रत्येकजण त्यांच्या पायावर डोकं ठेवून त्यांची पदधूली कपाळाला लावत होता. मृत्यू आला होता पण त्यांच्या देहाला स्पर्श करू शकला नव्हता. कांती मंद झाली नव्हती. रंग सोन्यासारखा चकाकत होता. चेहऱ्याभोवती निळं वलय दिसत होतं. चार दिवस होऊन गेले. डॉक्टर या चमत्कारानं चकित झाले होते. शरीर अजून तसंच तेजःपुंज होतं.

"तुम्हांला खूप वाईट वाटलं असेल नाही!" हेमा म्हणाली.

"वाईट तर वाटलंच पण माँ चा फार मोठा आधार होता. आणि तो मृत्यू ! त्यानंतर चार दिवस ते दिव्य तेज पाहून रडू येत नव्हतं. माँ चा धीर-गंभीर, शान्त चेहरा पाहून डोळ्यात पाणी उभं रहात नव्हतं. मला आठवतंय मी थक्क होऊन गेलो होतो. चकित झालो होतो. एका देवमाणसाचा सहवास वर्षन् वर्ष मिळाला होता याची नव्यानं जाणीव झाली होती. हेमा बेटी, कुणीच रडत नव्हतं. आश्रमाचा व्यवहार थांबला नव्हता, सगळं त्याच शिस्तीनं चालू होतं. माँ म्हणाली होती, कुणी शोक करू नका, कुणी रडू नका, श्रीअरविंदांना ते आवडणार नाही."

"शेवटी एकशेअकरा तासांनंतर त्या महायोग्याला महासमाधी देण्यात आली."

कितीतरी वेळ हेमा जाणि अनिलदा गप्प बसून होते. आता काही बोलावं वाटत नव्हतं. तोच दारात सावली पडली, दोघांनी डोळे वर करून पाहिलं, दारात सुनीता आणि समीर उभे होते.

दां च्या मनात नकळत विचार येऊन गेला, या दोघांचं लग्न झालं तर ! आपण आता थकत चाललो, सुनीताला कुणाचा तरी आधार मिळाला तर आपले डोळे सुखानं मिटतील. हा मुलगा पण आता चांगला वागतोय.

"दा, आता मात्र मी एकटा कलकत्त्याला निघून जाणार आहे." वाऱ्यासारखा कुठूनसा अतुल आला आणि अनिलदांच्या गळ्यात हात टाकत म्हणाला.

"का रे आता काय बिनसलं तुझं ?" दांनी विचारलं.

"दा, तुम्ही अगदी भोळे आहात." हेमा म्हणाली. सगळेच हसू लागले. दा म्हणाले,

"अरे हसता काय, मला म्हाताऱ्याला सांगा तरी."

"अहो दा..." सुनीता बोलू लागली, तिला मध्येच अडवून अतुल म्हणाला,

"तू तर बोलूच नकोस दी. मी तुझ्यावर खूप रागावलोय."

"अरेच्चा काय झालं रे?" समीरनं विचारलं.

"तुझ्याशी पण कट्टी..."

"आणि माझ्याशी रे?" हेमानं विचारलं.

"तुला गुन्हा माफ." अतुल ऐटीत म्हणाला.

"ए नाटक्या, आता सरळ सांग की, काय म्हणायचंय ते." अनिलदा हसतच म्हणाले.

"दा, हेमादी आल्यापासून तुम्ही पहावं तेव्हा तिच्याशी बोलत असता. तिनं तुम्हाला माझ्यापासून दूर नेलं आणि या सुनीतादीनं समीरदाला पळवलं."

"ए नकट्या, मार हवाय का?" सुनीता हळूच म्हणाली.

"मग तू असं का करतेस ग? मला बरोबर न नेता समीरदाला कुठे घेऊन गेली होतीस इतका वेळ?"

"अरे मी नव्हते घेऊन गेले. भाईजींनी आज सगळा दिवस तुझ्या समीरदाबरोबर घालवला. ऑरोविलमध्ये दोघं हिंडत होते." सुनीता म्हणाली.

"बेटा, आवडली ती नगरी तुला?" दांनी विचारलं.

"हो. अजून तिथं खूप काही व्हायचंय. तरीपण जे झालंय ते पाहूनच पुढची कल्पना येते." समीर म्हणाला.

"तिथे राहशील? काम करशील?" दांनी विचारलं.

"हो. समुद्र किनारा आहे, सुंदर निसर्ग आहे. छान वातावरण आहे. मुख्य म्हणजे नव्या कल्पना, नवे विचार यांना भरपूर वाव आहे. ठराविक बंधनं, परंपरागत विचारांनी तिथे माणूस जखडला

जायचा नाही. अशा मुक्त वातावरणात रहायला, काम करायला मला आवडेल. भाईजींना मी म्हणालोय, द्याल ते काम करीन."

"म्हणजे तुम्ही दोघंही इथंच राहणार ? मी एकटीच जाऊ कलकत्त्याला ?" हेमा गहिवरून म्हणाली.

सगळेच गप्प झाले.

तोच आई आणि बाबा आले. त्यांच्या हातातल्या पिशव्यात खूप सामान होतं. समीर पुढे झाला, त्यानं आईच्या हातातल्या पिशव्या घेतल्या. आपल्या थोरल्या मुलाचं असं हे वागणं पाहून त्या माऊलीचे डोळे आनंदानं भरून आले. समीरला आपल्या मिठीत घेत तिनं मनोमन हजार आशीर्वाद दिले.

"बेटी हेमा, सुनीता कामाला लागा बरं. आज ही सगळ्यांना घरीच छान छान स्वयंपाक करून घालणार आहे." बाबा म्हणाले.

कितीतरी महिन्यांनंतर आईच्या हातचं जेवायला मिळणार होतं. अतुलनं आनंदानं उडीच मारली.

# १५

मद्रासला जाणारी बस उभी होती.

बस-स्टॅण्डवर खूप गर्दी होती. अतुलचे आई, बाबा आणि हेमा दी कलकत्त्याला निघाले होते. मद्रासहून ते रेल्वेनं कलकत्त्याला जाणार होते. अतुल, सुनीता, समीर, अनीलदा त्यांना पोहचवायला स्टँडवर आले होते.

पाँडेचरीला येऊन चार महिने होऊन गेले होते. बाबांची सुट्टी संपली होती. हेमाच्या लग्नाची तयारी व्हायची होती. इकडे येताना समीरनं बराच त्रास दिला होता. कलकत्ता सोडून तो कुठेच जायला तयार नव्हता. त्याच्या गँगच्या लोकांनी त्याला धोका दिला होता. त्यांचा सूड उगवायचा विचार समीरच्या डोक्यात थैमान घालत होता. आईनं मोठ्या शर्थीनं त्याला इकडे येण्यासाठी तयार केलं होतं. हेमानं अतुलची पत्रं दाखवून त्याला तरी भेटायला चल म्हणून समीरदाला गळ घातली होती. नेहमीप्रमाणे बाबा त्याला घरातून हाकलून देण्याचं बोलत होते. बाप-लेक एकमेकाशी बोलले नव्हते.

आईसाठी, बहिणीसाठी आणि मुख्य म्हणजे आपल्या लाडक्या अतुल साठी समीर पाँडेचरीला आला होता.

आता समीर इथेच राहणार होता. आल्यापासून तो खूप शान्त झाला होता. त्याची सूडाची भावना निवळली होती. एरवी त्याचा चेहरा तापलेला, संतापलेला, पेटलेला दिसायचा, त्याच्या तोंडी मगरूर, बेपर्वा भाषा असायची. त्याच्या डोक्यात गरीब-श्रीमंताचा झगडा ठाण मांडून बसला होता. तो इथे आपोआप नाहीसा झाला होता. कारण इथे सगळेच सारखे वागत होते. एकच अन्न घेत होते. कुणी लहान-मोठा नव्हता. कुणी गरीब-श्रीमंत नव्हता. नोकर-मालक हा प्रकार नव्हता, अन्याय, वशिलेबाजी, स्वार्थ नव्हता. प्रत्येकाची काळजी मदर घेत होती, ज्याला जे आवश्यक ते त्याला मिळत होतं. श्रीअरविंदांवर, श्री माँवर श्रद्धा ठेवून प्रत्येकजण दिलेलं काम मनापासून करत होता. समीरशी सगळेचजण आपलेपणानं वागत होते. त्याच्या पूर्वायुष्याची कुणी चौकशी केली नव्हती, त्याच्या चुकांचा पाढा कुणी गिरवला नव्हता. माँला अनिलदांनी सगळं सांगितलं होतं. माँ समीरला भेटली होती, हा मुलगा मुळात चांगला आहे, तो सुधारेल ही तिची खात्री पटली होती. तिनं भाईजींच्या हाती समीरला सोपवलं होतं. उषा नगरीचा तरुण नागरिक म्हणून सगळ्यांनी त्याचं मनापासून स्वागत केलं होतं.

समीरदा इथे राहणार म्हणून अतुल खुशीत होता. आता तो, त्याचा दा आणि सुनीतादी खूप मजा करणार होते. आपल्या बोटीतून तो त्या दोघांना समुद्रात फिरवून आणणार होता. समीरदाच्या हातात हात घालून ऑरोविलच्या बागांतून, शेतांतून, शीळ घालत गाणं म्हणत हिंडणार होता.

हेमादी मात्र कालपासून रडत होती. थोरला आणि धाकटा, दोघं भाऊ इथे राहणार होते. सासरी जाण्यापूर्वीच दोघांशी ताटातूट झाली होती.

" तुझ्या लग्नाला आम्ही सगळेजण नक्की येतो. " अनिलदा तिची समजूत घालत होते. आश्चर्य म्हणजे आई अगदी शान्त होती. श्री अरविंदांच्या आणि माँच्या फोटोपुढे डोकं टेकून मनोमन म्हणत होती, " माझा समीर मला परत मिळाला. मी त्याला तुमच्या पायावर अर्पण केलाय. सांभाळा त्याला. "

बस निघायची वेळ झाली. आईनं आपल्या दोन्हीं मुलांना डोळाभर पाहून घेतलं. सुनीताच्या डोक्यावर हात ठेवून तिला आशीर्वाद दिला. अनीलदांच्या पायाची धूळ मस्तकी लावली.

गाडीत बसण्यापूर्वी बाबांनी समीरला जवळ घेतलं. त्याची पाठ थोपटली, त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. वडलांचा प्रेमळ स्पर्श होताच समीरनं 'बाबा' म्हणतच त्यांना मिठी घातली.

हे सगळं अनपेक्षित होतं. बाप-लेकाची ती अपूर्व भेट पाहून सगळ्यांचेच डोळे आनंदानं भरून आले.

बस हलली. अतुलनं हळूच सुनीतादीच्या पदराला डोळे पुसले.

बस गेली. उडणाऱ्या धुळीकडे पाठ करून उषानगरीचे ते दोन नवे नागरिक मोठ्या उमेदीनं, आनंदानं हातात हात गुंफून उगवत्या दिशेकडे पहात चालू लागले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ...६००३३ वि. ...
क्रमांक...३८९६...नोंद दि...
IRBK-0115989
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
वा. क्र. ७५९८९ नों दि. ३०/३/०५
वि. वा.-५



बुक बाइंडिंग
अनिलकुमार प्रभाकर ओसकर
अरुणोदय बिल्डिंग, जवाहर बागसमोर,
स्टेशन रोड, ठाणे-४००६०१

शुद्धिपत्र:

| | पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ओळ पांचवी | ९८ | दुपारचे | मध्यरात्रीचे |